# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८
## मा.महापालिका सभा
## कार्यपत्रिका क्रमांक - ५०
## सभावृत्तांत

दिनांक - २०.१०.२०१५ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे ऑक्टोंबर-२०१५ ची मासिक मा. महापालिका सभा मंगळवार दि.२०.१०.२०१५ रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.थोरात वनिता एकनाथ
९. मा.सायकर अजय शंकरराव
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.काळजे नितीन प्रताप
१५. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१६. मा.जगदीश शेट्टी
१७. मा.बाबर शारदा प्रकाश

१८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

१९. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

२०. मा.उल्हास शेट्टी

२१. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२२. मा.पवार संगीता शाम

२३. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२४. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२५. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२६. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२७. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२८. मा.भारती फरांदे

२९. मा.जावेद रमजान शेख

३०. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३१. मा.राजू मिसाळ

३२. मा.नंदा विकास ताकवणे

३३. मा.नेटके सुमन राजेंद्र

३४. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३५. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३६. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३७. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३८. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३९. मा. अॅड.संदीप गुलाब चिंचवडे

४०. मा.अपर्णा निलेश डोके

४१. मा.अनंत सुभाष को-हाळे

४२. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४३. मा.जयश्री वसंत गावडे

४४. मा.पवार मनीषा काळूराम

४५. मा.प्रसाद शेट्टी

४६. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४७. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४८. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

४९. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५०. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५१. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५२. मा.सुपे आशा रविंद्र

५३. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५४. मा.मोहिनीताई विलास लांडे

५५. मा.अजित दामोदर गव्हाणे

५६. मा.गोफणे अनुराधा देविदास

५७. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

५८. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

५९. मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६०. मा.लोंढे शुभांगी संतोष

६१. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६२. मा.सावळे सिमा रविंद्र

६३. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६४. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६५. मा.पालांडे सुजाता सुनिल

६६. मा.बहल योगेश मंगलसेन

६७. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

६८. मा.कदम सदगुरु महादेव

६९. मा.गिता सुशील मंचरकर

७०. मा.कैलास महादेव कदम

७१. मा.छाया जगन्नाथ साबळे

७२. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७३. मा.टाक अरुण मदन

७४. मा.आसवाणी सविता धनराज

७५. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७६. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७७. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७८. मा.काळे विमल रमेश

७९. मा.पाडाळे निता विलास

८०. मा.विनोद जयवंत नढे

८१. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८२. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८३. मा.विमलताई सुरेश जगताप

८४. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८५. मा.बारणे निलेश हिरामण

८६. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८७. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदू बारणे

८८. मा.ओव्हाळ शेखर अशोक

८९. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९०. मा.कलाटे स्वाती मयुर

९१. मा.नांदगुडे विलास एकनाथ

९२. मा.चौंधे आरती सुरेश

९३. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९४. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

९५. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९६. मा.जवळकर वैशाली राहुल

९७. मा.जगताप राजेंद्र गणपत

९८. मा.शितोळे शैलजा बाबुराव

९९. मा.जगताप नवनाथ दत्तु

१००. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१०१. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

१०२. मा.जम सोनाली पोपट

१०३. मा.प्रशांत शितोळे

१०४. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

१०५. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१०६. मा.गायकवाड संध्या सुरदास

१०७. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१०८. मा.शेंडगे आशा सुखदेव

१०९. मा.मोटे किरण बाळासाहेब

११०. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

१११. मा.संजय केशवराव काटे

११२. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

११३. मा.पाटील सुजित वसंत

११४. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

११५. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव - आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर -मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा.पाटील, मा.तुपे - सहशहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.माने, मा.खांडकेकर, मा.दुरगुडे, मा.खोसे, मा.इंदलकर - सहा.आयुक्त, मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.पठाण, मा.कुलकर्णी, मा.कांबळे, मा.गद्दूवार - कार्यकारी अभियंता, मा.लावंड-कायदा अधिकारी, मा.सुनिल गवळी - पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

१) दिनांक-१/१/२०१६ या अर्हता दिनांकावर (Qualifying Date) आधारित मतदार याद्याचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम वगळणी करण्यात आलेल्या मतदाराचे (पीडीएफ) सी.डी. मा.सर्वसाधारण सभेपुढे अवलोनार्थ सादर करणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ९९ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

२) "प्रभाग क्र.४९ थेरगाव बापुजीबुवानगर येथील सर्व्हे नं९ मध्ये दवाखाना इमारत बांधणे." कामी प्रशासकीय मान्यतेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा

कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता-

अनुकूल- ९९ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.गोरक्ष लोखंडे** - मा.महापौर साहेब, हज यात्रेत झालेल्या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेले यात्रेकरु तसेच प्रा.रामभाऊ कापसे-अंदमान निकोबार राज्याचे माजी नायब राज्यपाल, जगमोहन दालमिया - भारतीय क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष, मदन विश्वनाथ पाटील -माजी मंत्री व ज्येष्ठ नेते, गजानन पेंढारकर-ज्येष्ठ उद्योजक, बाळ ज. पंडीत - ज्येष्ठ समालोचक, रविंद्र जैन-ज्येष्ठ संगीतकार व गीतकार, हेमंत भोसले - ज्येष्ठ संगीतकार, इंदुमती सदाशिव मोरे-दिवंगत माजी शालेय, क्रिडा व सांस्कृतिक मंत्री प्रा.रामकृष्ण मोरे यांच्या मातोश्री, विशाल दिलिप भालेकर-नगरसदस्या अरुणा भालेकर यांचे पुत्र व सामाजिक कार्यकर्ते, हिमानी सावरकर-हिंद महासभेचे अध्यक्ष सावरकर यांच्या स्नुषा, आनंद चिंचवडे - सामाजिक कार्यकर्ते, सत्यभामा दगडू लडकत, पिंपरी, रविंद्र रामचंद्र साठे - म.न.पा. कर्मचारी, सहादू हत्ते, अनिल बढे, रामभाऊ लांडे - सामाजिक कार्यकर्ते, कै.सौ.पारुबाई किसनराव जाधव-माजी नगरसेवक माऊली जाधव यांच्या मातोश्री (जाधववाडी), वर्षा सातुर्डेकर - ज्येष्ठ पत्रकार श्री.सातुर्डेकर यांच्या पत्नी यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली वाहून सभा दहा मिनीटासाठी तहकूब करणेत यावी.

**मा.प्रभाकर वाघेरे** - मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

**मा.महापौर**- श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, ही सभा आज दुपारी २.२५ पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडते.

**मा.स्वाती साने -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

**मा.महापौर -** उपस्थित सर्व सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे ही सभा आज दिनांक २०/१०/२०१५ रोजी दुपारी २.२५ पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

------

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक - ५०**

**सभावृत्तांत**

**(दि.२०/१०/२०१५ (दु. २.००) ची तहकूब सभा )**

दिनांक - २०.१०.२०१५ वेळ - दुपारी २.२५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०/१०/२०१५ ची (दु.२.०० ची) तहकूब मा.महापालिका सभा मंगळवार दि.२०.१०.२०१५ रोजी दुपारी २.२५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर

२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर

३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू

५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ

६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने

७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)

८. मा.थोरात वनिता एकनाथ

९. मा.सायकर अजय शंकरराव

१०. मा.जाधव साधना रामदास

११. मा.जाधव राहुल गुलाब

१२. मा.आल्हाट मंदा उत्तम

१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

१४. मा.काळजे नितीन प्रताप

१५. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर

१६. मा.जगदीश शेट्टी

१७. मा.बाबर शारदा प्रकाश

१८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

१९. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

२०. मा.उल्हास शेट्टी

२१. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२२. मा.पवार संगीता शाम

२३. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२४. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२५. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२६. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२७. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२८. मा.भारती फरांदे

२९. मा.जावेद रमजान शेख

३०. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३१. मा.राजू मिसाळ

३२. मा.नंदा विकास ताकवणे

३३. मा.नेटके सुमन राजेंद्र

३४. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३५. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३६. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३७. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३८. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३९. मा. ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

४०. मा.अपर्णा निलेश डोके

४१. मा.अनंत सुभाष को-हाळे

४२. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४३. मा.जयश्री वसंत गावडे

४४. मा.प्रसाद शेट्टी

४५. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४६. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४७. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

४८. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

४९. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५०. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५१. मा.सुपे आशा रविंद्र

५२. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५३. मा.मोहिनीताई विलास लांडे

५४. मा.अजित दामोदर गव्हाणे

५५. मा.गोफणे अनुराधा देविदास

५६. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

५७. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

५८. मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

५९. मा.लोंढे शुभांगी संतोष

६०. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६१. मा.सावळे सिमा रविंद्र

६२. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६३. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६४. मा.पालांडे सुजाता सुनिल

६५. मा.बहल योगेश मंगलसेन

६६. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

६७. मा.कदम सदगुरु महादेव

६८. मा.गिता सुशील मंचरकर

६९. मा.कैलास महादेव कदम

७०. मा.छाया जगन्नाथ साबळे

७१. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७२. मा.टाक अरुण मदन

७३. मा.आसवाणी सविता धनराज

७४. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७५. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७६. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७७. मा.काळे विमल रमेश

७८. मा.पाडाळे निता विलास

७९. मा.विनोद जयवंत नढे

८०. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८१. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८२. मा.विमलताई सुरेश जगताप

८३. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८४. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८५. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदू बारणे

८६. मा.ओव्हाळ शेखर अशोक

८७. मा.यमुनाताई रमणनाना पवार

८८. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

८९. मा.कलाटे स्वाती मयुर

९०. मा.चौंधे आरती सुरेश

९१. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९२. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

९३. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९४. मा.जवळकर वैशाली राहु ल

९५. मा.जगताप राजेंद्र गणपत

९६. मा.शितोळे शैलजा बाबुराव

९७. मा.जगताप नवनाथ दत्तु

९८. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

९९. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

१००. मा.जम सोनाली पोपट

१०१. मा.प्रशांत शितोळे

१०२. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

१०३. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१०४. मा.गायकवाड संध्या सुरदास

१०५. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१०६. मा.शेंडगे आशा सुखदेव

१०७. मा.मोटे किरण बाळासाहेब

१०८. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

१०९. मा.संजय केशवराव काटे

११०. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१११. मा.पाटील सुजित वसंत

११२. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

११३. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव - आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर -मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा.पाटील, मा.तुपे - सहशहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.माने, मा.खांडकेकर, मा.दुरगुडे, मा.खोसे, मा.इंदलकर - सहा.आयुक्त, मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.पठाण, मा.कुलकर्णी, मा.कांबळे, मा.गद्दूवार - कार्यकारी अभियंता, मा.लावंड-कायदा अधिकारी, मा.सुनिल गवळी - पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह खरंतर विषयपत्रिकेवर विषय नसताना याठिकाणी विषय मांडणे उचित होणार नाही. परंतु कोणतीही दुर्घटना घडल्यानंतर, ती घटना घडत असताना ती वेळ काळ बघुन घडत नसते. ज्यावेळेस नगरसेवकांच्या अस्मितेचा प्रश्न येतो त्यावेळेला मात्र काही विषय आपण आपला अधिकार असल्यामुळे ते सभागृहात घेण्याचा आपल्याला पुर्ण अधिकार आहे. मा.महापौर साहेब, मधल्या कालखंडामध्ये वर्तमानपत्रामध्ये अशी बातमी आली गॅमन इंडियाच्या ठेकेदारांनी वर्तमानपत्रामध्ये अशी प्रतिक्रीया नोंदवली की काही नगरसेवकांनी खंडणी मागीतली. प्रश्न असा येतो पैसे मागीतले कशा पध्दतीने मागीतले पण खंडणी हा जो शब्दप्रयोग केल्यानंतर तो एक फार मोठा गुन्हा असतो. मी येथे बसलेल्या सर्व नगरसेवकांना नंम्र आवाहन करेल की ही सोपी गोष्ट नाही कारण आपण आपल्यामध्ये कोणावरही काहीही झालं, विवीध राजकीय पक्षाचे असल्या कारणान आपण नाही म्हणलेतरी आतल्या मनातून आपण आनंद व्यक्त करत

असतो. परंतु आपण आपल्या जबाबदारीने आणि अधिकारी, ठेकेदार हे आपआपल्या पध्दतीने काम करत असतात. नगरसेवक होण्यासाठी प्रत्येकजण कष्ट करुन नगरसेवक कशा पध्दतीने झाले हे प्रत्येकाना माहिती आहे. येणारा कालखंड हा निवडणुकीचा आहे. पण अशा पध्दतीने कोण माजुरीपणा जर करत असेलतर, आणि महानगरपालिकेच्या माध्यमातून प्रचंड संपत्ती मिळवून नगरसेवकांच्या जीवावर श्रीमंत होवून आणि नगरसेवकच हे कसे नालायक आहेत हे जर ठामपणे सांगायच धाडस करत असेलतर याची मात्र चौकशी होणे गरजेच आहे त्या पापात आम्ही कोणी नगरसेवक सहभागी होणार नाहीत. मा.महापौर तुम्ही सुध्दा नगरसेवकांतून महापौर झालेला आहात. या महापालिकेच्या कोणत्याही पक्षाच्या माध्यमातून सत्तेवर असताना या शहराच्या सर्वांगीण विकासासाठी, प्रत्येक नेता असेल किंवा प्रत्येक नगरसेवक असेल तो विकास अतीशय गतीमान होण्याच्या दृष्टिकोणातून कोणतीही शहनिशा न करता त्याला वेळोवेळी ठेकेदारांना इन्डायरेक्टली नगरसेवकांच, सभागृहाच स्थायी समितीच्या माध्यमातून विकास काम गतीमान होण्यासाठी नेहमीच पाठिंबा असतो. त्या ठेकेदारांनी का धाडस केल नाही किंवा अधिका-यांनी सुध्दा आम्हांला त्रास देतात, नगरसेवकच कसे त्रास देतात. नगरसेवकच का कारण नगरसेवक हा टेम्परारी माणूस असतो आणि परमनन्ट माणसाच नाव घेण्याच कोणी धाडस करत नाही. या शहरामध्ये विकासाच्या नावाखाली काही चार-दोन ठेकेदारानी ही महापानगरपालिका दत्तक घेतलेली आहे, महानगरपालिकेनी त्यांना दत्तक घेतलेल नाही. असे माजुरी जर असेलतर त्याला बडतर्फ करण्याच्या दृष्टिने, आयुक्त साहेब ज्यावेळेला तुमच्या अस्तित्वाचे प्रश्न येतात त्यावेळेला आमच्याकडून काही गोष्टी करुन घेतात. तुमच्या विषयी तुमच्या कामाच्या माध्यमातून तुम्ही केलेल्या एवढया कालखंडामध्ये निश्चितपणे तुम्ही विश्वासार्हता जर कमावणार असालतर, एवढया घटनेनी आमचा विश्वास गमावू नका असे मी आपल्याला नम्रं आवाहन करेल. कारण हा माज चांगला नाही. या ठेकेदाराचे एवढे धाडस असेलतर नगरसेवकांच्या माध्यमातून काहीही बोललेतरी कोणीही नगरसेवक काही करणार नाही त्यातुन गप्प बसणारे आम्ही नाहीत. पंचवीस पंचवीस वर्षे राजकीय कारकिर्द आम्ही घडवतोय. विश्वासार्हता आम्ही सिध्द करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करतो. असे माजूरी जर असतीलतर काहीही फरक पडत नाही. त्याना सस्पेन्ड करुन त्या जागी दुस-याला जरी काम दिलंतरी काही फरक पडणार नाही. विशेषत: डायरेक्ट वर्तमानपत्राच्या माध्यमातून आपली प्रतिक्रीया व्यक्त करणे हे योग्य नाही. खंडणी या शब्दाला माझा आक्षेप आहे. कोणी वर्गणी मागीतली असेलतर, कोणीजर काही करत असेलतर तो कोण लागून गेलेला आहे तो कोण ठेकेदार असेल त्याला आपण दिलेला कालखंड त्या दिलेल्या कालखंडामध्ये काम पुर्ण केले का अपुर्ण आहे ही संपुर्ण नियमावली काढलीतर तो ब्लॅकलीस्टमध्ये जाईल. पण ते आम्ही लोक करत नाहीत. त्यांच जे फार मोठ धाडस वाढलेलं आहे, ते केवळ कदाचित आमच्यामध्ये पण विस्कळीत पणा असू शकतो आणि त्या धाडसापोटी जर कोणी असं

नगरसेवकांच्या नावाची बदनामी करत असेलतर मला वाटतं महापौर साहेब आपण कोणत्याही गोष्टीसाठी सभा तहकूब करतो अशा या नालायक लोकांना धडा शिकवायचा असेलतर, किंबहूना त्यांच्या माध्यमातून माझ्या शब्दाला त्यांचा आक्षेप असेलतर तो त्यांनी सिध्द कराव की हे चुकीचे होते म्हणून पण नगरसेवक आणि खंडणी हा शब्दप्रयोग वर्तमानपत्रात आलेला आहे. येणा-या नजीकच्या काळामध्ये सर्वांना निवडणूकीला सामोरे जायचे आहे याच भान ठेवा. आपल्याकडे राजकारणामध्ये असं आहे जो निवडूण येतो त्याचीच डोकी मोजली जातात पराभूत उमेदवारांची डोकी मोजली जात नाहीत आणि त्याची किमंत आपल्याला मोजावी लागते. अटि व शर्ती ठेकेदाराला डोळयासमोर ठेवून केल्या जातात. या परिस्थितीतून आम्हांला विकास करायचा असतो. आम्ही विकास दाखवितो आमच्या वॉर्डामध्ये. अशी कोणती घटना घडली की त्याला एवढ जीवे मारण्यापासून बॉडीगार्ड घेण्याची गरज भासली. आम्ही एवढया लोकांमधुन निवडून आलेलो प्रत्येक नगरसेवक प्रत्येकाच काहीतरी स्वतंत्र अस्तित्व ठेवण्यासाठी काय कराव लागतं. अशा ठेकेदाराना घरातल्या घरात पण मतदान मिळणार नाही असे नालायक माणस जर नगरसेवकांचा अपमान करत असतीलतर, महापौर साहेब, या खुर्चीवरुन आपण बोलतो, आपण आपले मत व्यक्त करतो त्या मताचा किती आदर करायचा हा वास्तविक पाहता आत्मशोधाचा प्रश्न आहे. परंतु अशा गोष्टीसाठी तुम्ही जर गप्प बसलातर याचे प्रायश्चित सगळयांना करावे लागेल. ही ताबडतोब चौकशी व्हावी माझ्या मताशी सर्व नगरसेवक सहमत असतील अशी मी माझी भावना याठिकाणी व्यक्त करतो. कारण हा माज चांगला नाही. महापालिकेत कोणत्याही ठेकेदाराला मुदतवाढ दयायची असेलतर हीच सभा त्यांना संपुर्ण पाठिबा देते. आयुक्त साहेबांनी सांगीतल चांगला प्रकल्प असेलतर त्या प्रकल्पाला मुर्त स्वरुप दयायचे असेलतर हीच सभा आयुक्तांना पाठिबा देते. आयुक्त म्हणजे कोण, आम्ही केलेल्या ठरावावर कायदयात बसवून त्याची कार्यवाही करण्यासाठी आयुक्त. आयुक्त साहेब तीन वर्षे झाल्यानंतर तुम्ही बदली करुन जाताल परंतु आमची स्मशानभूमी याच ठिकाणी आहे आणि कोणी जर म्हणले नगरसेवक खंडणी मागणारे आहेत, खंडणी मागण्याचा त्यांचा आरोप असेलतर ते योग्य नाही. त्यांनी नाव घेवून तक्रार करावी. मा.महापौर साहेब, ही गोष्ट गांभीर्याने घ्यावी. ही घटना अधिका-याच्या बाबतीत घडली असतीतर त्या ठेकेदाराने आत्महात्या केली असती किंवा कायमस्वरुपी पिंपरी चिंचवड शहर सोडून गेला असता एवढे सतर्क आपले अधिकारी आहेत. यामध्ये चर्चा करण्यासारख काहीच नाही. यानंतर त्यांनी नगरसेवकांच्या नादी लागले नाही पाहिजे. नगरसेवकांची चुक असेलतर रितसर त्यांनी कम्प्लेन्ट करावी पण नगरसेवकाना बदनाम करण्याच काम यापुढे खपवून घेतल जाणार नाही याच आपण भान ठेवाव. तातडीने निषेध करुन व याच्या चौकशीचे आदेश देवून याला ब्लॅकलीस्ट करण्याची वेळ आलेली आहे आयुक्त साहेब. तो ब्रीज नाही झालातरी चालेल पण

आमची झालेली बदनामी खपवुन घेतली जाणार नाही. याकडे आपण गांभीर्याने लक्ष दयाव आणि ताबडतोब त्याच्यावर कारवाई करावी अशी मी महापौरांना विनंती करतो.

**मा.गोरक्ष लोखंडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताच आमचे ज्येष्ठ नगरसेवक आदरणीय भाऊसाहेब भोईर यांनी जे वक्तव्य केले त्याचे मी समर्थन करतो. आयुक्त साहेब, ब-याचवेळेला काय होतं, नगरसेवक, लोकप्रतिनीधी ज्यावेळेला समाज जीवनातून काम करत असतो त्यावेळेला त्याचे एक स्वत:चे अस्तित्व असते आणि ते कुठेतरी डागळले जावु नये म्हणून तो काळजी घेत असतो आज नगरसेवक या शब्दाला वापरुन या सभागृहातील सगळया नगरसेवकांची प्रतीमा मलीन करण्याचे काम गॅमन इंडियाच्या लोकांनी केलेले आहे. खरंच तसे घडल असतंतर त्यांनी एफआयआर दाखल करायचा, एफआयआर का दाखल केला नाही, म्हणजे घटना घडली का नाही. केवळ फॅब्रीकेशन करुन आमची प्रतीमा मलीन करण्याचे काम त्यांनी केलेले आहे. आज ठाण्यामध्ये सुरज परमार नावाचा एका बिल्डरानी आत्महात्या केली आहे आणि म्हणून नजीकच्या काळामध्ये खंडणी या शब्दाखाली येणारे जे ऑप्शन्स आहेत आणि शिक्कमोर्तब जर एखादया नगरसेवकाला लागलातर उदया लोकप्रतिनीधी म्हणून त्यांना निवडणूक लढवायची आहे या सगळया गोष्टीचा आपण विचार केला गेला पाहिजे. अनेक ठेकेदार काम करतात मला काही फार खोलात जायच नाही. त्यांचा लाड आपण करतो. नगरसेवक आज आहेत, उदया नाहीत ही प्रशासनाची भावना आहे. ही सर्वोच्च सभा आहे, आमसभा आहे. ७४ व्या घटनादुरुस्तीमध्ये या आमसभेला सगळयात मोठे अधिकार दिलेले आहेत. आयुक्त साहेब, तुम्हांला इथे मतदान पण करता येत नाही, बोलता पण येत नाही महापौरांनी आदेश दिलेतर तुम्हांला काम करता येतं. अशा या सर्वोच्च सभागृहाच्या नगरसेवकां विषयी जर कोणी बोलत असेलतर ते योग्य नाही आणि म्हणून या कॉन्ट्रॅक्टराची चौकशी करावी अशी आम्ही मागणी करतो. आम्हीच या तरतूदीला मान्यता देतो, हे सभागृह सभा चालवते. हे सभागृह महानगरपालिका चालवते. आणि त्या सभेत बसणा-या नगरसेवकां विषयी असे अपमानकारक शब्द कोणी वापरत असेलतर त्याला शासन झाले पाहिजे, त्याला सजा झाली पाहिजे. मी गॅमन इंडिया लिमेटेडचा निषेध करतो आणि थांबतो, जयहिन्द जय महाराष्ट्र.

**मा.प्रसाद शेट्टी -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. गेल्या पंधरा वीस दिवसापुर्वी सकाळ पेपरला बातमी आली चार नगरसेवकांनी खंडणी मागीतली याची संबंधीत अधिका-यांनी माहिती दयावी. गॅमन इंडियाच्या बाबतीत हा विषय आहे. तरी संबंधित ठेकेदाराची माहिती मागवावी. अशी माहिती दयावी की आपण त्यांना वर्क ऑर्डर कधी दिलेली आहे, त्यांची मुदत किती होती, त्यांना आपण किती वेळा मुदतवाढ दिलेली आहे व अजून किती वेळा मुदतवाढ देणार आहोत याची माहिती दयावी.

**मा.राजन पाटिल (सह.शहर अभियंता) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता जी माहिती विचारली ती मी देतो. एकुण कामाची किमंत, स्विकृत निवीदा जी आहे ती रक्कम रुपये ९९ कोटी ४२ लाख आहे. वर्क ऑर्डर ६ एप्रिल २०११ साली दिलेली आहे. त्याची मुळ मुदत १० ऑक्टोंबर २०१३ पर्यंत होती. पहिली मुदतवाढ ३० एप्रिल २०१५ पर्यंत दिलेली आहे. पवना नदीची जागा काही प्रमाणात आपल्याकडे ताब्यात नव्हती, रेल्वेकडून एसटी लाईनसाठी आपल्याला रेल्वेकडून काही परवानगी मिळणे अपेक्षीत होते आणि काळेवाडी भागातील काही जागा आपल्याला रॅम्पसाठी मिळालेली नव्हती त्यामुळे आपल्याला ३० एप्रिल २०१५ पर्यंत मुदतवाढ दयावी लागली. आतापर्यंत कामावरती ४८ कोटी ६ लाख रुपये खर्च झालेला आहे. अंदाजे काम जे झालेले आहे ते जवळ जवळ ६५ टक्के काम पुर्ण झालेले आहे. मोबीलायझेशन चार्ज आतापर्यंत ४ कोटी ९७ लाख रुपये दिलेला होता त्यापैकी २ कोटी ९७ लाख रुपये जसे दिले तसे वसुल झालेले आहेत. एक्सलेशन कॉस्ट आता माझ्या समोर नाही, ती आपल्याला देतो.

**मा.प्रसाद शेट्टी -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपण त्यांना काम चालु करण्यासाठी २०११ ला दिलेले आहे. त्यांना ३० महिन्याचे टार्गेट होते ते २०१३ ला संपत होतं. त्यांना २०१५ पर्यंत मुदतवाढ दिली आता २०१६ येवू लागलेले आहे. आता त्याची पोझीशन आहे ६५ टक्के काम झालेले आहे. म्हणजे गेल्या चार वर्षापासून फक्त ६५ टक्केच काम करु शकले म्हणजे अजून तीन ते चार वर्षे घालवायचे का? तो ठेकेदार अशी तक्रार करतो की संबंधित तिथले नगरसेवक त्रास देतात त्यांनी तशी कम्प्लेन्ट याठिकाणी केली आहे का? या चार वर्षामध्ये त्यांनी तक्रार केली का? संबंधीत नागरीक लोक, संबंधीत नगरसेवकांनी त्रास दिल्यामुळे आम्ही काम करु शकत नाही म्हणून. आज चार वर्षा नंतर त्याला सुचते. नगरसेवक, नागरीक त्रास देतात अशी आता पर्यंत एकदातरी ईथं कम्प्लेन्ट त्यांनी आयुक्तांकडे, मा.महापौरांकडे, अधिका-याकडे केलेली आहे का? आज चार वर्षानंतर डायरेक्ट पेपरला देतोय की तेथील नगरसेवक त्रास देतात त्यामुळे काम करता आलेले नाही. आपण त्याला चार वर्षे पोसत आलोत. मला साडेतीन वर्षे झाले, त्याठिकाणच्या नागरीकांना त्रास होवु लागलेला आहे. मी प्रत्येक वेळेस मा.अजीतदादांना चार वेळा निवेदन दिलेले आहेत. तेथील नागरीकांना घेवून मी मा.अजीतदादा बरोबर दोनवेळा मिटींग केलेली आहे, गॅमन ब्रीजसाठी स्थायी समिती सुध्दा तहकूब केलेली आहे. आजपर्यंत कुठल्याही कामासाठी स्थायी समिती तहकूब केलेली नाही पण हा ठेकेदार काम करत नाही, वारंवार आम्ही सांगीतलेल आहे की काम करत नसेलतर त्याला ब्लॅकलीस्टला टाका आपण त्याला ब्लॅकलीस्ट का करत नाहीत. आज चार वर्षे झाले आणि तो फक्त ६५ टक्के काम करु शकतो. अजून ३५ टक्केसाठी का आम्ही थांबायचं. तो ब्रीज चार प्रभागातून जातो. तिथले आठ नगरसेवक आहेत आणि तो ठेकेदार म्हणतो चार नगरसेवक. कोणी खंडणी मागीतली समजायची. नागरीक लोक त्या आठ

नगरसेवकांकडे बघायला लागलेले आहेत या लोकांनी खंडणी मागीतली आहे का म्हणून. हे चार नगरसेवक कोण आहेत. हा अशी खोटी तक्रार करु शकतो यांना जर खंडणी मागायची होतीतर हा ऍण्टी करप्शनकडे देणार नाही, दोन चार लाख रुपये नगरसेवकांना देवून  हा खोटी तक्रार करु शकतो तर एण्टी करप्शनकडे का देणार नाही हा. खरंच खंडणी मागीतली असेलतर एकशेएक टक्का एण्टी करप्शनला दिलं असतं. आयुक्त साहेब, आपण गेली पाच महिन्यापासून आढावा बैठक घेतात. प्रेसमध्ये सुध्दा आपण पत्रकाराना सांगीतलेले आहे डिसेंबर पर्यंत त्यांनी मुदतवाढ मागीतलेली आहे आम्ही प्रत्येक महिन्याला आढावा बैठक घेणार आहोत आणि त्यांना दिलेले टार्गेट प्रत्येक महिन्याला पुर्ण केले नाही, एक महिना टार्गेट कम्प्लेट केल,  दुस-या महिन्याला टार्गेट कम्प्लेट नाही केलं, तीसरा महिना टार्गेट कम्प्लेट नाही केलं, चौथा महिना टार्गेट कम्प्लेट नाही केलं. तुम्ही म्हणलेल आहे दुसरा महिना टार्गेट कम्प्लेट केलं नाहीतर तुम्ही टर्मिनेटच त्याला पत्र देणार. तरी त्याला चार महिने मुदतवाढ दिलेली आहे. २०१७ ला इलेक्शन येणार. नागरीकांनी मला अपक्ष म्हणून निवडून दिलेले आहे. कुठल्या पक्षावर निवडून दिलेलं नाही. त्यांनी माझ्यावर भरोसा ठेवून निवडून दिलेलं आहे. २०१७ ला आम्ही कोणत्या तोंडाने त्यांना मत मागणार. आज तुम्ही एक महिन्यापासून ग्रेडसेपरेटर बंद ठेवलेला आहे. आज दसरा, दिवाळी आहे, सगळयात मोठ शॉपींग सेंटर माझ्या वॉर्डात आहे. त्याठिकाणी संध्याकाळी जावा ग्रेडसेपरेटर पुर्ण फुल असतो. सर्व्हिस रोडवरुन लोक जातात, ग्रेडसेपरेटर एक महिन्यापासून बंद केलेलं आहे. अजून किती महिने तो बंद ठेवणार. महापालिकेतून बाहेर निघाल्यानंतर तुम्ही त्याठिकाणी ट्रॅफिक किती आहे ते बघावे. अजून किती वर्षे नागरीकांचे आपण हाल करणार. एखादा नगरसेवक त्या कामाच्या बाबतीत प्रत्येकवेळी आवाज उठवत असेलतर आणि त्या नगरसेवकांच्या बाबतीत असं पेपरला दिलतर यापुढे कोणताही नगरसेवक डेअरींग करणार नाही, कुठल्याही ठेकेदारा विरोधात बोलायला. आज बॉम्बे-पुणे रोडला बी.जे. शिर्के यांनी एवढा मोठा ब्रीज बांधला तरी एक दिवसही काम बंद ठेवलेल नव्हतं. त्यांनी एवढया मोठया ट्रॅफीकमध्ये ब्रीजचे टाईमबॉण्डप्रमाणे काम केलेले आहे. याला काय अडचण आहे. याला ट्रॅफीकच टेन्शन नाही, याला रेसिडेन्शीअलच टेन्शन नाही. मग यांनी एवढं लेट का केलं. आज आवाज उठवत नाही, तर नगरसेवक झाल्यापासून आम्ही गॅमन ब्रीजच्या बाबतीत आम्ही आवाज उठवितो आहे. एवढ वर्षे त्यांना कळाल नाही. आज सर्व संबंधीत वॉर्डातील नगरसेवकांनी सांगीतल आहे की त्यांना ब्लॅकलीस्टला टाका. मग नगरसेवक लोकांनी गप्प बसायच आणि अधिकारी लोकांनी त्याला परत मुदतवाढ दयायची. साहेब, हे कुठंतरी थांबायला पाहिजे. नगरसेवकांची अशी बदनामी होत गेलीतर कोणताही नगरसेवक त्यांच्या वॉर्डातील कामासाठी आवाज उठवणार नाही. पेपरला दिले की नगरसेवकांनी आवाज उठवायचा नाही का? आपण स्मार्ट सिटीमध्ये इन्ट्री करत होतो परंतु याच ब्रीजमुळे आपल्याला पॉईंट कमी भेटले आहेत. या जेएनएनयुआरएमच्या स्किममध्ये आपल्याला पाच पॉईंट भेटणार होते. याच गॅमन

इंडिया ब्रीजमुळे मार्क कट झाले मग तुम्ही कारवाई का करत नाहीत. स्मार्ट सिटीमध्ये यांच्यामुळे आपल्याला पॉईंट कमी पडलेले आहेत. आमची सर्वांची मागणी आहे त्यांना ब्लॅकलीस्टला करा, त्याला मुदतवाढ न देता ब्लॅकलीस्टला करा एवढीच आमची मागणी आहे.

**मा.धनंजय आल्हाट -** सन्मा.महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. अत्यंत महत्वाचा विषय आज याठिकाणी पटलावरती आलेला आहे. कारण समाजकारण आणि राजकारणामध्ये चारीत्र्याला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतर त्याच्या जबाबदा-या, त्या भागातील विकास त्याचबरोबर समाजामध्ये एकप्रकारची नैतीकता प्रस्थापीत करण्याचे काम लोकप्रतिनीधी म्हणून त्यांच्याकडे असते. लोक त्यांच्याकडे फार आशेने पाहत असतात. अचानक प्रसाद भाईनी विषय मांडलेला आहे. सभागृहात आल्यापासून आम्ही तो विषय ऐकतो. आम्हीतर सर्व नगरसेवक नवीन आहोत. ती जी संबंधित कंपनी आहे, आता सन्मा.अधिका-यांनी खुलासा दिला पण खुलासामध्ये ते काही तपशीलवार गेलेले नाहीत की खरच त्याठिकाणी ज्या अडचणी आहेत त्या अडचणी जर असतीलतर, त्याठिकाणी काही प्रशासकीय, तांत्रीक अडचणी असतीलतर हे काम तुम्ही काढलच का? असा प्रश्न याठिकाणी पहील्यांदा निर्माण होतो. जागा ताब्यात नसेलतर, केंद्रशासनाच्या काही अन्य बाबी त्याठिकाणी असतील त्याची पुर्तता झाली नाहीतर टेंडर काढलच कसं? हा पहिला मुद्दा आहे याची चौकशी झाली पाहिजे. हे काम करत असताना अनेकवेळा मुदतवाढ दिली त्यांच्या बरोबर आपण ज्यावेळेला कामाचे आदेश देतो. वाढीव महागाई १० टक्के हे त्यांना देतो का? याची पण चौकशी झाली पाहिजे. म्हणजे एका बाजुला त्यांनी काम लेट करायचे आणि दुस-या बाजूला आपण त्याला महागाई म्हणून १० टक्के वाढ दयायची हाही भ्रष्टाचारातला एक भाग आहे. मग ज्यावेळेला त्याच्या लक्षात येते की हे काम आपल्याकडून पुर्ण होत नाही, जर आपल्याकडून हे काम पुर्ण झाल नाहीतर कदाचित आपल्याला ब्लॅकलीस्टमध्ये जावे लागेल म्हणून हा एक चांगला प्लॅन त्यांनी बनवला आहे. या सगळया प्रकरणी ज्यावेळेस अधिकारी बोभाट करतात, ठेकेदार बोभाट करतात आणि नगरसेवकांची बदनामी करतात ते म्हणजे अस. या सगळया प्रकरणी कोण खोटं आणि कोण खरं याचा एकदा निकाल होवूनच जावु दया. या सभेमध्ये सगळया नगरसेवकांचा रोष या विषयावरती आहे. जर एवढे अधिकारी लोक त्यांना पाठीशी घालत असतीलतर, ठेकेदाराच बळ एवढ वाढल असेलतर पहिल्यांदा अधिका-यांच्या प्रॉपर्टीची चौकशी करावी म्हणजे "दुधका दुध आणि पाणी का पाणी" होवून जाऊ दया. नगरसेवकांना तुम्ही बदनाम करता पण तुमची प्रॉपर्टी जनतेच्या पुढे येवु दया तुम्ही ज्यावेळेला याठिकाणी महापालिकेमध्ये रुजू झाला त्यावेळेला ऍफीडेव्हीट लिहून दिलेले असते की माझी प्रॉपर्टी एवढी आहे आणि आजची त्यांची, संबंधित नातेवाईकांची प्रॉपर्टी किती आहे याची चौकशी झाली पाहिजे. हे सभागृह निर्णय घेण्यासाठी आहे आणि ज्यावेळेला महासभेमध्ये हा विषय मांडला जातो आम्ही आज सर्व नगरसेवक ठराव करतो. सर्व अधिका-याच्या प्रॉपर्टीची

चौकशी करावी त्याला मुदत दयावी. त्या मुदतीमध्ये हा प्रस्ताव महापालिका सभेमध्ये तुम्ही मांडला पाहिजे. संबंधीत ठेकेदाराच्या कामाची चौकशी सुरु करावी त्याला ब्लॅकलीस्टला टाका. खरंच कोणी खंडणी मागत असेलतर त्यानी रितसर तक्रार करायची, आपल्याकडे कायदाव्यवस्था आहे. परंतु अशाप्रकारे नगरसेवकाला ब्लॅकमेल करायचे, म्हणजे तो गप्प बसेल, घाबरेल. नगरसेवकांच काही चुकल असेलतर त्याच्यावरही कारवाई होवु दया. त्याच्यामध्ये आजीबात आम्ही कोणाला पाठिशी घालत नाहीत. पण ते जर खोटं असेंलतर त्याची चौकशी झाली पाहिजे. तरी आपण हा निर्णय घ्यावा. महापौर साहेब, तुम्ही आदेश दयावेत. आदेश देणं तुमच काम आहे तुम्ही त्याठिकाणी पिठासीन अधिकारी आहात. तुम्हांला आदेश देण्याचा अधिकार आहे. अधिका-यांच्या संपत्तीची चौकशी करावी, संबंधीत कामाची चौकशी करावी आणि त्या ठेकेदाराला ब्लॅकलीस्टला टाकावे अशी मी या ठिकाणी सभागृहाच्या वतीने मागणी करतो. “दुधका दुध आणि पाणी का पाणी” त्याठिकाणी होवून जाईल आणि हा निर्णय जनतेच्या समोर येईल. जनतेच्या मनामध्ये आजही संभ्रम आहे. लोक शोधतात ते चार नगरसेवक कोण? जी परिस्थिती निर्माणच झाली नाही, जो प्रकार त्याठिकाणी घडलाच नाहीतर तुम्ही अंदाज कसा लावता. आमचा सुध्दा ठराव करुन घ्यावा. सगळया अधिका-यांच्या संपत्तीची चौकशी झाली पाहिजे आणि त्या ठेकेदाराच्या कामाची चौकशी लावा. खरे काय आहे ते जनतेला समजले पाहिजे. जनतेच्या नजरा या विषयाकडे लागलेल्या आहेत. वर्तमानपत्रामध्ये आल्यानंतर त्याठिकाणी त्याची चर्चा झाली आणि तो अनुत्तरीत प्रश्न आहे त्याचे उत्तर मिळाले पाहिजे. म्हणून सभागृह याठिकाणी आपल्याला मागणी करतय, याचना करतय की याचा निर्णय होवून जाऊ दयावा. जे घडले त्याची चौकशी करावी, ब्लॅकलीस्टला टाका, त्यांच्या कामाची चौकशी करा आणि अधिका-याच्या मालमत्तेची चौकशी करा. असे आदेश मा.महापौर आपण प्रशासनाला दयावेत एवढीच सर्व नगरसेवकांच्या वतीने मी तुम्हांला विनंती करतो आणि थांबतो.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.नगरसेवक, नगरसेवीका, पत्रकार व अधिकारी. आज गेली आठ दहा दिवस गॅमन इंडियाच्या माध्यमातून जी पेपरला बातमी आली त्या बातमीमध्ये गॅमन इंडिया कडून काही खंडणीचा प्रकार घडला अशी पेपरला बातमी आली त्यावेळेला सर्व नगरसेवकांची चर्चा पिंपरी चिंचवड शहरात व्हायला लागली मी प्रसाद भाऊच मनापासून कौतूक करेल. त्यांना खंडणी काय असते ते एकदा आपण सांगू. नगरसेवक काय असतो, खंडणी मागीतल्यानंतर काय कराव लागतं ते त्याला सांगू. प्रसादभाऊ आपण त्या कामाची मागणी अनेकवेळेला सभागृहात केली त्यावेळेला अनेकवेळा त्याची चर्चा केलेली आहे. राजन पाटिल यांना विचारायचे आहे की तुम्ही २०११ ला टेंडर दिलेले होते. त्याचा कालावधी संपलेला आहे. आयुक्त साहेब, या कामासाठी लेट का झाला त्यासाठी त्यांना आपण काय नोटीस दिलेली आहे, त्याच्यावर काय कारवाई केलेली आहे हे सांगावे. पाच वर्षात २०११

ते २०१६ पर्यंत मुदत संपून सुध्दा एक वर्षे तो पुढे गेला. त्याच्यावर आपण काही कारवाई का केलेली नाही. अनेकवेळा आदरणीय दादांच्या चर्चामध्ये सुध्दा विषय झालेला आहे की त्याला ब्लॅकलीस्ट मध्ये टाका. त्याठिकाणी दुसरा कोणीतरी कॉन्ट्रॅक्टर नेमा. असे असताना तो स्वत:ला सेफ करण्यासाठी नगरसेवकाला ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न करतो. पाच वर्षात ६५ टक्के काम करतो तर बाकी उरलेले ३५ टक्केला किती वर्षे लावणार. किती वर्षे तो या शहराला पिळणार. मग आपण त्याला काही जावाई म्हणून इथ आणलेल आहे का? का कोणाचा पर्सनली तो नातेवाईक आहे का? का कोणा अधिका-याचा त्याचा संबंध आहे का? एखादया साध्या ठेकेदाराचा विषय असेलतर त्याच्या नावाने स्थायी समितीची सभा अनेकवेळा तहकूब केली जाते. तरीही अधिकारी जर त्याच्या बाजूने असाल, आम्हांला असे वाटते की खंडणी मागणारे नगरसेवक नाही तर अधिका-यानीच मागीतली की काय अशी आमच्या मनात शंका वाटायला लागली. म्हणजे अधिकारी त्याच्या बाजूने आहेत, अधिकारी त्याच्या बरोबर वेगळया पध्दतीने काही कॉन्ट्रॅक्ट करतात की काय अशी शंका मनात निर्माण झालेली आहे. नगरसेवकांची केलेली बदनामी, सत्य असेलतर त्याची शहनिशा करावी त्याला आम्ही सहमत आहोत परंतु आरोप असेलतर सभागृहाच्या वतीने लोखंडे साहेबांनी सांगीतल्याप्रमाणे त्याच्यावर गुन्हा दाखल करु शकतो, आपण त्याच्यावर अब्रूनुकसानीचा गुन्हा दाखल करु शकतो. त्याच्यात हिम्मत असेलतर त्यानी नाव जाहीर करावं, आम्ही त्याला चॅलेंज करतो कोणी नगरसेवकांनी मागीतल त्यांच नाव जाहीर कराव, त्याचा आम्ही सभागृहामध्ये सन्मान करु नसेलतर त्याला चौकात मारु, खोटे आरोप करत असेलतर. एखादा ठेकेदार चुकीच्या पध्दतीने असे काही करत असेलतर आम्ही त्याला कोणीही सोडणार नाहीत. मला राजन पाटिल यांना प्रश्न विचारायचा आहे की पाच वर्षे झाले लेट झाले आहे त्याच्यावर काय काय केल आहे, काय नोटीस दिल्या हे सांगाव आणि पुढील कामाच्या संदर्भात त्याला ब्लॅकलीस्ट कराव. मा.महापौर साहेब, आजची महापालिका सभा त्याचा निषेध करुन त्याला ब्लॅकलीस्टला टाकून तहकूब करावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

**मा.राजन पाटिल (सह.शहर अभियंता) -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह मघाशी माहिति देतांना एक माहिती राहीलेली होती ती एक्सलेशन कॉस्ट ८ कोटी रुपये त्यांना दिलेली आहे आतापर्यंत पहिल्या दिवसापासूनचा जो कामाचा प्रोग्रेस आहे तो पहिल्यापासून समाधानकारक नाही. भरपूर नोटीस दिलेल्या आहेत. मागे सहा महिन्यापुर्वी दररोज आपण नोटीस देत होतो आणि जशी मुदत संपली तशी आपण त्यांना एक महिन्याच टेंडर मध्ये जे कलम आहे त्यानुसार एक महिन्याची मुदत देणं अपेक्षीत असतं ती मुदत देण्याची कार्यवाही सुध्दा आपण पुर्ण केलेली आहे. आता त्यांना कधीही पंधरा दिवसाची एक नोटीस देवून काढू शकतो.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. टेंडर प्रोसिजर मध्ये काय अटि आणि शर्ती टाकलेल्या होत्या त्या सांगाव्यात. त्यान किती दिवसात काम पुर्ण करायच होतं. काय अटि तरतूदी आहेत त्या सभागृहाला सांगाव्यात.

**मा.राजन पाटिल (सह.शहर अभियंता) -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. टेंडरमध्ये ज्या कंडीशन होत्या त्यानुसार त्यांना आपण जागा देणे अपेक्षीत होते आपण जागा दिलेली नसल्यामुळे त्यांना मुदतवाढ दिलेली आहे.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. जागा आपल्या ताब्यात नसताना टेंडर काढले हे कोणी केले. हे जरा सभागृहाच्या समोर येवू दया अधिका-यांनी केलेले कारनामे पुढे येवू दया म्हणजे कळेल नक्की नगरसेवक कोण आहे आणि नक्की काय गडबड आहे. कोण अधिकारी निष्क्रीय आहेत ते आम्हांला बघु दया. हा कारनामा कोणी केला हे तरी कळू दया.

**मा.राजन पाटिल (सह.शहर अभियंता) -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. त्यावेळेला मी नव्हतो. वर्क ऑर्डर झाली त्यावेळेला मी नव्हतो. २०११ साली टेंडर काढलेले आहे.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. २०११ साली कोण होते त्यांना बोलवावे. जागा ताब्यात नसताना ते टेंडर काढणारे महाप्रताप करणारे अधिकारी कोण हा माझा प्रश्न आहे. आम्ही एखादे सर्वसामान्य टेंडर काढायला सांगीतलेतर आम्हांला तुम्ही सांगता जागा ताब्यात नाही, म्हणून आम्हांला काम करता येत नाही असे सांगता. मग तुम्ही हा महाप्रताप कसा केला हे आम्हांला एकदा कळू दया. प्रसादच्या वॉर्डामध्ये जी परिस्थिती आहे ती जरा पेपरच्या माध्यमातून समोर येवू दया आपण केलेले कारनामे हे आम्ही भोगतोत हे एकदा लोकांना कळू दया. सगळया शहराच वाटोळ तुम्हीच केलय. घरकुलाच तुम्हीच वाटोळ केलय, झोपडपट्टीच तुम्हीच वाटोळ केलय. आमच्या नावावर हे फाडायचे. नगरसेवकांना बदनाम करतात यांच्या पहिल्यांदा चुका कळू दयात काय प्रकार आहे तो कळू दया.

**मा.राजन पाटिल (सह.शहर अभियंता) -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. वर्क ऑर्डर देताना काम करणारे जे अधिकारी होते त्यांची माहिती घेवून मी सांगतो.

(गोंधळ)

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, आम्हांला आता माहिती दयावी, एकदा कळू दया काय आहे ते, "दुधका दुध आणि पाणी का पाणी" एकदा होवु दया.

**मा.राजन पाटिल (सह.शहर अभियंता) -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. वर्क ऑर्डर देताना काम करणारे जे अधिकारी होते ते शहर अभियंता मा.उगिले साहेब होते, कार्यकारी अभियंता सवणे साहेब होते व मा.आयुक्त शर्मा साहेब होते.

**मा.सवणे (कार्यकारी अभियंता) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. २०११ साली जेंव्हा निवीदा काढली तेंव्हा जेएनएनयुआरएमचा हा प्रकल्प मंजूर असल्यामुळे निवीदा काढण्यात आली होती. निवीदा काढत असताना एकूण ८० टक्के जागा ताब्यात होती. फक्त नदीच्या पलीकडे काळेवाडी भागातील जागा ताब्यात नव्हती आणि इकडे रॅम्पसाठी लागणारी सुखवाणीची जागा फक्त ताब्यात नव्हती. बाकी सर्व जागा ताब्यात होती त्यामुळे निवीदा काढण्यात आली होती.

**मा.दत्तात्रय साने-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपली टोटल जागा किती आहे हे सांगा. टोटल त्या ब्रीजचं अंतर आणि सबवेच अंतर सांगा.

**मा.सवणे (कार्यकारी अभियंता)-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या पुलाची लांबी एकूण १६०० मी. आहे त्यापैकी नदीच्या पलीकडे १८० मी.जागा रॅम्पसाठीची आपल्या ताब्यात नव्हती. आणि इकडे साडेसात मी. बाय साठ मी. लांबीची जागा ताब्यात नव्हती.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ज्यावेळेस तुम्ही टेंडर अटिमध्ये टाकल. तशी तुमची ८० टक्केची पुर्तता होती का. १०० टक्केच तुम्ही टेंडर काढलेल आहे. मग ८० टक्केच टेंडर का नाही काढलं.

**मा.सवणे (कार्यकारी अभियंता) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पुलाची निवीदा काढताना शंभर टक्केची काढणं अपेक्षीत होतं. कारण तसं अर्धवट कामाची निवीदा काढणे शक्य नव्हते.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, देहू-आळंदीला कसं अर्धवट काढलं.

**मा.सवणे (कार्यकारी अभियंता)-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. देहू-आळंदी रस्त्याचे काम करत असताना फक्त रस्त्याचे डांबरीकरण आदि करुन घ्याव आणि नंतर फुटपाथ कराव असा निर्णय झाला होता.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हे दोन समोरासमोरचे उदाहरण देतो. एक निवीदा १०० टक्के काढली आणि ८० टक्के जागा ताब्यात आहे आणि देहू-आळंदीत १०० टक्के जागा तुमच्या ताब्यात आहे त्याठिकाणी निवीदा पुर्ण नाही, असं का. फसवतय कोण? अधिकारी. उदया आम्हांला नागरीकांना तोंड दयायला लागतात. तुमचा नियम आहे जोपर्यंत १०० टक्के जागा ताब्यात येत नाही. मा.श्रीकर परदेशी होते त्यावेळेस सुध्दा हाच नियम होता. मग या नियमामध्ये सवलत कशासाठी आली. यांचा काळाबाजार सभागृहासमोर एकदा येऊ दया. तुम्हांला काय अधिकार आहेत. तुम्ही निवीदेमध्ये असे लिहीले आहे का की ८० टक्के जागा ताब्यात असताना आम्ही १०० टक्केची निवीदा काढू म्हणून. ६ एप्रिल २०११ ते २०१३ पर्यंत त्याची मुदत होती. ८० टक्के जागा ताब्यात आहे हे पण आम्हांला मान्य आहे. ८० टक्के जागा ताब्यात असताना त्याना ४८ कोटी रुपये दिलेले

असताना मग त्याच काम कमी का. हा प्रश्न कुठल्या अधिका-यांनी कधी विचारला का? ८० टक्के जागा ताब्यात आहे, आज काम चालू आहे का?

**मा.राजन पाटिल (सह.शहर अभियंता) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. कालपासून काल आणि आज दोन दिवस काम बंद आहे लेबर स्ट्राईक असल्यामुळे शंभर लोक त्याठिकाणी काम करत नाहीत. लेबरपेमेंटचा कंपनीचा प्रश्न सुटत नाही त्यामुळे काम बंद आहे. दोन दिवस झाले काम बंद आहे ही सद्यस्थिती आहे. आपण त्यांना टर्मिनेट करण्यासाठी जे आवश्यक कलम आहेत त्याची आपण पुर्तता केलेली आहे. ऑफिशीअल प्रोसेस पुर्ण झालेली आहे. पंधरा दिवसाची एक शेवटची नोटीस असते ती देवून त्यांना आपण काढू शकू. मा.आयुक्तांना विचारुन पुढील कार्यवाही करु.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. त्यांचा टाईम लिमीट नियमानुसार संपलेला आहे, मुदतवाढ संपलेली आहे. मग का थांबले. कशामुळे थांबले. त्याची मुदतवाढ संपलेली आहे, त्याचा टाईमबॉण्ड संपलेला आहे मग का आपण थांबलोत. त्यांच्यावर गुन्हा दाखल करा, ब्लॅकलीस्ट करा. जेवढे त्यानी आपल्याकडून कामाच्या पध्दतीचे पैसे जास्ती घेतलेले असेल त्याचे डिपॉझीट जे असेल ते जप्त करा. जोपर्यंत त्याला ब्लॅकलीस्ट करत नाहीत, त्याच डिपॉझीट आपण जप्त करत नाहीत तोपर्यंत ही सभा येथून पुढे चालणार नाही असं आम्ही सर्व नगरसेवकांच्या वतीने सांगतो. ही सभा सोमवार दि.१६/११/२०१५ दुपारी २.०० पर्यंत तहकूब करावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.प्रसाद शेट्टी -** मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. महापौर साहेब, आपण असे आदेश दयावेत की गॅमन इंडियाचे जे काही असेल ते जप्त करुन त्यांना ब्लॅकलीस्टला टाकावे असे आदेश दयावेत.

**मा.महापौर -** गॅमन इंडिया या कंपनीचा निषेध करुन त्यांना ब्लॅकलीस्टला टाकावे असे मा.आयुक्तांना आदेश देवून आजची सभा सोमवार दिनांक १६/११/२०१५ रोजी दुपारी २.०० पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

------

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)

**महापौर**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक - ५०**

**सभावृत्तांत**

**(दि.२०/१०/२०१५ (दु. २.०० व २.२५) ची तहकूब सभा )**

दिनांक - १६.११.२०१५ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०/१०/२०१५ ची (दु.२.२५ ची) तहकूब मा.महापालिका सभा सोमवार दि.१६.११.२०१५ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
२. मा.भालेकर अरुणा दिलीप
३. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
४. मा.सायकर अजय शंकरराव
५. मा.जाधव साधना रामदास
६. मा.जाधव राहुल गुलाब
७. मा.आल्हाट मंदा उत्तम
८. मा.काळजे नितीन प्रताप
९. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१०. मा.बाबर शारदा प्रकाश
११. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१२. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
१३. मा.तानाजी विठ्ठल खाडे
१४. मा.बो-हाडे शुभांगी संजय
१५. मा.आर.एस.कुमार
१६. मा.जावेद रमजान शेख
१७. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

१८. मा.पांढरकर निलेश शंकरराव

१९. मा.राजू मिसाळ

२०. मा.नेटके सुमन राजेंद्र

२१. मा.तरस बाळासाहेब जयवंत

२२. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

२३. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

२४. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

२५. मा.अनंत सुभाष को-हाळे

२६. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

२७. मा.पवार मनीषा काळूराम

२८. मा.प्रसाद शेट्टी

२९. मा.काळभोर वैशाली जालिंदर

३०. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

३१. मा.वाबळे संजय मल्हारराव

३२. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

३३. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

३४. मा.मोहिनीताई विलास लांडे

३५. मा.अजित दामोदर गव्हाणे

३६. मा.गोफणे अनुराधा देविदास

३७. मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

३८. मा.लोंढे शुभांगी संतोष

३९. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

४०. मा.ननवरे जितेंद्र बाबा

४१. मा.सावळे सिमा रविंद्र

४२. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

४३. मा.भोसले राहूल हनुमंतराव

४४. मा.पालांडे सुजाता सुनिल

४५. मा.बहल योगेश मंगलसेन

४६. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

४७. मा.कदम सदगुरु महादेव

४८. मा.गिता सुशील मंचरकर

४९. मा.कैलास महादेव कदम

५०. मा.टाक अरुण मदन

५१. मा.वाघेरे सुनिता राजेश

५२. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

५३. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

५४. मा.काळे विमल रमेश

५५. मा.विनोद जयवंत नढे

५६. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

५७. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

५८. मा.बारणे निलेश हिरामण

५९. मा.बारणे माया संतोष

६०. मा.ओव्हाळ शेखर अशोक

६१. मा.यमुनाताई रमणनाना पवार

६२. मा.कलाटे स्वाती मयुर

६३. मा.चौंधे आरती सुरेश

६४. मा.बोकड रामदास गेणभाऊ

६५. मा.जवळकर वैशाली राहु ल

६६. मा.जगताप राजेंद्र गणपत

६७. मा.शितोळे शैलजा बाबुराव

६८. मा.जगताप नवनाथ दत्तु

६९. मा.प्रशांत शितोळे

७०. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

७१. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

७२. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

७३. मा.शेंडगे आशा सुखदेव

७४. मा.मोटे किरण बाळासाहेब

७५. मा.संजय केशवराव काटे

७६. मा.पाटील सुजित वसंत

७७. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.तानाजी शिंदे- अतिरिक्त आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा.पाटील, मा.तुपे - सहशहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.माने, मा.खांडकेकर, मा.दुरगुडे - सहा.आयुक्त, मा.पवार - कायदा सल्लागार, मा.दुधेकर, मा.पठाण, मा.शेख - कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.सुजाता पालांडे -** सभा भरविणेसाठी नेमलेल्या वेळी मा.महापौर व मा.उपमहापौर हे सभागृहात उपस्थित नसल्यामुळे आजच्या सभेचे अध्यक्षस्थान माशमीम पठाण यांनी स्विकारावे अशी सूचना मी मांडते.

**मा.प्रतिभा भालेराव -** सुचनेस अनुमोदन देते.

(मा.शमीम पठाण यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

**मा.पिठासीन प्राधिकारी-** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. नगरसेवक, नगरसेवीका, अधिकारी वर्ग, पत्रकार. आपल्या सभागृहातील सन्मासदस्य आणि स्थायी समितीचे सदस्य सन्मा. प्रसाद शेट्टी यांचा आज वाढदिवस असल्याने सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिष्टचिंतन करण्यात यावे. त्यांना आयुष्य लाभो, त्यांच्या हातून चांगले कार्य होओ अशा मी शुभेच्छा देवून सभागृहाच्या वतीने त्यांना पुष्पगुच्छ देवून त्यांचा सत्कार करण्यात यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.संजय काटे -** मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

(मा.पिठासीन प्राधिकारी, मा.सभागृहनेते, मा.विरोधी पक्षनेते, मा.स्थायी समिती सभापती, सर्व गटनेते व पदाधिकारी यांचे हस्ते मा.प्रसाद शेट्टी यांचा वाढदिवसानिमीत्त पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.)

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, फ्रान्स येथील पॅरीसमध्ये दहशतवादी हल्ल्यात मृत्युमूखी पडलेले नागरीक तसेच ओ.पी. मेहरा, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल व माजी हवाईदल प्रमूख यांचे निधन, लेखिका कमला लक्ष्मण, ज्येष्ठ व्यंगचित्रकार आर.के. लक्ष्मण यांच्या पत्नी यांचे निधन, सविता शर्मा, पिंपरी चिंचवडचे माजी आयुक्त आशिष शर्मा यांच्या मातोश्री यांचे निधन, सौ.सिधू जनार्धन जाधव, पिंपरी चिंचवड श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष व

ज्येष्ठ पत्रकार जयंत जाधव यांच्या मातोश्री यांचे निधन, बु.देवचंद गबा बाविस्कर, किवळे येथील सामाजिक कार्यकर्ते यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.कैलासभाऊ थोपटे-** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.पिठासीन प्राधिकारी -** श्रध्दांजलीसाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, आजची सभा शुक्रवार दिनांक २०/११/२०१५ रोजी दुपारी १.०० पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडते.

**मा.प्रतिभा भालेराव -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

**मा.पिठासीन प्राधिकारी -** उपस्थित सर्व सन्मा.सदस्यांच्या भावना विचारात घेवुन आजची सभा शुक्रवार दि.२०/११/२०१५ रोजी दुपारी १.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

**(शमीम पठाण)**
**पिठासीन प्राधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक - ५०**

**सभावृत्तांत**

**(दि.२०/१०/२०१५ (दु. २.०० व २.२५) व दि.१६/११/२०१५ ची तहकूब सभा )**

दिनांक - २०.११.२०१५ वेळ - दुपारी १.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.१६/११/२०१५ ची तहकूब मा.महापालिका सभा शुक्रवार दि.२०.११.२०१५ रोजी दुपारी १.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
२. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
३. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
४. मा.भालेकर अरुणा दिलीप
५. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
६. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
७. मा.थोरात वनिता एकनाथ
८. मा.सायकर अजय शंकरराव
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.जाधव राहुल गुलाब
११. मा.आल्हाट मंदा उत्तम
१२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१३. मा.काळजे नितीन प्रताप
१४. मा.जगदीश शेट्टी
१५. मा.बाबर शारदा प्रकाश
१६. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१७. मा.उल्हास शेट्टी

१८. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

१९. मा.पवार संगीता शाम

२०. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२१. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२२. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२३. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२४. मा.भारती फरांदे

२५. मा.आर.एस.कुमार

२६. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

२७. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२८. मा.पांढरकर निलेश शंकरराव

२९. मा.राजू मिसाळ

३०. मा.नंदा विकास ताकवणे

३१. मा.नेटके सुमन राजेंद्र

३२. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३३. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३४. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३५. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३६. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३७. मा.लोंढे गणेश नारायण

३८. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३९. मा. ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

४०. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४१. मा.अपर्णा निलेश डोके

४२. मा.अनंत सुभाष को-हाळे

४३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४४. मा.जयश्री वसंत गावडे

४५. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४६. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४७. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

४८. मा.वाबळे संजय मल्हारराव

४९. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५०. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५१. मा.सुपे आशा रविंद्र

५२. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५३. मा.मोहिनीताई विलास लांडे

५४. मा.अजित दामोदर गव्हाणे

५५. मा.गोफणे अनुराधा देविदास

५६. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

५७. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

५८. मा.महेशदादा किसन लांडगे

५९. मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६०. मा.लोंढे शुभांगी संतोष

६१. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६२. मा.सावळे सिमा रविंद्र

६३. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६४. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६५. मा.पालांडे सुजाता सुनिल

६६. मा.बहल योगेश मंगलसेन

६७. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

६८. मा.कदम सदगुरु महादेव

६९. मा.गिता सुशील मंचरकर

७०. मा.कैलास महादेव कदम

७१. मा.छाया जगन्नाथ साबळे

७२. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७३. मा.टाक अरुण मदन

७४. मा.आसवाणी सविता धनराज

७५. मा.वाघेरे सुनिता राजेश

७६. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७७. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७८. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७९. मा.काळे विमल रमेश

८०. मा.विनोद जयवंत नढे

८१. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८२. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८३. मा.विमलताई सुरेश जगताप

८४. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८५. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदू बारणे

८६. मा.बारणे माया संतोष

८७. मा.ओव्हाळ शेखर अशोक

८८. मा.यमुनाताई रमणनाना पवार

८९. मा.कलाटे स्वाती मयुर

९०. मा.चौंधे आरती सुरेश

९१. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९२. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९३. मा.जवळकर वैशाली राहुल

९४. मा.जगताप राजेंद्र गणपत

९५. मा.शितोळे शैलजा बाबुराव

९६. मा.जगताप नवनाथ दत्तु

९७. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

९८. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

९९. मा.जम सोनाली पोपट

१००. मा.प्रशांत शितोळे

१०१. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

१०२. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१०३. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१०४. मा.शेंडगे आशा सुखदेव

१०५. मा.मोटे किरण बाळासाहेब

१०६. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

१०७. मा.संजय केशवराव काटे

१०८. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१०९. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

११०. मा.पाटील सुजित वसंत

१११. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

११२. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव - आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर -मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा.पाटील, मा.तुपे - सहशहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.कडूसकर, मा.गायकवाड, मा.माने, मा.खांडकेकर, मा.फुंदे, मा.दुरगुडे, मा.खोसे, मा.इंदलकर - सहा.आयुक्त, मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.पठाण, मा.घोडे, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गद्दूवार, मा.शेख, मा.गायकवाड - कार्यकारी अभियंता, मा.लावंड-कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.गोरक्ष लोखंडे -** सभा भरविणेसाठी नेमलेल्या वेळी मा.महापौर व मा.उपमहापौर हे सभागृहात उपस्थित नसल्यामुळे आजच्या सभेचे अध्यक्षस्थान मा.तानाजी खाडे यांनी स्विकारावे अशी सूचना मी मांडतो.

**मा.निलेश पांढरकर -** सुचनेस अनुमोदन देतो.

(मा.तानाजी खाडे यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

**मा.पिठासीन प्राधिकारी -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.गोरक्ष लोखंडे -** मा.महापौर साहेब, अशोक सिंघल-ज्येष्ठ नेते, कर्नल संतोष यशवंत महाडीक-दहशतवाद्यांसोबत झालेल्या चकमकीमध्ये हुतात्मा झालेले, सईद जाफरी -ज्येष्ठ अभिनेते, नामदेव दगडू साने -शहर सुधारणा समिती सभापती स्वाती साने यांचे सासरे व सामाजिक कार्यकर्ते यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.निलेश पांढरकर -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.पिठासीन प्राधिकारी -** श्रध्दांजलीसाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.गोरक्ष लोखंडे** - मा.महापौर साहेब, ही सभा आज दुपारी १.२० पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.निलेश पांढरकर -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.पिठासीन प्राधिकारी -** उपस्थित सर्व सन्मा.सदस्यांच्या भावना विचारात घेवुन ही सभा दि.२०/११/२०१५ रोजी दुपारी १.२० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

(**तानाजी खाडे**)
**पिठासीन प्राधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक - ५०**

**सभावृत्तांत**

**(दि.२०/१०/२०१५ (दु. २.०० व २.२५), दि.१६/११/२०१५ व दि.२०/११/२०१५ (दु.१.००) ची तहकूब सभा )**

दिनांक - २०.११.२०१५ वेळ - दुपारी १.२० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०/११/२०१५ ची (दु.१.००ची) तहकूब मा.महापालिका सभा शुक्रवार दि.२०.११.२०१५ रोजी दुपारी १.२० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
२. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
३. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
४. मा.भालेकर अरुणा दिलीप
५. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
६. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
७. मा.थोरात वनिता एकनाथ
८. मा.सायकर अजय शंकरराव
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.जाधव राहुल गुलाब
११. मा.आल्हाट मंदा उत्तम
१२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१३. मा.काळजे नितीन प्रताप
१४. मा.जगदीश शेट्टी
१५. मा.बाबर शारदा प्रकाश
१६. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

१७. मा.उल्हास शेट्टी

१८. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

१९. मा.पवार संगीता शाम

२०. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२१. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२२. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२३. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२४. मा.भारती फरांदे

२५. मा.आर.एस.कुमार

२६. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

२७. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२८. मा.पांढरकर निलेश शंकरराव

२९. मा.राजू मिसाळ

३०. मा.नंदा विकास ताकवणे

३१. मा.नेटके सुमन राजेंद्र

३२. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३३. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३४. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३५. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३६. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३७. मा.लोंढे गणेश नारायण

३८. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३९. मा. अॅड.संदीप गुलाब चिंचवडे

४०. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४१. मा.अपर्णा निलेश डोके

४२. मा.अनंत सुभाष को-हाळे

४३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४४. मा.जयश्री वसंत गावडे

४५. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४६. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४७. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

४८. मा.वाबळे संजय मल्हारराव

४९. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५०. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५१. मा.सुपे आशा रविंद्र

५२. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५३. मा.मोहिनीताई विलास लांडे

५४. मा.अजित दामोदर गव्हाणे

५५. मा.गोफणे अनुराधा देविदास

५६. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

५७. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

५८. मा.महेशदादा किसन लांडगे

५९. मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६०. मा.लोंढे शुभांगी संतोष

६१. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६२. मा.सावळे सिमा रविंद्र

६३. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६४. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६५. मा.पालांडे सुजाता सुनिल

६६. मा.बहल योगेश मंगलसेन

६७. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

६८. मा.कदम सदगुरु महादेव

६९. मा.गिता सुशील मंचरकर

७०. मा.कैलास महादेव कदम

७१. मा.छाया जगन्नाथ साबळे

७२. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७३. मा.टाक अरुण मदन

७४. मा.आसवाणी सविता धनराज

७५. मा.वाघेरे सुनिता राजेश

७६. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७७. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७८. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७९. मा.काळे विमल रमेश

८०. मा.विनोद जयवंत नढे

८१. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८२. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८३. मा.विमलताई सुरेश जगताप

८४. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८५. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदू बारणे

८६. मा.बारणे माया संतोष

८७. मा.ओव्हाळ शेखर अशोक

८८. मा.यमुनाताई रमणनाना पवार

८९. मा.कलाटे स्वाती मयुर

९०. मा.चौंधे आरती सुरेश

९१. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९२. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९३. मा.जवळकर वैशाली राहुल

९४. मा.जगताप राजेंद्र गणपत

९५. मा.शितोळे शैलजा बाबुराव

९६. मा.जगताप नवनाथ दत्तु

९७. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

९८. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

९९. मा.जम सोनाली पोपट

१००. मा.प्रशांत शितोळे

१०१. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

१०२. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१०३. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१०४. मा.शेंडगे आशा सुखदेव

१०५. मा.मोटे किरण बाळासाहेब

१०६. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

१०७. मा.संजय केशवराव काटे

१०८. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१०९. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

११०. मा.पाटील सुजित वसंत

१११. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

११२. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव - आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर -मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा.पाटील, मा.तुपे - सहशहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.कडूसकर, मा.गायकवाड, मा.माने, मा.खांडकेकर, मा.फुंदे, मा.दुरगुडे मा.खोसे, मा.इंदलकर - सहा.आयुक्त, मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.पठाण, मा.घोडे, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गद्दूवार, मा.शेख, मा.गायकवाड - कार्यकारी अभियंता, मा.लावंड-कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.गोरक्ष लोखंडे -** सभा भरविणेसाठी नेमलेल्या वेळी मा.महापौर व मा.उपमहापौर हे सभागृहात उपस्थित नसल्यामुळे आजच्या सभेचे अध्यक्षस्थान मा.तानाजी खाडे यांनी स्विकारावे अशी सूचना मी मांडतो.

**मा.निलेश पांढरकर -** सुचनेस अनुमोदन देतो.

(मा.तानाजी खाडे यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

**मा.पिठासीन प्राधिकारी -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १

दिनांक- २०/११/२०१५

विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.कैलासभाऊ थोपटे, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव...

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१२५४३ दि. २२/९/२०१५

सर्व क्षेत्रीय कार्यालय व उद्यान विभागाकडून सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकातील "उर्जा बचतीची उपकरणे व स्ट्रीट लाईट नुतनीकरण करणे" व "सार्वजनिक सुरक्षितता" आणि "उद्याने" या लेखाशिर्षावरील कामाअंतर्गत एल.ई.डी. फिटींग्जची मागणी व त्याकरीता आवश्यक तरतूदीसह दिलेल्या माहीतीनुसार, सर्व क्षेत्रीय कार्यालय व उद्यान या विभागांकडून केलेल्या मागणीनुसार सदर कामात वेगवेगळ्या क्षमतेचे एल.ई.डी. फिटींग्जसाठी खालील नमूदनुसार खर्च अपेक्षित आहे. क्षेत्रीय कार्यालय व उद्यान विभागाकडून सदर नमूद लेखाशिर्षावर एल.ई.डी. फिटींग्जसाठी राखून ठेवलेली उपलब्ध तरतूदीतून सदर खर्च करता येईल. कामांचे वर्गीकरण करताना प्रपत्र १, २ व ३ अन्वये वाढ/घट तक्त्यानुसार करणेत आलेली आहे.

| अ. क्र. | सन २०१५-१६ अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष | नव्याने नमूद कामाचे नांव | वर्गीकरण करावयाचे लेखाशिर्ष | वर्गीकरण करावयाची प्रशा. मान्यता | वर्गीकरण करावयाची तरतूद (वाढ-घट तक्त्यानुसार) |
|---|---|---|---|---|---|
| १ | उर्जा बचतीची उपकरणे व स्ट्रीट लाईट नूतनीकरण | अ,ब,क,ड,ई व फ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील विभागातील जुन्या सो.व्हे. फिटींग्ज काढून उर्जा बचतीकामी एल.ई.डी. फिटींग्ज खरेदी करणे. | उर्जा बचतीची उपकरणे व स्ट्रीट लाईट नूतनीकरण करणे. | ५,३०,००,००० | ४,९४,२४,१०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | सार्वजनिक सुरक्षितता | अ,ब,क,ड,ई व फ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील लेखाशिर्षावरील कामांकरीता मागणीनुसार उर्जाबचतीकामी मध्यवर्ती भांडारामार्फत एल.ई.डी. फिटींग्ज खरेदी करणे. | मध्यवर्ती भांडार विद्युत साहित्य खरेदी | १,२०,००,००० | १,११,९६,००० |
| ३ | उद्यान विद्युत | उद्यान/भु.ग.यो./ज.शु.कें. मधील विद्युत कामांकरीता मागणीनुसार उर्जाबचतीकामी एल.ई.डी. फिटींग्ज खरेदी करणे. | उद्यान विद्युत | ४७,००,००० | ४३,५५,२०८ |
| | | एकूण | | ६,९७,००,००० | ६,४९,७५,३०८ |

सबब उपरोक्त नमूदप्रमाणे सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकात “उर्जा बचतीची उपकरणे व स्ट्रीट लाईट नुतनीकरण करणे” व “सार्वजनिक सुरक्षितता” आणि “उद्याने” या लेखाशिर्षाअंतर्गत विविध प्रकारच्या एल.ई.डी. फिटींग्ज खरेदीकामी उपरोक्त नमूद तीन नविन कामांचा समावेश करुन कामांसाठी लागणारी तरतूद व शिल्लक तरतूद यानुसार वाढ/घट तक्त्यानुसार (प्रपत्र १, २ व ३) नमूद लेखाशिर्षानिहाय वर्गीकरण करणेस व त्याकरीताच्या कामास व खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.पौर्णिमा सोनवणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.शुभांगी बो-हाडे -** मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ७५६ विषय क्रमांक - १

दिनांक - २०/११/२०१५ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.कैलासभाऊ थोपटे, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव...
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१२५४३ दि. २२/९/२०१५

विषय क्रमांक १ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २

दिनांक- २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.कैलासभाऊ थोपटे, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव...
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१२५४४ दि. २२/९/२०१५

जलक्षेत्र क्र.ड/६ जुनी सांगवी गावठाण येथे जुनी ६ ल.लि. क्षमतेची उंच टाकी पाडून नविन १५ लक्ष क्षमतेची उंच टाकी बांधणे हे काम मे.विजय व्ही. साळुंखे, पुणे या संस्थेमार्फत चालू असून सदर कामाची मुदत १८ महिने (३१-०४-२०१६ पर्यंत) आहे. परंतू सदर कामासोबतच इतर अनुषंगिक (स्थापत्य व पाणीपुरवठा विषयक) कामे सुद्धा होणे गरजेचे असल्याने व सदर अतिरिक्त कामांचे नवीन निविदा प्रक्रिया होणेस वेळ लागणार असलेने, कामाची निकड लक्षात घेवून मे.विजय व्ही. साळुंखे यांचा पुर्वानुभव चांगला असल्याने मेविजय व्ही. साळुंखे यांना सदरची अतिरिक्त कामे टाकीचे बांधकामासोबतच करणेसाठी व त्यासाठी येणा-या र.रु.सत्याहत्तर लाख पर्यंतचे (र.रु.७७,००,०००/-) प्रत्यक्ष खर्चास (चालू निविदा दराने) मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर कामाची उपलब्ध असणारी २०१५-१६ ची मूळ तरतूद (३०,००,०००/-) अपुरी असल्याने सदर कामाच्या सुधारित तरतुदीस (र.रु.१,००,००,०००/-) मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.गोरक्ष लोखंडे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- वेणुनगर वाकड येथे २५ ल.लि. उंच पाण्याची टाकी बांधणेचे कामाचा अंतर्भाव पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंदाजपत्रक सन २०१५-१६ मध्ये पान क्र.४७० अ.क्र.१९ वर करणेत आला आहे व त्याची अंदाजपत्रकीय रक्कम रु.२,००,००,०००/- रक्कमेस प्रशासकीय मान्यता ठराव क्र. ६६३ दि.०६/०४/२०१५ अन्वये मिळालेली आहे. परंतु, सदर कामाचे अंदाजपत्रक MJP दरसुचीनुसार तयार करणेत आले असुन त्यास रक्कम रु. ३,५०,००,०००/- इतकी अंदाजपत्रकीय रक्कम येत आहे. सदर काम करणेसाठी आवश्यक तरतुद पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका कोषागारात रक्कम रु १,६५,२७,१६५/- जमा केली आहे व उर्वरित रक्कम रु.१,६५,२७,१६५/- पुढील हप्त्यात जमा करणार आहेत. तरी सदर कामास रक्कम रु.३,५०,००,०००/- सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.निलेश पांढरकर -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.किरण मोटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सदस्य. आता आमच्यासमोर पाणीपुरवठा संदर्भातील हा विषय आलेला आहे. पाण्याची टाकी बांधण्यासाठी उपसूचना सुध्दा दिलेली आहे या विषयाला विरोध नाही परंतु या पाण्याच्या टाक्या बांधल्यानंतर या टाक्या भरण्याचे काम कोण करणार हा मुळात मुद्दा आहे कारण माझ्या वॉर्डात पाण्याची टाकी बांधून तीन ते चार वर्षे झाले ती तयार आहे. काही दिवस ड प्रभागाकडून पाणीपुरवठा होत होता. दोन तीन महिने एक दिवसा आड पाणी देवून चालली. गेल्या चार वर्षापासून पाण्याची टाकी तशाच पध्दतीने उभी आहे. लोक रोज त्याच्याकडे बोट दाखवतात. कधी पाणी नसते, आता रिपेअरींगचे काम चालू आहे. प्रकर्षाने सर्व नागरीकांकडून आम्हांला तो प्रश्न विचारला जातो. जर तुम्हांला पाणीपुरवठा करायचा नव्हतातर ती पाण्याची टाकी बांधली का? काही तांत्रीक अडचणी आहेत असे आम्हांला वेळोवेळी सांगीतले जाते मी पण पाठपुरावा घेतो, आम्ही एकत्र काम करतो परंतु ती पाण्याची टाकी भरण्यासाठी सात-आठ महिन्या पुर्वी टेंडर काढले. मग चार वर्षापुर्वी तुम्ही ज्यावेळेला टाकी बांधली त्यावेळेस ती टाकी भरण्यासाठी पण तुम्ही यंत्रणा डेव्हलप करायला पाहिजे हे का आमच्या लक्षात येत नाही. नियोजन करताना अशा पध्दतीने व्यवस्थित नियोजन केले पाहिजे. नुसती वास्तू उभी करुन त्याचा उपयोग काही झालेला नाही. आता या टाक्या भरत असताना अशी अपेक्षा आहे पहिल्यांदा त्याच्यात जाणा-या पाईपलाईन, त्याला मिळणारे पाणी याचे सुध्दा कॅलक्यूलेट करावे आणि कासारवाडीची पाण्याची टाकी लवकरात लवकर पुढच्या जीबीच्या अगोदर तरी चालू करावी, धन्यवाद.

**मा.कैलासभाऊ थोपटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, पत्रकार. आता याठिकाणी पाण्याच्या टाकीचा विषय आलेला आहे. पाण्याचा टाकीचा विषय खुप चांगला आहे

पण आपण शहरात पाणी वाटप करताना अजादुजाची भावना करत आहोत. मी माझ्या प्रभागामध्ये गेल्या आठ वर्षापासून पाहत आहे एक टाईम पाणी आम्हांला देत आहेत. ब-याचशा भागामध्ये एक टाईम पाणी दिलेले आहे त्यामध्ये असे काही भाग आहेत की, काही भागात अजूनही दोन टाईम पाणी देत आहोत. ज्याठिकाणी दोन टाईम पाणी देतो त्याठिकाणचा व इतर सर्व ठिकाणचा प्रॉपर्टी टॅक्स सारख्याच पध्दतीने घेतो मग पाणी सुध्दा त्या पध्दतीने दिले पाहिजे. काही भागामध्ये अजूनही दोन टाईम पाणी का देता दयायचं असेलतर संपुर्ण शहराला दोन टाईम पाणी दयावे नाहीतर संपुर्ण शहरालाच एक टाईम पाणी दया अशी माझी सूचना आहे, धन्यवाद.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा.तानाजी खाडे महापौर पदावर बसले त्यामुळे आम्हांला सदस्यांपैकी एकालातरी मा.महापौरांनी संधी दिली त्यामुळे महापौरांच्या विदेश दौ-यानिमित्त आभार. कैलासभाऊ थोपटे यांनी आता शहरातील दोन वेळा पाणीपुरवठयाबद्दल सांगीतले. प्रत्येकाच्या प्रभागामध्ये किंबहूना शहरामध्ये चांगली परिस्थिती आज रोजी आहे परंतु महाराष्ट्र राज्यामधील परिस्थिती पाहिलीतर दुष्काळाच वातावरण आणि सावट तुम्ही आम्ही सावरु शकणार नाहीत अशी परिस्थिती आहे. आयुक्त साहेब तुम्ही स्वत: मराठवाडयातील आहात. तुमच्या जिल्हयात, तुमच्या तालुक्यात, परिसरात पुर्णपणे भयानक परिस्थिती आहे. आता माझ्या बरोबर स्विकृत सदस्य शिवाजी पाडुळे येथे मागच्या बाजूला बसलेले आहेत. तीन दिवस गावी जाण्याचा आग्रह केला होता. त्याठिकाणी ऊन्हाचे प्रमाण भयानक आहे त्यात पाणी नाही, उन्हाचा चटका इतका वाईट आहे. आपल्या शहरात तशाप्रकारची परिस्थिती जर भविष्यात नाही पाहिजे असेलतर तुम्हांला नियंत्रण केल पाहिजे. तुम्ही कुठल्याही परिस्थितीत शहरात एका ठिकाणी २४ तास पाणी व एका ठिकाणी दोन वेळेस पाणी एका ठिकाणी तीन वेळा पाणी अशाप्रकारचे नियोजन ठेवता कामा नये असं आम्हांला साधारणपणे अपेक्षीत आहे. मागच्या वर्षी जेव्हा पाणी कपातीच धोरण अवलंबण्याची वेळ आपल्यावर आली त्यावेळेस सर्वच पक्षाचे प्रमुख, सर्व सदस्यांना ती जाणीव होती की आता दुष्काळ १०० टक्के येणार आहे. नशीब चांगल आहे की आपल्या शहरी भागात किंबहूना मावळात पाऊस झाल्यामुळे आपल्या शहरात, आजुबाजूच्या परिसरात चांगली परिस्थिती आहे. पण पिण्याच्या पाण्याच्या व्यतीरीक्त बाहेरतर फार भयानक परिस्थिती आहे. पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत मा.महापौरांनी सुध्दा आयुक्त साहेब आपल्याला सूचना केलेल्या आहेत. केवळ ज्यांनी त्यांनी ज्याचा त्याचा परिसरच बघायचे म्हणलेतर फार अवघड होईल. आमच्या परिसरा विषयी मी तुमच्याशी पन्नास वेळेस बोललो की आमचा परिसर टेलेन आहे, टेलेन आहे. सांगवीला इतकी वाईट परिस्थिती आहे की रावेतपासून पाणी येते ते अंतर आहे पंधरा ते सोळा कि.मी. आहे आणि सगळयात शेवट आमचा भाग आहे. त्यामुळे आम्हांला पाण्याची कमतरता कायमच जाणवत असते. गेल्या काही वर्षामध्ये ज्या सुधारणा झाल्या त्या

सुधारणांमधुन आपली परिस्थिती खरंच चांगली आहे पण एक वेळ पाणी, दोन वेळ पाणी, तीन वेळ पाणी, २४ तास पाणी याच्यामध्ये जर तुम्ही भेदभाव करत बसलेतर मात्र आपल्या शहरात उदयाच्या काळात शंभर टक्के वाईट परिस्थिती झाल्या शिवाय राहणार नाही. आपल्या शहरामध्ये उंच टाक्या झाल्या पाहिजेत, प्रत्येकाला पाणी मिळाल पाहिजे. प्रत्येकजण टॅक्स भरतोय आम्ही तुम्हाला दहा वेळा सुचना केल्या आहेत की पाण्याच्या बीलामध्ये किंवा टॅक्स बीलामध्ये घरटी पाणी बील जाऊ दया. आज सुध्दा आपली परिस्थिती अशी आहे की आपण पाणीपट्टी शंभर टक्के वसुलच करु शकत नाहीत. आता तुमच्याकडचा एलबीटी बंद झालातर तुम्ही काय काय शोधताय विचारायलाच नको, तसं करण्यापेक्षा समान पाण्याचे नियोजन असाव. तुम्ही जर समान टॅक्स लावताय तर, समान पाणी पण दिले गेले पाहिजे. प्रत्येक नागरीकांचा तो मुलभूत हाक्क आहे त्यामुळे सर्वांची मनापासून मागणी आहे उदयाच्या काळात कपातीची वेळ आलीतरी सुध्दा शहरामध्ये एक वेळच पाणी ठेवा. कुठ दुपारी ठेवा, संध्याकाळी ठेवा, सकाळी ठेवा. शहरातील काही भाग असा आहे, या रेल्वे लाईनच्या अलीकडे दोन वेळा पाणी सोडले जाते, आमच्याकडे का सोडले जात नाही. तरी पाण्याचे वाटप समान करावे, पाण्याच नियोजन समान करावे. पाण्याचा येत्या उन्हाळयामध्ये त्रास होणार नाही अशाप्रकारचे नियोजन करावे अशी मी तुम्हांला या सभागृहाच्या वतीने सूचना करतो आणि थांबतो.

**मा.आशा शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ख-या अर्थाने आमचे सहकारी आज व्यासपीठावर महापौर म्हणून विराजमान आहेत तुमचे अभीनंदन. याठिकाणी टाकीचा विषय आणि टाकीचा विषय नसावा असे अजीबात नाही. शहरामध्ये ज्यावेळेस आपण नागरीकांकडून टॅक्स घेतो त्यांना लागणा-या प्रत्येक मुलभूत गरजा म्हणजे त्याला लागणारा रोड असेल, पाणी असेल, लाईट असेल या दैनंदीन गरजा देणे महापालीकेच्या कर्तव्याचा भाग आहे. परंतु कासारवाडीत टाकी आहे त्या टाकीला किमान आपण ९ कोट रुपये खर्च केले आहेत. टाकी बांधणे आणि पाईपलाईनसाठी नदीतून पाईपलाईन घातली वगैरे असा बराच मोठा खर्च आपण त्याच्यावरती केलेला आहे. खर्च केलातरी, नागरीकांना पाणी देण्यासाठी खर्च केला असं गृहीत धरलं. स्थायी समितीला अनेकवेळा विषय मांडलेला त्यावेळेला ती पाईपलाईन पुर्ण झाली. त्यावेळेला शरद जाधव हे आपल्याकडे एक्झिक्युटीव्ह म्हणून जबाबदारी पहात होते. त्याचा संपुर्ण पाठपुरावा केला अगदी रात्री सुध्दा आम्ही त्या साईडवर जावुन पहायचो ती कुठपर्यंत आली वगैरे परंतु रिझल्ट काय, की आमची टाकी कोरडी आहे. कोरडी असते म्हणजे ज्यादिवशी एखादया अधिका-यांना असा दम देवू त्यादिवशी आमची टाकी भरणार. रात्री ११, १२ वाजता आम्ही त्या टाकीच्या जवळ जाऊन उभा रहायच तो रॉड खाली येतो ते बघायचो, नक्की टाकी तीन मीटर भरली का, तीन मीटर भरली का. हे सगळ करण्याबद्दल दुमत नाही परंतु रिझल्ट काय पाचव्या दिवशी आम्ही त्या टाकीकडे बघायला गेलो नाहीतर पुर्ण आमची टाकी रिकामी. परंतु आपल्या पाण्यामध्ये टिडीएस जो असतो पाण्याचा तो डिझॉल्व्हसॉल्ट

किती असला पाहिजे तर साधारणत: ६० ते ८० असला पाहिजे तो सुध्दा आपल्याकडे २०० ते २५० आहे. अधिका-याना विचारल नेमक आपण काय करतो तर त्यांनी सांगीतल की ताई आपण रोज १०० कुटूंबा कडून त्याचा रिपोर्ट घेतो आमचे पाणी कसे आहे त्याचा. मला वाटते आपण सभागृहात १३३ नगरसेवक आहेत आमच्या घरापर्यंत कोणताही अधिकारी वॉटर सँपल घ्यायला आलेला आठवत नाही. एक महिन्यापुर्वी नाशीक फाटयाच्या तेथे पाईपलाईन फुटलेली होती. रात्री ११.०० वाजता एका अधिका-यांना मी फोन करुन सांगीतले की अशी अशी आपली पाईपलाईन लिकेजेस आहे, रस्त्यानी पाणी वाहते आहे तरी त्याचा पाठपुरावा घ्या तर त्यांनी सांगीतले की, ताई ती लाईन आपली नाही, ती लाईन एमआयडीसीची आहे. मग शेवटी एमआयडीसीच्या कर्मचा-याचे/अधिका-यांचे फोन नंबर शोधले आणि त्यांना सांगीतले हा सगळा प्रकार रात्री १.३० वा. पर्यंत प्रोग्राम चालू होता. १.३० वाजता एमआयडीसीचे अधिकारी आले त्यांनी त्यांचा व्हॉल्व्ह वगैरे बंद केला नंतर कळाल की ती लाईन त्यांची नव्हतीच, ती लाईन आपल्याच महापालिकेची होती. मग तेथे कोणी एक्झिक्युटीव्हतर आले नाहीच नाही पण तेथे सगळयाच्यां फोनवरच गप्पा चालू होत्या की ताई असं असं आहे, सांगयच तात्पर्य म्हणजे मी हे कम्प्लेन्ट म्हणून देत नाहीतर पाण्याची आपली इतकी दुरावस्था आहे की आपण लोकांना व्यवस्थित पाणी देवू शकत नाहीत. कासारवाडीचा काही भाग असा आहे की त्याठिकाणी जमिनीमध्ये साधारणात: दिड ते दोन फुट लोकांनी खाली गोल खड्डे केलेले आहेत आणि त्या खड्डयातून मगातून पाणी भरावे लागते. म्हणजे विश्वास बसणार नाही की ती लोक मागील दहा दहा वर्षाच्या खड्डयातून पाणी भरतात. असं तीथ अधिका-यांना दाखवलतर काहीतरी सोल्यूशन निघाल पाहिजे. आपण नुसते २४x७ चे स्वप्न दाखवतो, हे करायचं ते करायच त्याबद्दल दुमत नाही. कोटयावधी रुपये खर्च करायचे आपण आपल्या शाहरासाठी आणि त्यातुन जर आपल्या हाती काहीच लागणार नसेलतर काय उपयोग आहे. आज सुध्दा आमची महिला भगीनी त्या खड्डयातून पाणी भरत असेलतर, जॉब करणारी महिला त्या मगातून पाणी भरु शकते का? पण वर्षानुवर्ष त्या महिला त्याच प्रकारचे काम करतात. आम्ही नगरसेवक काही पगारी कर्मचारी नाहीत आम्ही निश्चितपणे सेवाभावनेतून या महापालिकेत काम करतो परंतु प्रत्येकवेळेला अधिका-यांना आम्ही सगळया गोष्टी सांगायच्या त्यांनी आम्हांला उत्तर न देता आम्ही त्यांना फॉलोअप दयायचा हे कुठपर्यंत आल, कुठपर्यंत आलं हे योग्य नाही. जर की एखादया कामावरती आपण दहा ते पंधरा कोटी रुपये खर्च करत असूतर त्यातून काहीतरी रिझल्ट मिळाला पाहिजे. मग पाण्यासारखा पैसा ओतायचा आणि त्यातून थेंबभरही पाणी मिळत नसेलतर काही गोष्टीकडे आपण गांभीर्याने लक्ष दयावे अशी विनंती आहे.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पाण्याच्या विषयी ब-याचशा सदस्यांनी सांगीतलेले आहे. थोपटे असतील, प्रशांत शितोळे असतील, शेंडगेताई असतील यांनी सांगीतलेले आहे. आपल्या महाराष्ट्रात दुष्काळी परिस्थिती आहे हे आपल्या

सर्वाना माहिती  आहे. गेल्या वर्षी ९० ते १०० टक्के धरण भरलेले असताना सुध्दा आपण चिंचवड साईडला एक टाईम पाणी केले. एक टाईम पाणी केल्यानंतर आमच्या परिसरामध्ये तसेच एक टाईम पाणी आहे. भोसरीमध्ये, पिंपरीमध्ये आणि काही भागामध्ये दोन वेळा आणि काही भागात २४ तास पाणी आहे. आमच्याकडे अशी परिस्थिती असताना आम्ही नागरीकांना सुध्दा सांगतो की आपल्याला पाणी जपून वापरायचे आहे. संपुर्ण प्रभागामध्ये आणि सोसायटीमध्ये मी स्वत: मिटींग घेतल्या आणि त्याठिकाणी आम्ही पाण्याचे महत्व नागरीकांना पटवून दिले. परंतु ज्यावेळेला आपण सगळया प्रभागामध्ये, पिंपरी आणि चिंचवड मतदारसंघामध्ये नियम लागू करतो त्यावेळेला पुर्ण ठिकाणी नियम सारखे असावेत. पुर्वी नदीच्या पलीकडचे गाव आणि नदीच्या आलीकडचे गाव असे होते तसे पाण्याच्या संदर्भात आता होवू लागलेले आहे. पाण्याची एवढी काटकसर करत असताना आपला नियम आहे की माणसी १५० ली. पाणी असे असताना सुध्दा आमच्या पिंपळेगुरवला एक लाख लोकवस्ती आहे त्याठिकाणी आज सुध्दा २० लाख ली. पाणी कमी मिळते. मी आपल्याला सांगीतलेले आहे आता थंडीचे दिवस आहेत, आपल्याकडचे स्विमींग टॅंक बंद करावेत स्विमींग टॅंकला किमान १० हजार ली. पाणी लागते. ते पाणी बंद केलेतर नागरीक समजावून घेवू शकतात.  त्याठिकाणी पाणी भरपुर लागते.  सर्व ठिकाणी नियम सारखे करावेत. २० टक्के पाण्याची गळती असेलतर, कालच कळाल की चिंचवडची लाईन फुटली त्यामुळे दोन चार दिवस डिस्टर्ब होतात पाणी व्यवस्थीत येत नाही. अशी परिस्थिती असताना शहराचा विचार करताना निश्चितपणे सर्वांना सारखे नियम लावावेत. लोकांना आम्ही कॅलक्यूलेशन करुन सांगीतले ते लोकांना पटले आमच्या परिसरात तर २० लाख ली. पाण्याची कमी आहे. आम्ही म्हणत नाही २० लाख ली. वाढवून दया फक्त नागरीकंना पाणी मिळतय एवढच आम्ही पाहतो. पाणी सर्वाना कसं जास्त येईल आणि शहरात सर्वठिकाणी समान पाणी कसे मिळेल एवढेच बघावे, धन्यवाद.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह प्रथमत: सगळयानी आपल अभिनंदन केलेल आहे. महापौर साहेब, आपल्या महापौर  स्पेनला गेलेल्या आहेत असं मी वर्तमानपत्रामध्ये वाचलं. त्यामुळे आता स्मार्टसिटी होईल अशी अपेक्षा बाळगायला काही हरकत नाही. दुसर म्हणजे उपमहापौर नेहमीच इच्छूक असतात या खुर्चीवर बसायला परंतु विदेश दौ-यात सगळयात पुढे ते असतात त्यामुळे त्यांनाही कधी संधी प्राप्त होत नाही पण आपल्या नशीबात ते आहे आणि आमच्या शेजारच्या वॉर्डामध्ये तुम्ही आहात त्यामुळे आम्हांलाही अभिमान आहे की महापौर पदावर बसण्याची आपल्याला मंगलाताईनी संधी दिलेली आहे. आज खरंतर पाण्याची चर्चा आहे. आपल्याकडे पाणी नाही अशी परिस्थिती अजीबात नाही परंतु सगळयानी सांगीतलेल आहे की नियोजन, आणि नियोजनाचा अभाव एकीकडे २४x७ असं म्हणलं जातं, नेहमी माझ्या वॉर्डाकडे बोट दाखविले जाते परंतु त्याच्यावरती सांगून सांगून सगळे थकले की ते का केले, प्रायोगीक तत्वावर झालेला तो विषय आहे. आज जगामध्ये युध्द

व्हायचे असेलतर ते पाण्यामुळे होईल असे जाणकार लोक सांगतात. परंतु आपल्या सगळयांच्या मेहरबानीनी शहरातच वॉर्डा वॉर्डातच पाण्यासाठी युध्द होईल की काय अशी परिस्थिती जर आपण निर्माण केली, जस म्हणल की पाण्याची एकीकडे एक टाईम परिस्थिती, एकीकडे दोन टाईम तर अशाप्रकारच नियोजन का होतय याच्यावर चर्चा होते पण याच्यावर गांभीर्याने कारवाई का होत नाही याचा कोणीतरी विचार केला पाहिजे. राजेंद्र जगताप यांनी सांगीतले स्विमींग पुल विषयी. साहेब, सगळयांनाच वाटतं माझ्याही वॉर्डामध्ये स्विमींग पुल आहे. प्रत्येकाला वाटतं आपआपल्या भागामध्ये स्विमींग पुल असावा. नागरीकांच्या सोईसाठी असावा. परंतु पाण्याची अडचण निर्माण होत असल्यामुळे ताबडतोब ते स्विमींग पुल बंद करावेत, आज तसे होताना दिसत नाही. पिण्याच पाणी आज गार्डनला, गाडी धुण्यासाठी वापरतो. बोरींगच पाणी कोण वापरत, त्याच्यावरती कोणाच नियंत्रण आहे का? कोणीही वापरत नाही. से.२३ मध्ये फिल्ट्रेशनचे पाणी रस्त्यांने वाहते म्हणजे ऑलमोस्ट वेस्ट वॉटर जे आहे ते रस्त्यानी वाहतं. त्याच्यासाठी छोटेछोटे तळे करुन ते पाणी साठवले पाहिजे बिल्डर लोकांना बांधकामासाठी जे पाणी लागत त्यांना सांगायच की तुम्ही टॅंकरने ते पाणी घेवून जावे तसं तरी नियोजन तुम्ही सांगा. पाण्याच नियोजन आपण करतोय का? आज बाहेरच्या देशात गेल, दुबईला गेलेतर पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागते. हॉटेलमध्ये गेलेतरी पिण्याचे पाण्याचा ग्लास मिळत नाही ते विकतच घ्यावे लागते. आता जसं प्रशांत शितोळे यांनी सांगीतले संपुर्ण महाराष्ट्रात पाण्याची परिस्थिती कशी आहे ते. आपण खुप नशीबवान आहोत, आपण खुप सुखी आहोत. भामा-आसखेडचे तुम्ही बघीतलतर पाण्यासाठी युध्द पेटलेल आहे आळंदीवाल्यांनी पाणी थांबविलेले आहे. अशी परिस्थिती आपली होवू दयायची का. पेपरमीलच्या तीकडे ते लोक पिण्याच्या पाण्यामध्ये केमीकल्स सोडतात असे प्रकार चाललेले आहेत त्याकडे आपले लक्ष नाही. आयुक्त साहेब आपल्याला पर्यावरण मंत्र्यांनी सुचना दिलेल्या होत्या. गुन्हा दाखल होण्याची आपण वाट बघतोय का? पिण्याचच पाणी आहे उजनीला, आपल्यामुळे त्यांची सगळयांची वाट लागली पुढे. पाण्याचे गांभीर्य आपल्याला कधी येणार आहे. मा.महापौर साहेब, आयुक्त साहेब माझी एक विनंती आहे की आता जसं ते लिक्वीड गॅसचे काम तुम्ही चालू केलेले आहे त्याच्यातूनच जर आपण वेस्ट पाण्याची पाईपलाईन टाकलीतर उदयानाला वगैरे ते पाणी होईल. आपण एकीकडे म्हणतो झाडे लावा, झाड लावल्याशिवाय प्लॅन पास होत नाही आणि एकीकडे झाडाला टाकायला पाणी उपलब्ध करुन दिले नाहीतर ते कसे वाढतील. जर तशी पाईपलाईन लोकांना घालून दिलीतर आणि त्याच्यातून ते वेस्टवॉटर आहे आपल जस आता नवीन ठिकाणी लोकांनी केलेल आहे पाण्याचा रियुज करतात. पण जुने लोक राहत आहेत ते कुठून आणणार पाईपलाईन. तरी आपण तशी सुविधा करुन दिलीतर रियुजवॉटर करण्याची त्याच्या मधुन जर पाईपलाईन टाकलीतर आम्हांला सुध्दा रियुजवॉटर वापरता येईल. २४x७ नाहीतर तो सुध्दा पाण्याचा आम्हांला उपयोग करता येईल. मा.आयुक्त साहेब, आपण

याच्यावर गांभीर्याने विचार करावा की पाण्याचे युटिलाईज कुठ कुठ चुकीच्या पध्दतीने होते. कुठ कुठ पाणी वाया जाते. पाणी मोठया प्रमाणात झोपडपट्टीमध्ये वाया जात होते त्याच्यावर नियंत्रण आणलेले आहे. आता सगळयांना पाण्याच्या कमतरतेची जाणीव झाल्यामुळे त्याठिकाणी कॉक सुटे असायचे, पाणी वाया जायचे ते आता खुप मोठया प्रमाणावर बंद झाले आहे. परंतु मोठया मोठया ठिकाणी आपण बघतो, बिल्डरच्या त्याठिकाणी पाण्याचा फार मोठा दुरुपयोग होतो. याच्यावर जास्त चर्चा सदस्यांना करावी लागू नये, साहजीक आहे आता मी निवडून आल्यानंतर शेजारच्या वॉर्डात जास्त पाणी आलंतर नगरसेवकांना प्रश्न विचारले जाणार हे साहजीक आहे पण त्याच्यावरुन आमच्यामध्ये वाद होवू नये यासाठी आपण लोकांना कमीत कमी एक टाईम पुरेल अशा स्वरुपामध्ये सुध्दा पाणी दिले पाहिजे अशी माझी विनंती आहे.

**मा.पिठासीन प्राधिकारी -** पाण्याचा महत्वाचा प्रश्न आहे, आयुक्त साहेबांनी पुढच्या आठवडया मध्ये पक्षनेते, गटनेते या सर्वासोबत एरीगेशन डिपार्टमेंटची वेळ घेवून मिटींग आयोजीत केलेली आहे.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- ब परिसरातील वार्षिक ठेकेदारी पध्दतीने ड्रेनेज लाईन व चेंबर्सची दुरुस्ती करणे कामाचे मुळ अंदाजपत्रकास मा.महापालिका ठराव क्र. ४७९ दि.२०/०५/२०१४ नुसार रक्कम रु.५०,००,०००/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे. कामाची तातडीची निकड लक्षात घेऊन सदरचे कामामधून वाढीव काम करणेत आलेले आहे. त्यामुळे कामामध्ये वाढ झालेली आहे त्याचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु. ६३,०६,०००/- पर्यंत करणेत आलेले आहे. (वाढीव र.रु. १३,०६,०००/-) तरी एकुण सुधारीत रक्कम रुपये ६३,०६,०००/- ला प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.प्रतिभा भालेराव -** मा.महापौर साहेब, उपसूचनेला मी अनुमोदन देते.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, दोन्ही उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता–

ठराव क्रमांक - ७५७ विषय क्रमांक - २

दिनांक- २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.कैलासभाऊ थोपटे, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव...

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१२५४४ दि. २२/९/२०१५

जलक्षेत्र क्र.ड/६ जुनी सांगवी गावठाण येथे जुनी ६ ल.लि. क्षमतेची उंच टाकी पाडून नविन १५ लक्ष क्षमतेची उंच टाकी बांधणे हे काम मे.विजय व्ही. साळुंखे, पुणे या

संस्थेमार्फत चालू असून सदर कामाची मुदत १८ महिने (३१-०४-२०१६ पर्यंत) आहे. परंतू सदर कामासोबतच इतर अनुषंगिक (स्थापत्य व पाणीपुरवठा विषयक) कामे सुद्धा होणे गरजेचे असल्याने व सदर अतिरिक्त कामांचे नवीन निविदा प्रक्रिया होणेस वेळ लागणार असलेने, कामाची निकड लक्षात घेवून मे.विजय व्ही. साळुंखे यांचा पुर्वानुभव चांगला असल्याने मे.विजय व्ही. साळुंखे यांना सदरची अतिरिक्त कामे टाकीचे बांधकामासोबतच करणेसाठी व त्यासाठी येणा-या र.रु.सत्याहत्तर लाख पर्यंतचे (र.रु.७७,००,०००/-) प्रत्यक्ष खर्चास (चालू निविदा दराने) मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर कामाची उपलब्ध असणारी २०१५-१६ ची मूळ तरतूद (३०,००,०००/-) अपुरी असल्याने सदर कामाच्या सुधारित तरतुदीस (र.रु.१,००,००,०००/-) मान्यता देणेत येत आहे. तसेच वेणुनगर वाकड येथे २५ ल.लि. उंच पाण्याची टाकी बांधणेचे कामाचा अंतर्भाव पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंदाजपत्रक सन २०१५-१६ मध्ये पान क्र.४७० अ.क्र.१९ वर करणेत आला आहे व त्याची अंदाजपत्रकीय रक्कम रु.२,००,००,०००/- रक्कमेस प्रशासकीय मान्यता ठराव क्र. ६६३ दि.०६/०४/२०१५ अन्वये मिळालेली आहे. परंतु, सदर कामाचे अंदाजपत्रक MJP दरसुचीनुसार तयार करणेत आले असुन त्यास रक्कम रु ३,५०,००,०००/- इतकी अंदाजपत्रकीय रक्कम येत आहे. सदर काम करणेसाठी आवश्यक तरतुद पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका कोषागारात रक्कम रु. १,६५,२७,१६५/- जमा केली आहे व उर्वरित रक्कम रु.१,६५,२७,१६५/- पुढिल हप्त्यात जमा करणार आहेत. तरी सदर कामास रक्कम रु.३,५०,००,०००/- सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच ब परिसरातील वार्षिक ठेकेदारी पध्दतीने ड्रेनेज लाईन व चेंबर्सची दुरुस्ती करणे कामाचे मुळ अंदाजपत्रकास मामहापालिका ठराव क्र. ४७९ दि.२०/०५/२०१४ नुसार रक्कम रु.५०,००,०००/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे. कामाची तातडीची निकड लक्षात घेऊन सदरचे कामामधून वाढीव काम करणेत आलेले आहे. त्यामुळे कामामध्ये वाढ झालेली आहे त्याचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु. ६३,०६,०००/- पर्यंत करणेत आलेले आहे. (वाढीव र.रु. १३,०६,०००/-) तरी एकुण सुधारीत रक्कम रुपये ६३,०६,०००/- ला प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ३

दिनांक- २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.कैलासभाऊ थोपटे, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव...

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१२५४५ दि. २२/९/२०१५

ड प्रभाग क्षेत्रातील मोकळ्या जागांना सिमाभिंत बांधणे व स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणे (नि.क्र.२८/१२/२०१२-१३) या कामाच्या र.रु.१,३५,००,०००/- चे सुधारीत खर्चास महापालिका सभा ठराव क्र.७०० दि.२०/०६/२०१५ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु सदर कामाच्या खर्चास पार्किंग, स्टॉर्म वॉटर लाईन, नदीच्या बाजूने चैनलिंक फेन्सिंग, आकर्षक मुख्य प्रवेशद्वार इत्यादी वाढीव कामामुळे प्रत्यक्षात ररु.२,२५,००,०००/- इतका सुधारीत खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे सदर ठरावामध्ये विषयांकित कामाचे र.रु.१,३५,००,०००/- चे सुधारीत खर्चाऐवजी र.रु.२,२५,००,०००/- सुधारीत खर्चास मान्यता देणेत यावी अशी दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.पौर्णिमा सोनवणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.शुभांगी बो-हाडे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ७५८ विषय क्रमांक - ३

दिनांक- २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.कैलासभाऊ थोपटे, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव...

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१२५४५ दि. २२/९/२०१५

विषय क्रमांक ०३ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७५९ विषय क्रमांक - ४

दिनांक- २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.बाळासाहेब तरस, मा.कैलासभाऊ थोपटे यांचा प्रस्ताव...

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१२५५१ दि. २२/९/२०१५

क प्रभागातील अंदाजपत्रकामधील खालील विकास कामांमध्ये वाढ व घट करण्यास व सदर वर्गीकरण विभागनिहाय असल्याने मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ. क्र. | सन २०१५-१६ तरतूद | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | एकूण आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.६० येथील सांगवी गावठाण लक्ष्मीनगर, ममतानगर भागाचे मॉडेलवॉर्ड पद्धतीने विकसित करणे. | २५ | १२८ | ५०००००० | ४३००००० | ० | ९३००००० |
| २ | सन २०१५-१६ साठी सांगवी प्रभाग क्र.६० मधील ममतानगर परिसरातील जुन्या सी.आय.लाईन बदलून नवीन डी.आय. पाईपलाईन टाकणे. | ४७३ | ९ | ७००००० | ० | ७००००० | ० |
| ३ | सन २०१५-१६ साठी सांगवी प्रभाग क्र.६० मधील मुळानगर ते पवारनगर परिसरातील जुन्या | ४७३ | १० | ७००००० | ० | ७००००० | ० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | सी.आय. लाईन बदलून नवीन डी.आय. पाईपलाईन टाकणे. | | | | | | |
| ४ | सन २०१५-१६ साठी सांगवी प्रभाग क्र.६० मधील प्रियदर्शनी नगर परिसरातील जुन्या सी.आय. लाईन बदलून नवीन डी.आय. पाईपलाईन टाकणे. | ४७३ | ११ | ७०००० | ० | ७०००० | ० |
| ५ | सन २०१५-१६ साठी सांगवी प्रभाग क्र.६० मधील मुळानदीकडील १८ मी. रस्त्यालगतच्या परिसरात पाणीपुरवठा सुरळीत होणेसाठी नवीन डी.आय. पाईपलाईन (वितरण नलिका) टाकणे. | ४७३ | १३ | ७०००० | ० | ७०००० | ० |
| ६ | सन २०१५-१६ साठी सांगवी प्रभाग क्र.६० मधील पाणीपुरवठा सुरळीत होणेसाठी विविध ठिकाणी | ४७३ | १४ | ७०००० | ० | ७०००० | ० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | व्हॉल्व्ह बसविणे, चेंबर बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणे. | | | | | | |
| ७ | सन २०१५-१६ साठी सांगवी प्रभाग क्र. ६० मधील दापोडी पुलाजवळील नविन मैला शुद्धीकरण केंद्र ते जुनी सांगवी परिसरातील ममतानगर व गंगानगर मुख्य रस्त्यावर नविन वितरण नलिका पुरविणे, टाकणे व कार्यान्वित करणे. | ४७४ | २२ | ८००००० | ० | ८००००० | ० |
| | एकुण | | | ९३०००००० | ४३०००००० | ४३०००००० | ९३०००००० |

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मापिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७६० विषय क्रमांक - ५

दिनांक- २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.बाळासाहेब तरस, मा.कैलासभाऊ थोपटे यांचा प्रस्ताव...

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१२५५२ दि. २२/९/२०१५

क प्रभागातील अंदाजपत्रकामधील खालील विकास कामांमध्ये होणा-या संभाव्य खर्चाचा विचार करता वाढ व घट करण्यास व सदर वर्गीकरण विभागनिहाय असल्याने मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ. क्र. | सन २०१५-१६ तरतूद | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | एकूण आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | प्रभाग क्र.५९ मधील मधुबन परिसरातील रस्ते, UTWT व TWT पद्धतीने मॉडेलवार्ड धरतीवर विकसित करणे. | १६२ | ५९ | २५००००० | १०००००० | ० | ३५००००० |
| ३ | सांगवी/दापोडी मैलाशुद्धीकरण केंद्रांतर्गत प्रभाग क्र.५९ मध्ये मधुबन शिक्षक सोसायटी परिसर, तसेच उर्वरित ठिकाणी जलनिःसारण विषयक कामे करणे. | ५०४ | ४७ | १५००००० | ० | १०००००० | ० |
| | एकुण | | | ४०००००० | १०००००० | १०००००० | ३५००००० |

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७६१ विषय क्रमांक - ६

दिनांक- २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा. संध्या गायकवाड, मा.प्रसाद शेट्टी यांचा प्रस्ताव..

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१२६२९ दि. २९/९/२०१५

मा.स्थायी समिती ठराव क्र.११७०४ दिनांक ९/६/२०१५ अन्वये, अंध व अपंग विद्यार्थ्यांना प्रोत्साहनात्मक बक्षीस रक्कम अदा करतांना अपंगत्वाची टक्केवारी किमान ४०% पेक्षा जास्त असणे आवश्यक याप्रमाणे निकषास मान्यता देण्यात आली असून त्यास मा.महापालिका सभा ठराव क्र. ७०१, दिनांक २०/०६/२०१५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर अपंगत्वाच्या टक्केवारीच्या प्रमाणात ४०% पेक्षा जास्त असणे याऐवजी ४०% किंवा त्यापेक्षा अधिक असणे आवश्यक, अशी दुरूस्ती करून त्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.प्रतिभा भालेराव -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७६२ विषय क्रमांक - ७

दिनांक- २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.संध्या गायकवाड, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१२७२१ दि. ०६/१०/२०१५

घंटागाडी कर्मचा-यांना सन २०१५-१६ सालाकरीता र.रु.१५,०००/- (पंधरा हजार रुपये फक्त) दिपावलीनिमित्त बक्षिस रक्कम विनापरतावा विशेष बाब म्हणून अदा करणेस एका

वर्षामध्ये (सहा महिन्यांपासून पूर्ण वर्षापर्यंत) सलग काम केले असल्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**मा.प्रतिभा भालेराव -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ८

दिनांक- २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.संध्या गायकवाड, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१२७२२ दि. ०६/१०/२०१५

घंटागाडी कामगार आरोग्य विभागाकडे गेली १७ वर्षे आरोग्य विषयक दैनंदिन साफसफाईचे काम करीत आहेत. त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन घंटागाडी कामगारांना दरमहा रु.९,०००/- (अक्षरी रक्कम रुपये नऊ हजार फक्त) ऐवजी दरमहा रु.१५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पंधरा हजार फक्त) पगार देण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.गोरक्ष लोखंडे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये संकल्प स्वच्छता मोहिम अंतर्गत स्वच्छता उपद्रव शोध पथकातील (न्युअसन्स डिटेक्शन स्कॉड) कर्मचारी गेली १३ वर्षे काम करीत असून सध्या त्यांना दरमहा र.रु. ८०००/- (अक्षरी रुपये आठ हजार फक्त) मानधन असून त्याऐवजी दरमहा रु.१५०००/- (अक्षरी रक्कम रुपये पंधरा हजार फक्त) मानधन देण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत यावी.

**मा.निलेश पांढरकर -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सदस्य. आमचे मित्र महापौर झाल्याबद्दल सभागृहाच्या वतीने अभिनंदन. मला माहिती पाहिजे की, कंत्राटी सफाई

कामगारांच्या बाबतीत पीएफ महापालिका भरणार होती. गेल्या अनेक दिवसापासून आपली महापालिका दर महिन्याला १० लाख रुपये दंड सफाई कामगाराच्या संदर्भात भरते. हा विषय स्थायी समितीमध्ये मंजूर झालेला आहे. या विषयी माहिती पाहिजे. कंत्राटी सफाई कामगाराचा पीएफ हा पिंपरी चिंचवड महानगरपालिका भरणार होती. गेले अनेक वर्ष जवळपास तीन ते चार वर्षाचे हे प्रकरण आहे. आजही त्या सफाई कामगारांचा पीएफ महानगरपालिका भरत नसल्यामुळे दर महिन्याला १० लाख रुपये आपली महानगरपालिका दंड भरते त्या संदर्भात माहिती पाहिजे.

**मा.इंदलकर (प्र.सहा.आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. महानगरपालिकेच्या वतीने जे ठेके दिले जातात ते किमान वेतन दराने दिले जातात. त्यामध्ये भविष्य निर्वाह निधीची रक्कम ही समाविष्ट असते आणि ज्या ठेकेदाराला ठेके दिले जातात त्या ठेकेदाराच्या माध्यमातून ती भविष्य निर्वाह निधीची रक्कम भरणे आवश्यक आहे. ज्यावेळेस त्यांचे पेमेंट केले जाते त्यावेळेस भविष्य निर्वाह निधीची रक्कम भरलेली आहे किंवा नाही याची खातरजमा करुनच त्या रक्कमा किंवा बील देण्याबाबतच्या सूचना परिपत्रकान्वये सर्व विभागाना दिलेल्या आहेत.

**मा.दत्तात्रय साने -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. सफाई कॉन्ट्रॅक्टर्स यांचा पीएफ महापालिकेनी भरायचा असा प्रस्ताव आपल्यासमोर आलेला होता. गेली साडेचार ते पाच वर्षे हा विषय आपण पेन्डींग ठेवलेला आहे. या माध्यमातून आपण जवळपास आठ ते दहा कोटी रुपये आपल्याला पीएफला देणे आहे. त्याठिकाणी रक्कम सुध्दा वर्ग केली ती भरत नाहीत, त्याची माहिती पाहीजे. तुम्ही जे सांगता ते वेगळे सांगता.

**मा.इंदलकर (प्र.सहा.आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. २०१२ मध्ये आरोग्य विभागाच्या माध्यमातून एकत्रीत मानधनावरती अशाप्रकारचे ठेके देणेत आलेले होते. ४५००- ५०००-५५००. त्या कामगारांना किमान वेतन दराने वेतन दिलेले नाही म्हणून तत्कालीन आयुक्त साहेब यांनी या सर्व कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीची रक्कम महापालिकेच्या वतीने भरण्याबाबतचा निर्णय घेतलेला आहे. आरोग्य विभागामार्फत प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयामध्ये त्याच कॅलक्यूलेशन केलेल आहे. त्यासंबंधीचे आदेश पण झालेले आहेत. फक्त कोणत्या कर्मचा-यावरती किती रक्कम आणि त्यामध्ये ज्या संस्था आहेत त्या सस्थांच वर्गीकरण करण्याचे काम बाकी आहे, तरी हे काम चालू आहे. मागच्या पंधरा दिवसापुर्वी त्यासंदर्भात मिटींग घेतलेली होती. आरोग्य विभागाच्या माध्यमातून सर्व क्षेत्रीय कार्यालयातून याच कामकाज सुरु आहे.

**मा.दत्तात्रय साने -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आपल्याला सुचीत करु इच्छितो की आपल्या काही भोंगळ कारभारामुळे आपल्या महापालिकेला दर महिन्याला

एक्स्ट्रॉ दहा लाख रुपये दयावे लागतात. हा २०१२ चा विषय आहे त्याला सभागृहाने मंजूरी दिली, तत्कालीन आयुक्तांनी मंजूरी दिली. महापालिकेच्या कायदयाप्रमाणे हे कसे दयायचे हे काही नगरसेवकांच काम नाही, हे अधिका-याच काम आहे. तीन वर्षाचा हा दंड किती लागू झालेला आहे. दोन वर्षे महापालिका दंड भरते आहे. अजून भविष्य निर्वाह निधी त्यांना दिलेला नाही. महापालिका दंड भरते याला कोण अधिकारी जबाबदार असतीलतर त्यांच्यावर कारवाई करावी. याला जबाबदार अधिकारी आहेत. सभागृहामध्ये विषय मंजूर झालेला आहे. कोणाला दयायचे कोणाला नाही हे आम्ही ठरवायचे का. दोन वर्षे झाले हा ठराव झालेला आहे.

**मा.आयुक्त -** मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. महापालिकेने पुर्वीच्या काळामध्ये ऍक्टप्रमाणे मानधन देवून न केल्यामुळे हा विषय आला आहे असे दिसते. तथापि ही वस्तुस्थिती आहे की एकदा २०१२ मध्ये किंवा २०१३ च्या सुरवातीला निर्णय झालेला होता. दोन-तीन-सहा महिन्यात त्याचे कॅलक्यूलेट करुन पेमेंट व्हायला पाहिजे होते आणि दंड सोसण्याची आवश्यकता नव्हती. याबाबतीत आताच सन्माननीय सदस्यांनी मत व्यक्त केल्याप्रमाणे युध्दपातळीवर विशेष पथक बसवून पुढच्या आठ दिवसामध्ये हा सगळा हिशोब करुन जी काही रक्कम भरायची ती झालेल्या निर्णयाप्रमाणे कारवाई पुर्ण होईल. मागच्या एक ते दिड वर्षात ज्यांनी या कामाकडे दुर्लक्ष केले आणि त्यामुळे आपल्याला भुर्दंड आला त्यांच्या विरुध्द कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपण घंटागाडी कामगार नेमलेले आहेत. आता जो विषय होता तो कॉन्ट्रॅक्टरच्या अंडर जे कामगार काम करतात त्यांच्या विषयीचा विषय आहे. त्यांचे पगारवाढ व्हावेत असा विषय आहे. मला हे काही कळलेले नाही. परंतु कॉन्ट्रॅक्टरने किती पगार दयावा हे आपण ठरवून चालेल का? उपसूचनेमध्ये कोणत्या कर्मचा-याचा पगार वाढवा असे आहे.

**मा.आयुक्त -** मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. आठ नंबरच्या विषयाला उपसूचना मांडली. आपल्याकडे पथारीवाले आणि इतर जे अतीक्रमण करतात त्यांच्यासाठी आपण एक स्कॉड निर्माण केलेला आहे आणि त्याच्यामध्ये माझ्या माहितीप्रमाणे सध्या चार ते पाच कर्मचारी कार्यरत आहेत. ते अतिक्रमण काढण्याचे काम करतात. त्यांना आठ हजार मानधन मिळते ते पंधरा हजार व्हावे अशी उपसूचना आहे.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. अतिक्रमण काढणारे जे कर्मचारी आपण नेमलेले आहेत. सिन्नरकर वगैरे त्यांचाच हा विषय आहे. हे कुठले अतिक्रमण काढतात. ते दोघेजण ब प्रभागामध्ये आहेत. यांना भरपूर पगार मिळतो, यांना बाहेरुन इतका मोठा पगार आहे. एकच उदाहरण सांगते, माझ्या वॉर्डात मोरयानगर झोपडपट्टी आहे. रस्त्याच्या कडेला येवून बघीतलेतर चाफेकर चौकातून दळवीनगरपर्यंत जायचा रस्ता आहे

तेथे सगळया भंगारवाल्यांचे सगळे साहित्य बाहेर असते. बाकी सगळा वॉर्ड स्वच्छ आहे पण याठिकाणी एकएकाच्या १०० ते १५० हातगाडया आहेत. दिवसभर फिरतात आणि संध्याकाळच्या वेळेला तिथं ते पल्टी मारुन ठेवतात. आणलेला सगळा कचरा पोती भरुन ते रस्त्यावरच साईडला लावतात. रस्त्याच्या कडेला कचरा वेचण्याचे काम चालू असते. गटारी सगळया गच्च भरलेल्या असतात म्हणजे आरोग्याचा प्रश्न तिथं निर्माण होतो. काय काम करतात हे. त्यांना आपल्या पगारीपेक्षा कित्येक पटीने त्या भंगारवाल्यांकडून पैसे मिळतात असा माझा आरोप आहे आणि म्हणून कोणीजरी मंजूर केलेल असलेतरी माझा याला विरोध नोंदवून घ्यावा. हे लोक शहराच विद्रूपीकरण करायला मदत करतात. गोरगरीबांच्या गाडया ओढून नेतात, कोणाचतरी वजनमाप घेवून जातात. बीचारे, पथारीवाले धावपळ करत असतात. पण जे तिथे कायम आहेत यांच हे काहीही करत नाहीत त्याला आता सांगीतले ते कर्मचारी जबाबदार आहेत तसेच त्यांच्यावर नियंत्रण ठेवणारे अधिकारी सुध्दा त्यामध्ये सामील असावेत. साहेब, या गोष्टीचा सोक्षमोक्ष तुम्ही लावायचा. अत्यंत चुकीच्या पध्दतीने ते काम करतात. गटारीवरचे अतिक्रमण सुध्दा त्यांना काढता येत नाही. एवढा पगार जर त्यांना वाढवत असालतर त्यांचा रोजचा आढावा घ्यावा. ते काय काम करतात त्याचा दररोज आढावा घ्यावा. फुटपाथ एका बाजुला तिथं काही रहदारीला अडचण नाही अशा ठिकाणी कोणी काही कलींगड ठेवत असेल, कोणी काही फ्रूट विक्री करत असेलतर सगळया गाडया भरुन घेवून जातात. यांना माल किती दिवसानी परत मिळतो, पंधरा ते वीस दिवसानी परत मिळतो. एक हजार कलींगड असतीलतर त्यातले ५० परत मिळतात यांच्यावर नियंत्रण कोणाचेही नाही. आपण एकाच अधिका-याकडे खुप खुप चार्ज दिलेले आहेत. फार आवजड झालय त्यांना काम, त्यांच्या खांदयावर ओझे झालेले कमी करा. तरी यांच्या पगारवाढीला जरी सभागृहाने मान्यता दिलीतरी माझा व्यक्तीश: विरोध आहे कारण यांचा अनुभव मला अत्यंत वाईट आहे.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, घंटागाडी कर्मचा-यांना वाढीव दिलेले आहे त्याच्यामध्ये आपल्याकडे जे एक्स-सर्व्हिसमेन लोक आहेत ते सुध्दा आपल्याकडे बरेच दिवसापासून काम करतात. त्यांना आठ हजार पगार देतो. आज मिनीमम दहा हजार पगार पडतो आणि त्यांना देताना आठच हजार देतो. कोणामध्येही भेदभाव नसावा. पठाणताईना वाईट अनुभव कुठे आला असेल परंतु शहरात जे चाललेले आहे की उठसुठ कुठेही दुकान आहेत, आता थंडी पडलेली आहे अख्या रस्त्यावर कपडयाचे दुकान लागलेले आहेत या सगळया गोष्टीमुळे ॲक्सीडेंट होण्याची सुध्दा शक्यता फार मोठया प्रमाणावर आहे. सगळे टेम्पोच्या टेम्पो मार्केटयार्ड वरुन भरुन येतात ते रस्त्यावर लागतात. भाजीवाले, फ्रूटवाले सगळे ओरडतात. आज एलबीटी जाणार आपण निर्णय घेतला पाहिजे की या या ठिकाणी पाच हॉकर्सच्या टप-या असल्या पाहिजेत, तिथे दोन असल्या पाहिजेत. जिथ भाजीमंडई पुर्ण बंद आहे तेथील भाजीमंडईचे गाळे ताब्यात दिले पाहिजेत. रस्त्यावर कोणी ठेवलतर मला वाटत

नाही की ते योग्य असेल. आरोग्यास हनीकारक आहे. ज्युसवाले बघावेत कुठेही ज्युसच्या गाडया, फ्रुटच्या गाडया असतील, भेळच्या गाडया असतील, पाणीपुरीच्या गाडया असतील, वडापावच्या गाडया असतील. अगदी गरीब लोक नक्की घेवून हे खात असतील परंतु याचा अर्थ ते नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून सुध्दा हनीकारक आहे आणि म्हणून आपण निर्णय घेतला पाहिजे. परवा भक्ती-शक्तीचा पेपरला फोटो आलेला होता. एक रोड ते संध्याकाळी पुर्णपणे बंद करुन टाकतात. त्याच्यातून महापालिकेचा काय फायदा आहे. आयुक्त साहेब तुम्ही दोनवेळा- तीनवेळा तीकडे गेलात कचरा उचलायला. म्हणजे त्यांनी घाण करायची आणि तुम्ही कचरा उचलायचा मग त्यांच्याकडून रोज पैसे वसुल केलेच पाहिजेत एखादा छोटा मुलगा जाऊ देत ते एखादया गाडीत फुकट राईड मारु देतात का ते बघा. घोडयावर फुकट बसु देतात का ते बघा. परंतु त्यांनी केलेली घाण, आईस्क्रीम खाललेल्या काडया, खाल्लेले कणस, नाराळाच पाणी पिल्यानंतर टाकलेल नारळ हा केलेला कचरा आपल्या लोकांनी उचलायचा. हे किती दिवस आपण करणार आहेत. एलबीटी बंद झालेली आहे. अवघड परिस्थितीतून आपण जाणार आहोत. या लोकांना सुध्दा छोटेछोटे शॉप करुन दया, अधिकृत दया आणि दर  महिन्याला पाच हजार भाडे त्यांच्याकडून घ्या. असे केलेतर लोकांनाही दुकान मिळतील, असाही ते बिझनसे करतात, अशी ते घाण करतात. त्यांना एक एक डस्टबीन दयावे त्याच्यातच त्यांनी कचरा टाकला पाहिजे. मागे पुण्यातल्या एका गार्डनच उदाहरण दिलेल होतं. नारळ पाणी घेतल्यानंतर आम्ही गाडीत निघालो, नारळ गाडीत बसुन पिण्यासाठी घेतले तर ते म्हणाले गाडीत बसुन तुम्ही पिणार असालतर येथून तुम्ही घेवून जायचे आणि आमच्याकडे प्यायचे असेलतर आमच्या डस्टबीनमध्ये टाकायचे. आपणही कुठेतरी आदर्श घेतला गेला पाहिजे. थरमॅक्स चौकामध्ये कंपनीच्या समोर बाहेर अक्षरश: भाजीमंडई झाली. कंपनीला गाडया टर्न करायला जागा नाही, लोकांना उभे रहायला जागा नाही. कंपनी सुटल्यानंतर एकीकडून बजाज टेम्पो दुसरीकडून थरमॅक्स कंपनी आणि अक्षरश: रोडवर भाजीमंडई. ज्या ज्या ठिकाणी गार्डन आहे अशाठिकाणी एकसारख्या सुंदर टप-या तुम्ही बनवा. त्यांना मन्थली भाडयाने त्या टप-या दया. हे एक्स-सर्व्हिसमेन जे आहेत ते आपल्याकडे सेवा करतात. त्यासाठी आपण तो विषय दिला होता. वायसीएममध्ये जी आपण भरती कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर केली त्या लोकांना सुध्दा दहा हजार पगार देतो. तरी हा विषय उपसूचनेसह मंजूर करावा.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणे दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ७६३ विषय क्रमांक - ८

दिनांक- २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.संध्या गायकवाड, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१२७२२ दि. ०६/१०/२०१५

घंटागाडी कामगार आरोग्य विभागाकडे गेली १७ वर्षे आरोग्य विषयक दैनंदिन साफसफाईचे काम करीत आहेत. त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन घंटागाडी कामगारांना दरमहा रु.९,०००/- (अक्षरी रक्कम रुपये नऊ हजार फक्त) ऐवजी दरमहा रु.१५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पंधरा हजार फक्त) पगार देण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये संकल्प स्वच्छता मोहिम अंतर्गत स्वच्छता उपद्रव शोध पथकातील (न्युअसन्स डिटेक्शन स्कॉड) कर्मचारी गेली १३ वर्षे काम करीत असून सध्या त्यांना दरमहा र.रु. ८०००/- (अक्षरी रुपये आठ हजार फक्त) मानधन असून त्याऐवजी दरमहा रु.१५०००/- (अक्षरी रक्कम रुपये पंधरा हजार फक्त) मानधन देण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ९

दिनांक- २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.सविता साळुंके,मा.विनायक गायकवाड, मा.प्रसाद शेट्टी यांचा प्रस्ताव.

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१२७३६ दि. ०६/१०/२०१५

मा.श्री.शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ११ ते १५ ऑक्टोबर २०१५ या कालावधीत राष्ट्रकुल वेटलिफ्टिंग स्पर्धा महाराष्ट्र राज्य वेटलिफ्टिंग संघटना व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन यांचे सहकार्याने आयोजित करण्यात येणार असून सदर स्पर्धेसाठी मनपातर्फे र.रु.दोन लाख नव्याण्णव हजार अर्थसहाय्य महाराष्ट्र स्टेट

वेटलिफ्टिंग असोसिएशन यांचे नावे मा.महापालिका सभेच्या उमेद मान्यतेवर मंजुर करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.आशा सुर्यवंशी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.पौर्णिमा सोनवणे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ७६४ विषय क्रमांक - ९

दिनांक- २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.सविता साळुंके,मा.विनायक गायकवाड, मा.प्रसाद शेट्टी यांचा प्रस्ताव.

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१२७३६ दि. ०६/१०/२०१५

विषय क्रमांक ०९ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १०

दिनांक- २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/६९४/ २०१५, दि.०७/०८/२०१५

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.४ दि.१८/९/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर “कार्यकारी अभियंता (विद्युत)” अभिनामाची ८ पदे पे बॅन्ड र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर सद्यस्थितीत रिक्त असलेले १ पद पदोन्नतीने भरणेकरीता दि.१७/०६/२०१५ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने “

कार्यकारी अभियंता (विद्युत)" पदावर पदोन्नती देण्यासाठी अर्हताधारक " उप अभियंता (विद्युत)" पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, सेवाजेष्ठता, गोपनीय अहवाल, आरक्षण व अनुभव कालावधी इ. सेवाविषयक तपशील पडताळून श्री.मोरे शशिकांत सखाराम यांना खुला (अनु.जाती) या प्रवर्गामधून " कार्यकारी अभियंता (विद्युत)" या पदावर पे बॅन्ड र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये कनिष्ठ अभियंता (विद्युत) पदाचे पदविकाधारक व पदवीधारक अशा स्वतंत्रपणे सेवाजेष्ठता सूची प्रसिध्द करणेबाबत व त्यानुसार उपअभियंता (विद्युत) पदावर पदोन्नती देण्याबाबत मे.उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ट असलेली याचिका क्र.२१४५/२००५ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन राहून मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्यास शिफारस केली आहे. सबब मोरे शशिकांत सखाराम यांना खुला (अनु.जाती) या प्रवर्गामधून " कार्यकारी अभियंता (विद्युत)" या पदावर पे बॅन्ड र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.प्रतिभा भालेराव -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.गोरक्ष लोखंडे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिका अस्थापनेवर "कार्यकारी अभियंता" विदयुत अभिनामाचे यापुढे रिक्त होणारे पदावर उपअभियंता विदयुत पदावर काम करणारे श्री.एकनाथ बंडू पाटील यांना "कार्यकारी अभियंता" विदयुत पदावर पे बॅन्ड र.रु. १५,६००-३९१०० ग्रेड वेतन र.रु. ६६०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी तसेच संबंधीत प्रवर्गामधुन जागा रिक्त नसलेस संबंधीत प्रवर्गातील जागा रिक्त होईपर्यंत "कार्यकारी अभियंता" विदयुत या पदाचा अतिरीक्त पदभार देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ७६५ विषय क्रमांक - १०

दिनांक- २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/६९४/ २०१५, दि.०७/०८/२०१५

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.४ दि.१८/९/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर "कार्यकारी अभियंता (विद्युत)" अभिनामाची ८ पदे पे बॅन्ड र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर सद्यस्थितीत रिक्त असलेले १ पद पदोन्नतीने भरणेकरीता दि.१७/०६/२०१५ रोजी

पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने “कार्यकारी अभियंता (विद्युत)” पदावर पदोन्नती देण्यासाठी अर्हताधारक “ उप अभियंता (विद्युत)” पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, सेवाजेष्ठता, गोपनीय अहवाल, आरक्षण व अनुभव कालावधी इ. सेवाविषयक तपशील पडताळून श्री.मोरे शशिकांत सखाराम यांना खुला (अनु.जाती) या प्रवर्गामधून “ कार्यकारी अभियंता (विद्युत)” या पदावर पे बॅन्ड र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये कनिष्ठ अभियंता (विद्युत) पदाचे पदविकाधारक व पदवीधारक अशा स्वतंत्रपणे सेवाजेष्ठता सूची प्रसिध्द करणेबाबत व त्यानुसार उपअभियंता (विद्युत) पदावर पदोन्नती देण्याबाबत मे.उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ट असलेली याचिका क्र.२१४५/२००५ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन राहून मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्यास शिफारस केली आहे. सबब मोरे शशिकांत सखाराम यांना खुला (अनु.जाती) या प्रवर्गामधून “ कार्यकारी अभियंता (विद्युत)” या पदावर पे बॅन्ड र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका अस्थापनेवर “कार्यकारी अभियंता” विदयुत अभिनामाचे यापुढे रिक्त होणारे पदावर उपअभियंता विदयुत पदावर काम करणारे श्री.एकनाथ बंडू पाटील यांना “कार्यकारी अभियंता” विदयुत पदावर पे बॅन्ड र.रु. १५,६००-३९१०० ग्रेड वेतन र.रु. ६६०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे तसेच संबंधीत प्रवर्गामधुन जागा रिक्त नसलेस संबंधीत प्रवर्गातील जागा रिक्त होईपर्यंत “कार्यकारी अभियंता” विदयुत या पदाचा अतिरीक्त पदभार देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७६६ विषय क्रमांक - ११

दिनांक- २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पअक/२/कावि/३०८/२०१५, दि.१२/०८/२०१५

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.६ दि.१८/९/२०१५

आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष यांनी त्यांचे दि.१३/०७/२०१५ रोजीचे मा.महापौर व मा.आयुक्त यांना दिलेल्या निवेदनानुसार मा.हरीत लवादाने आळंदी नगरपरिषदेस प्रक्रिया प्रकल्प उभारेपर्यंत कच-याची पर्यायी व्यवस्था करणेचे आदेश दिल्याने तसेच आळंदी ही

तिर्थक्षेत्र असून लाखो भाविक शहरात येत असतात तसेच लग्नसराईत येणा-या भाविकांचा विचार करता कचरा प्रक्रियेची सुविधा तयार होईपर्यंत मोशी कचरा डेपो येथे कचरा टाकण्यास परवानगी मागितलेली आहे. यापूर्वी आळंदी नगरपरिषदेने दि.२८/०३/२००८ व दि.१०/०५/२०१३ रोजीचे पत्रान्वये मनपाचे मोशी कचरा डेपो येथे कचरा टाकणेस परवानगी मागितली होती. त्यानुसार प्रथमत: आळंदी नगरपरिषदेस दि.३०/०६/२००८ अखेर पर्यंत एकूण ८४१.६१० मे.टन कचरा प्रती किलो ५० पैसे या प्रमाणे काही अटी व शर्तीनुसार मोशी कचरा डेपोमध्ये टाकणेत आला होता. तसेच दि.०६/०६/२०१२ ते १२/०६/२०१२ या कालावधीमध्ये प्रतीदिनी सुमारे ८ मे.टन इतका कचरा र.रु.२५६/- प्रति टन या प्रमाणे आकारणी करुन काही अटी व शर्तीवर परवानगी देणेत आली होती. याकामी त्याचे मार्फत एकूण ८० मे.टन कच-यासाठी र.रु.२०,४८०/- इतके शुल्क मनपा कोषागारामध्ये जमा करणेत आले होते, परंतु प्रत्यक्षामध्ये आळंदी नगरपरिषदेमार्फत दि.०६/०६/२०१२ व दि.०८/०६/२०१२ या कालावधीमध्ये एकूण६.९५ मे.टन इतका कचारा मोशी कचरा डेपोमध्ये टाकणेत आला होता. उपरोक्त बाबींचे अवलोकन करता आळंदी नगरपरिषदेची सद्यस्थितीमधील लोकसंख्या व तरंगती लोकसंख्येनुसार कच-याचे प्रमाणामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते मनपाचे परिसरामध्ये दैनंदिन निर्माण होणा-या कच-याचे प्रमाणात देखील मोठया प्रमाणात वाढ होत आहे. मनपाच्या कचरा डेपोमधील बहुतांश जागा वापरणेत आली असून उर्वरित जागा जास्तीत जास्त पुढील ३ ते ४ वर्ष कालावधीसाठी वापरणे शक्य होईल. मनपाच्या मोशी कचरा डेपो येथील उपलब्ध जागेचा विचार करता त्याचप्रमाणे शहराबाहेरील कचरा मोशी कचरा डेपोमध्ये टाकण्यास स्थानिक लोकप्रतिनिधींचा विरोध होण्याची शक्यता असल्याने आळंदी नगरपरिषदेस कचरा टाकणेस परवानगी देणेबाबतचा धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक असून यास मनपा सभेची मान्यता घेणे योग्य होईल. आळंदी नगरपरिषदेचा निर्माण होणारा कचरा त्यांचे कडील प्रक्रीया प्रकल्प पुर्ण होईपर्यंतचे कालावधीसाठी मोशी कचरा डेपोमध्ये सशुल्क व आवश्यक त्या अटी शर्तीवर टाकणेबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याकामीचा विषय दप्तरी दाखल करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७६७ विषय क्रमांक - १२

दिनांक- २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१०/१५/२०१५, दि.०१/०६/२०१५

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.५ दि.७/१०/२०१५

भूसंपादन, पुणे सामाजिक परिणाम निर्धारण अहवालाचे मुल्यमापन करण्यासाठी विविध शाखेतील तज्ञ गट स्थापन करणेबाबत -

संदर्भ १) मा.उप सचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.संकीर्ण ०१/२०१५/प्र.क्र.२/अ-२, दि. २३/०१/२०१५ व २) मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचे पत्र क्र.पीएलसी/कावि/८०/२०१५,दि.१०/०२/१५

अन्वये उपरोक्त संदर्भीय पत्र क्र.१ नुसार नवीन भूसंपादन नियमावलीतील " नियम ७ (ख)" नुसार राज्य शासन सामाजिक परिणाम निर्धारण अहवालाचे मुल्यमापन करण्याकरिता विविध शाखेतील तज्ञगटाची नेमणूक करणा-या तज्ञ गटामध्ये ज्यांना सामाजिक परिणाम निर्धारण प्रक्रियेमध्ये प्रतिनिधीत्व देण्यात आलेले नसेल अशा ग्रामसभेच्या, पंचायतीच्या, नगरपरिषदेच्या अथवा महानगरपालिकेच्या सदस्यांमधून दोन प्रतिनिधी या पैकी किमान एक महिला प्रतिनिधी असेल अशी २ नावे शासनास तात्काळ सादर करण्यात यावीत जेणेकरून शासनस्तरावर त्यांचे पॅनल तयार करता येईल असे मा.उप सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी मा.विभागीय आयुक्त व मा.जिल्हाधिकारी यांना कळविले आहे. सदरचे पत्रास अनुसरुन संदर्भ क्र.२ अन्वये " उक्त विषयाबाबत संदर्भिय पत्रान्वये दिलेल्या सुचनेप्रमाणे नियम ७(ख) नुसार दोन व्यक्तींची नावे तात्काळ या कार्यालयास कळवावीत म्हणजे सदरचा अहवाल मे.शासनास सादर करता येईल." असे मा.जिल्हाधिकारी पुणे यांनी मनपाला कळविले आहे. नवीन भूसंपादन नियमावलीतील नियम ७(ख) नुसार १) मा.अजित दामोदर गव्हाणे, व २) मा.वैशाली जालिंदर काळभोर या दोन व्यक्तींची नावे मा.जिल्हाधिकारी यांचे कार्यालयास कळविण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपण डिपी नियोजनाच्या मागच्या विषयाला तीन वर्षापासून मान्यता दिलेली नाही. २०१६ साठी आपण काय काय सुरवात केली त्याचा खुलासा केलातर बरे होईल. पहिला डीपी २०१६ चा त्यास मान्यता दिल्यानंतर पुढे काय काय केले आहे हे सांगावे.

**मा.आयुक्त -** मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. सन्मा.सदस्यांनी जुन्या गावच्या डीपी बद्दल प्रश्न विचारलेला आहे त्याबाबतची फाईल प्रोसेसींग पुर्ण झालेली आहे. त्यामध्ये मुख्यलेखा परिक्षक आहेत आणि डेप्युटी डायरेक्टर टाऊन प्लॅनींग आहेत हा डीपीचा विषय टेक्निकल आहे, तो डेप्युटी डायरेक्टर टाऊन प्लॅनींगचा आहे परंतु आपण प्रत्येक टेंडरची फाईल मुलेप मार्फत पाठवतो. मुलेपचे एक्स मत आहे व डेप्युटी डायरेक्टर टाऊन प्लॅनींगचे वाय मत आहे. मग आयुक्त म्हणून कोणाचे मत ऍक्सेप्ट कराव, का त्यातला काही सुवर्णमध्य साधावा का. हा प्रश्न आहे. परंतु ती टेक्निकल बाब असल्यामुळे मागच्या आठवडयातच आम्ही आपले डायरेक्टर, टाऊन प्लॅनिंगचे आहेत ते पुण्यातच बसतात त्यांची अपॉईंटमेंट घेतलेली होती. परंतु मला मुंबईला साक्ष असल्यामुळे त्या अपॉईंटमेंटच्या दिवशी जाता आले नाही तरी आम्ही एक-दोन दिवसात त्यांची अपॉईंटमेंट घेतो आणि टेंडर प्रसिध्द करतो.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. टेंडर किती मुदतीत होईल.

**मा.आयुक्त -** मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. प्रोसेस झाले की टेंडर होईल. तीन दिवसाचे टेंडर असते त्याप्रमाणे करु.

**मा.आशा शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आमच्या सहकार्यानी विषय मांडला आहे. स्थायी समितीला असताना मी अनेकवेळा सांगीतले होतं की २०१७ ला इलेक्शनची गडबड असणार. आणखीन चार महिन्यानी आम्ही त्या वातावरणात जाणार आहोत. कोणत्याही सदस्याना डीपीकडे बघण्यासाठी पुरेसा वेळ किंवा चांगला वेळ आमच्या शहराचा विकास करण्यासाठी मिळणार नाही. आमचे याकडे लक्ष नसेल त्या परफेक्ट टाईमींगला तुम्ही डीपी आणणार. अनेकवेळेला तुम्हांला युटीलीटी प्लॅनबद्दल सांगीतलं. आम्ही जे काही सांगतो त्या शहराच्या विकासासाठी, चांगल्यासाठी असलेल्या गोष्टी असतात पण सरळसरळ तुम्ही त्याला कच-याची टोपली दाखवतात. जो काही डीपी आपण रिन्यू करतो त्या डिपीच्या लवकर निवीदा काढून हरकती/सूचना केल्या पाहिजेत. मार्च- २०१६ पासून आम्ही सगळेजण इलेक्शनच्या कामाला लागणार. त्यावेळेला डीपी पुढे आणलातर कोणीही व्यवस्थित पाहू शकणार नाहीत. त्यात तुम्हांला सगळयांना माहिती आहे की तुम्ही पेपरला बातमी किती मोठया अक्षरात देता, नागरीकांना कळाव म्हणून, नागरीकांच्या हरकती/सूचना या सगळया गोष्टी तुम्हांला चांगल्या माहिती आहेत. किमान सदस्य म्हणून आमच्याकडे जी जबाबदारी आहे ती तरी आम्हांला चांगल्या प्रकारे पार पाडू दयात. तेव्हा या गोष्टीवरती लवकर निर्णय घ्यावा अशी विनंती आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १३

दिनांक- २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/३/कावि/३००/१५/२०१५, दि.२३/०७/२०१५

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.६ दि.७/१०/२०१५

महाराष्ट्र शासनाने दि. २ मे २०१४ रोजी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्वविकास) (सुधारणा) अधिनियम २०१४ पारित केला आहे. सदर अधिनियमाव्दारे महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुर्नविकास) अधिनियम १९७१ मध्ये दुरुस्त्या करण्यात आलेल्या आहेत. उपरोक्त अधिनियमातील दुरुस्तीस अनुसरुन गृहनिर्माण विभागामार्फत क्रमांक झोपुधो - १००१/प्र.क.१२५/१४/ झोपसु-१ दि.१६ मे, २०१५ अन्वये शासन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. सदर दुरुस्त्या व दि. ११ जुलै, २००१ दि. ८ नोव्हेंबर, २००१, दि. २ जानेवारी, २०१२ आणि दि.२२ जुलै, २०१४ च्या आदेशातील तरतूदींचे अधिक्रमण करुन सुधारीत कागदपत्रे /अभिलेख व कार्यपध्दती विहित करणेचा निर्णय घेणेत आला आहे.

**<u>शासन निर्णयातील ठळक बाबी खालीलप्रमाणे</u>-**

**१) झोपडी व झोपडीवासिय संरक्षणपात्र ठरविण्याबाबत.**

**(अ)** झोपडी दि.१/१/२००० अथवा त्यापूर्वीची संरक्षणप्राप्त झोपडी आहे त्यासाठी विवरणपत्रातील किमान एक अनिवार्य पुरावा आवश्यक आहे.

**(ब)** सध्या तिथे राहत असल्यास पत्याचा उल्लेख असलेल्या विवरणपत्रातील अलिकडच्या एक वर्षातील किमान एक अनिवार्य पुरावा आवश्यक आहे.

**(क)** झोपडी दि.१/१/२००० नंतरच्या दिनांकापासून सध्या राहत असलेल्या विवरणपत्रातील अलिकडच्या एक वर्षातील कोणताही किमान एक अनिवार्य पुरावाआवश्यक आहे.

**२) <u>शपथपत्राबाबत</u> –**

**अ)** झोपडीधारक त्याच्या/तिच्या, पत्निच्या/पतीच्या अथवा १८ वर्षाखालील (अज्ञान) मुलांच्या नांवे महानगरपालिका क्षेत्रात अन्य झोपडी/घर/सदनिका मालकी तत्वावर अथवा भाडे तत्वावर नसल्याचे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ०९ मार्च २०१५ अन्वये स्वत:चा फोटो लावुन "स्वयंघोषणापत्र"(Self-Declaration)साध्या कागदवर भरुन देणे आवश्यक राहील.

**ब)**झोपडीधारक जोडपत्र तिन किंवा जोडपत्र चार भरुन देताना त्यासोबत स्वयं साक्षांकन जोडलेल्या पुराव्यावर "स्वंय स्वाक्षांकनासाठीचे स्वयंघोषणापत्र"(SelfDeclaration for Self Attestation)देणे आवश्यक असेल.

**क)**नमुने शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक ०९ मार्च २०१५ सोबतच्या प्रपत्र "अ"व "ब"प्रमाणे राहतील.

**३) अ) <u>दि. १/१/२००० पूर्वीपासूनच्या झोपडीवासियांसाठी अर्जाबाबत</u>**

नमुन्यात दर्शविलेल्या अर्जासोबत "जोडपत्र तीन" (जोडपत्र-पाचसह) अर्ज भरणे आवश्यक राहील.

**ब) <u>दि. १/१/२००० नंतरच्या झोपडीवासियांसाठी अर्जाबाबत</u>**

नमुन्यात दर्शविलेल्या अर्जासोबत "जोडपत्र चार"(जोडपत्र-पाचसह) अर्ज भरणे आवश्यक राहील. तसेच शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग यांचेकडील २ जानेवारी २०१२ नुसार अपात्र ठरला असेल तर त्यांनाही पुन्हा अर्ज करता येईल.

वरिल पुर्ततेनुसार, संगणकावर संकलित केलेले माहिती व फोटोच्या आधारे पडताळणी, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या अमलंबजावणीसाठी निष्कासित झालेल्या झोपडीच्या पुराव्या आधारे, स्थळ पाहणी, करुन पात्र/अपात्र बाबत निर्णय घेणे. व अभिलेखाचे जतन करणे. पुनर्वसनाचा लाभ देतात त्याच्या/तिच्या, पत्निची/पतीची फोटोसह माहिती व त्या दोघांच्या आधारकार्डाच्या क्रमांकाची नोंद करुन संलग्न करणे.

तरी उपरोक्त दि. २ मे २०१४ रोजीचा महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्वविकास) (सुधारणा) अधिनियम २०१४ व त्याअनुषंगाने दि. ११ जुलै, २००१ दि. ८ नोव्हेंबर, २००१, दि. २ जानेवारी, २०१२ आणि दि.२२ जुलै, २०१४ च्या आदेशातील तरतूदींचे अधिक्रमण करुन सुधारीत दि. १६ मे, २०१५ चा शासन निर्णय मा. महापालिका सभेपुढे अवलोकनार्थ ठेवणेत आला.

**मा.प्रतिभा भालेराव -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.आशा सुर्यवंशी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.पौर्णिमा सोनवणे-** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता--

ठराव क्रमांक - ७६८ विषय क्रमांक - १३
दिनांक- २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/३/कावि/३००/१५/२०१५, दि.२३/०७/२०१५
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.६ दि.७/१०/२०१५

विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासिन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब विषय क्रमांक १४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७६९ विषय क्रमांक - १४
दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१६/७०६/२०१५, दि.०१/०९/२०१५
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.७ दि.७/१०/२०१५

मौजे मोशी येथील शिवाजीवाडी मधील गट नं.४८ जूना (गट नं.४९) मधील ६०.०० मी. पुणे नाशिक महामार्गापासून गट नं.१५१ (जूना गट नं.१५१) मधील देहू आळंदी ३०.०० मी. रस्त्यापर्यंतचा रस्ता विकसित करणेसाठी जमीन संपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. सदर रस्ता रुंदीकरणाखालील जमीन खाजगी मालकीची असल्याने रस्तारुंदीने बाधीत होणा-या क्षेत्राचे भूसंपादन करणे आवश्यक असल्याने रस्तारुदींने बाधीत जमीनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ (२) व भूसंपादन कायदा १८९४ चे तरतूदी अंतर्गत भूसंपादन करावे लागेल सदर भूसंपादन प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-
अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७७० विषय क्रमांक - १५

दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.सुजाता पालांडे, मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव -

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र. २२ दि.७/१०/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे दिघी मंजूर विकास योजना आराखडयात स.नं.७८ पै मध्ये २/११६ प्राथमिक शाळा हे आरक्षण असून सदर आरक्षणाखालील क्षेत्रामध्ये आरक्षण मंजूर होण्याअगोदर पासून घरे आहेत तसेच आजूबाजूला ७ ते ८ शाळा आहेत. त्यामुळे मंजूर विकास योजनेतील स.नं.७८ मधील आरक्षण क्र.२/११६ ची आवश्यकता नाही. म्हणून मंजूर विकास योजनेतील शाळेचे आरक्षण क्र.२/११६ महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करुन सदर आरक्षणाखालील क्षेत्र रहिवाशी विभागात समाविष्ठ करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, सदर ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १६

दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.सुजाता पालांडे, मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव -

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र. २३ दि.७/१०/२०१५

मौजे चिखली येथील गट नंबर ११९५ ते ग.नं.१२०७ पर्यंत मंजूर विकास आरखडयातील ३०.०० मी. रस्त्याची म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम २६ नुसार आखणी निश्चित करणेत आलेली होती. परंतु म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३० नुसार त्यात काही

बदल दर्शविलेला आहे. त्यात केलेल्या बदलास शासनाची मान्यता मिळालेली आहे. तरी फेरबदल केलेल्या आखणीमुळे त्यातील बाधीत मिळकतधारकांवर अन्याय झालेला आहे. त्यामुळे म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम २६ नुसार प्रसिध्द केलेल्या आखणीनुसार रस्त्याची आखणी कायम करणेकरीता म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेर बदलाची कार्यवाही करणेत यावी. प्रस्तावित या रस्त्याचे आखणीस म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलास मान्यता देणेत येत आहे.

**मा.प्रतिभा भालेराव** - मा.महापौर साहेब, सदर ठरावास अनुमोदन देते.

**मा.गोरक्ष लोखंडे** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील विषयांकीत चिन्हांकित आरक्षणे व रस्ते म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करणेस मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची सुधारीत विकास योजना सन १९९५ मध्ये मंजूर झालेली आहे. प्राधिकरण नियोजन नियंत्रण कक्षेतील काही क्षेत्र सन १९९७ मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेत समाविष्ट झालेले आहे. सदर क्षेत्रापैकी मौजे-चिखली येथील पेठ क्र.२० लागून असलेल्या ग.नं. १२९७ व १२६४ या गटांतील क्षेत्रामध्ये काही चिन्हांकित आरक्षणे प्रस्तावित केलेली आहे. मा.महापालिका सभा ठराव क्र. ६०८४ दि.२०/०२/२००७ चा ठराव रद्द करणेस मान्यता देणेत यावी व सदर ठरावाचे अनुषंगाने केलेली कार्यवाही या ठरावान्वये रद्द करणेस मान्यता देणेत यावी. नगरविकास विभागास दाखल केलेला महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वयेचा प्रस्ताव दप्तरी दाखल करणेस मान्यता देणेत यावी. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता तात्काळ पुढील कार्यवाही करुन त्याप्रमाणे शासनास कळवणेस मान्यता देणेत यावी.

**मा.निलेश पांढरकर** - मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरूस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ७७१ विषय क्रमांक - १६
दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.सुजाता पालांडे, मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र. २३ दि.७/१०/२०१५

मौजे चिखली येथील गट नंबर ११९५ ते ग.नं.१२०७ पर्यंत मंजूर विकास आरखडयातील ३०.०० मी. रस्त्याची म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम २६ नुसार आखणी निश्चित

करणेत आलेली होती. परंतु म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३० नुसार त्यात काही बदल दर्शविलेला आहे. त्यात केलेल्या बदलास शासनाची मान्यता मिळालेली आहे. तरी फेरबदल केलेल्या आखणीमुळे त्यातील बाधीत मिळकतधारकांवर अन्याय झालेला आहे. त्यामुळे म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम २६ नुसार प्रसिध्द केलेल्या आखणीनुसार रस्त्याची आखणी कायम करणेकरीता म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेर बदलाची कार्यवाही करणेत यावी. प्रस्तावित या रस्त्याचे आखणीस म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील विषयांकीत चिन्हांकित आरक्षणे व रस्ते म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची सुधारीत विकास योजना सन १९९५ मध्ये मंजूर झालेली आहे. प्राधिकरण नियोजन नियंत्रण कक्षेतील काही क्षेत्र सन १९९७ मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेत समाविष्ट झालेले आहे. सदर क्षेत्रापैकी मौजे-चिखली येथील पेठ क्र.२० लागून असलेल्या ग.नं. १२९७ व १२६४ या गटांतील क्षेत्रामध्ये काही चिन्हांकित आरक्षणे प्रस्तावित केलेली आहे. मा.महापालिका सभा ठराव क्र. ६०८४ दि.२०/०२/२००७ चा ठराव रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे व सदर ठरावाचे अनुषंगाने केलेली कार्यवाही या ठरावान्वये रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे. नगरविकास विभागास दाखल केलेला महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वयेचा प्रस्ताव दप्तरी दाखल करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता तात्काळ पुढील कार्यवाही करुन त्याप्रमाणे शासनास कळवणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १७

दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.सुजाता पालांडे, मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र. २४ दि.७/१०/२०१५

मौजे मोशी येथील गट नं.४५० मंजूर विकास आराखडयात ९० मी. रस्त्यालगत १०० मी. अंतरावर दक्षिण बाजूचे अस्तित्वातील रस्त्याला ४५ मी. रस्तारूंदी (भोसरी हद्दीलगत) दर्शविणेत आलेली आहे. दोन्ही रस्ते लगत असल्यामुळे विकसित करणेस अडचणी व नियोजन

करता येणार नाही. सद्यस्थितीत गट नं.४५० मध्ये मोठया प्रमाणात लोकवस्ती आहे. नागरिकांनी आपली घरे महापालिकेचा विकास आराखडा मंजूर होण्यापूर्वी बांधलेली आहेत. त्यामुळे सर्व नागरिकांवर अन्याय होणार आहे. तसेच सदर ९०.०० मी. रस्त्यामुळे सर्व रहिवाशी बेघर होणार आहेत. नवनगर विकास प्राधिकरण हद्दीत रस्त्याची रुंदी ७५.०० मी. आहे. नवनगर विकास प्राधिकरण हद्दीतून येणारा ७५.०० मी. रस्ता व मोशी हद्दीतील ९०.०० मी. रस्ता हे देखील समोरासमोर येत नाहीत. तसेच ते नियोजनाच्या दृष्टीकोनातून देखील योग्य होणार नाही. त्यामुळे मंजूर विकास आराखडयातील ९०.०० मी. रस्ता रद्द करुन भोसरी-मोशी हद्दीवर ४५.०० मी. रस्त्याचे उत्तर बाजूस मोशी हद्दीत ७५.०० मी. रस्ता प्रस्तावित करणे नियोजनाच्या दृष्टीने योग्य होईल. प्रस्तावित करावयाच्या ७५.०० मी. रस्त्याची रुंदी नाशिक महामार्ग रस्त्यापासून लोहगाव हद्दीपर्यंत ७५.०० मी. रस्त्याची रुंदी निश्चित करावी. तरी प्रस्तावित करावयाच्या रस्त्याची आखणी व आरक्षणास म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. प्रस्तावित या रस्त्याचे आखणीस म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलास मान्यता देणेत येत आहे.

**मा.प्रतिभा भालेराव** - मा.महापौर साहेब, सदर ठरावास अनुमोदन देते.

**मा.गोरक्ष लोखंडे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.निलेश पांढरकर** - मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ७७२ विषय क्रमांक - १७

दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.सुजाता पालांडे, मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव -

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र. २४ दि.७/१०/२०१५

विषय क्रमांक १७ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १८
दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र पअक/६/कावि/३१९/२०१५ दिनांक ०९/०७/२०१५
२) मा. महापालिका सभा ठराव क्र. ७२७ दि २३/७/२०१५
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७५० दि.१९/९/२०१५

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ६७(अ) अन्वये प्रत्येक महानगरपालिकेने लगत पूर्ववर्ती शासकीय वर्षासंबंधीचा पर्यावरण सद्‌यस्थिती अहवाल शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात येईल. अशा पध्दतीने दरवर्षी ३१ जुलै पूर्वी मा.महापालिका सभेकडे सादर करणे बंधनकारक आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सन २०१४-१५ चा पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या DPSIR या मार्गदर्शक तत्वानुसार तयार करण्यात आला आहे. सदर प्रारुप अहवाल मा. महापालिका सभेस सादर करावयाचा आहे.

सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सन २०१४-१५ चा पर्यावरण सद्‌यस्थिती अहवाल मा.महापालिका सभेसमोर ठेवणेत आला.

**मा.प्रतिभा भालेराव** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.गोरक्ष लोखंडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.निलेश पांढरकर** - मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ७७३ विषय क्रमांक - १८
दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र पअक/६/कावि/३१९/२०१५ दिनांक ०९/०७/२०१५
२) मा. महापालिका सभा ठराव क्र. ७२७ दि २३/७/२०१५
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७५० दि.१९/९/२०१५

विषय क्रमांक १८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १९

दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र नरवि /कावि/रहाटणी/ड-८/६८०१/१५ दि.२३/०९/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिका परीसरात मंजूर विकास योजनेतील आरक्षण, रस्ता तसेच मंजुर विकास योजनेव्यतिरीक्त महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अंतर्गत घोषीत रस्ता या प्रयोजनाने बाधीत होणारे क्षेत्र खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेणेकामी रेडीरेकनर नुसार होणारे मुल्यांकन अधिक ३०% दिलासा रक्कम अशी मिळुन एकत्रित होणारी रक्कम अदा करणेची पध्दत प्रचलित आहे. जे.एन.एन. यु.आर.एम. प्रकल्पांतर्गत विकसीत होणारे रस्ते व इतर आवश्यक रस्त्याकरीता खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करण्यासाठी सुध्दा मा.महापालिका सभा ठराव क्र. ३९९ दिनांक २१/११/२०१३ अन्वये ३० % दिलासा रक्कम विचारात घेऊन मोबदला देण्याचे धोरण ठरविण्यात आलेले आहे. भूसंपादन अधिनियम १८९४ मधिल तरतूदीनुसार ३०% दिलासा रक्कम विचारात घेवून सदरचे धोरण पूर्वी निश्चित करण्यात आले होते. सदर धोरणानुसार सद्यस्थितीत बाधीत मिळकतधारकांना नुकसान भरपाई अदा करणेत येत आहे.

तथापी केंद्र शासनाने भूसंपादन अधिनियम १८९४ ऐवजी “The Right to fair compensation and Transparency in land acquisition, Rehabilitation Resettlement Act 2013”(भूसंपादन कायदा २०१३) हा नवीन भूसंपादन कायदा मंजूर केला असून दि. १ जानेवारी २०१४ पासून सदरचा कायदा अंमलात आला आहे. सदर कायदयातील कलम ३०मधील तरतूदीनुसार दिलासा रक्कम देय नुकसान भरपाईच्या१००% इतकी निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनानेही महसूल व वन विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-०३।२०१५।प्र. क्रं. ३४।अ-२ दि.१२।०५।२०१५ नुसार खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी करतांना भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेड्युल -१ च्या तरतूदीनुसार सर्व बाबी विचारात घेऊन मोबदला रक्कम निश्चित करावी असे धोरण निश्चित केलेले आहे.

उपरोक्त वस्तूस्थिती विचारात घेता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करतांना संबंधित जमिन मालकास मोबदला अदा करतांना मा.

महापालिका सभा ठराव क्रं. ३९९ दि.२१।११।२०१३ नुसार मंजूर कार्यपध्दती व धोरणानुसार कार्यवाही करावयाच्या प्रकरणी तसेच इतर सर्व प्रकरणात नुकसान भरपाई अदा करतांना ३०% दिलासा रक्कमे ऐवजी १००% दिलासा रक्कम विचारात घेऊन मोबदला रक्कम निश्चित करण्यात यावी, या प्रमाणे धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असल्याने सदर धोरणास मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब, या विषयाची माहिती देण्यात यावी.

**मा.शमिम पठाण** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, विषय चांगला आहे. आपण आत्ता विविध प्रकल्पांसाठी ज्या जमिनी घेतो आहोत व त्यांना जो मोबदला देतो आहोत तो पूर्वी ३० टक्के होता, तो आत्ता १०० टक्के देतोय म्हणजे रेडी रेकनरच्या दुप्पट देणार आहोत. ही चांगली आनंदाची बाब आहे. यापूर्वीही हा विषय झाला होता. चिंचवड गावातील जमिन मालकांनी, इथल्या भूमिपुत्रांनी आपल्या काही जमिनी यापूर्वी दिल्या होत्या. आपल्या महापालिकेचे काही अधिकारी यांच्या शब्दाला मान देऊन त्यांनी ब-याचशा जमिनी रस्त्यांसाठी दिलेल्या आहेत. उद्यानासाठी दिल्या आहेत. महापालिकेच्या विविध प्रकल्पांसाठी त्या जमिनी दिलेल्या आहेत. त्यावेळी आपण त्यांना जमिनीचा मोबदला देऊ असे सांगितले होते. परंतू त्यांना अजूनही मोबदला दिलेला नाही. काही रस्ते अजूनही त्यांनी ताब्यात दिलेले नाहीत, त्यांना मोबदला दिलेले नाहीत. काही ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणात जमिनीचे ताबे दिले होते. तोंडी ताबा दिलेला आहे आणि आपण त्या जागांवर रस्ते सुद्धा केलेले आहेत मला वाटते, मग एक विषय झाला. शहरात एकाने रस्ता अडवला होता. मग खूप धावाधाव झाली. आयुक्त साहेबांनी त्यांना सन्मानाने बोलवले, त्यांच्याशी चर्चा केली मग तो विषय तिथेच थांबला. सन्माननीय नेत्यांनी सुद्धा त्यांत प्रयत्न केले आहेत. त्या लोकांनी असे नाक दाबले की आपले तोंड उघडणार आहे का. त्या लोकांना मोबदला मिळालेला नाही. मी सर्व शहराबद्दल बोलते आहे. ज्यांना मोबदला मिळाला नाही त्यांनी रस्ता अडवला किंवा खणला तर ते चालेल काय. नंतर करायचा म्हणून त्यांना मोबदला द्याल का. मला आपल्याला विनंती करायची आहे की, प्रक्रिया चालू असेल तर ती अधिक वेगाने करा. जिथे आपले प्रकल्प झाले आहेत, रस्ते झाले आहेत, त्यासाठी जागा घेतली आहे, त्यांना कोणताही मोबदला मिळाला नसेल तर आत्ता जो विषय आपण करतोय. त्यांना रेडी रेकनरच्या दरानुसार दुप्पट मोबदला मिळावा, त्या लोकांना सुद्धा त्यात समाविष्ट करुन घ्यावे असे मला वाटते आहे. ठाकूर साहेबांना आवश्यकता वाटत असेल तर आम्ही तशी उपसूचना देखील देऊ.

**मा.दत्ता साने** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आदरणीय पठाण ताई आपले धन्यवाद, आपण आमच्या शेतक-यांच्या बाजूने बोललात. खरेतर या विषयासाठी मी आयुक्तांचे मनापासून स्वागत करतो. त्यांनी चांगला विषय आणला आहे. विषय आणत

असताना माझी विनंती आहे, आपल्याला काही गोष्टी सांगतो. खाजगी वाटाघाटीच्या माध्यमातून जे रस्ता घेणार आहोत. त्यात आपल्याला अटी शिथिल करणे गरजेचे आहे. ज्यावेळी एखादा रस्ता ताब्यात घ्यायचा, आरक्षण ताब्यात घ्यायचे, किंवा अनेक कारणांसाठी महापालिकेची जागा ताब्यात घ्यायची असेलतर यात खाजगी वाटाघाटीच्या माध्यमातून जागा ताब्यात घेणे हा आपल्यासमोर एक चिंतेचा विषय आहे. जवळपास दीड-दोन वर्षे झाली, या जागा ताब्यात घेण्यासाठी अनेक वेळा प्रयत्न केले. पण आपल्या काही अडचणी, काही शेतक-यांच्या अडचणी यात मध्य साधल्याचे दिसत नाही. आपण रेडीरेकनरपेक्षा १०० टक्के मुद्दल भरपाई देणार आहोत. हा विषय चांगला आहे. परंतू विषयात अनेक अडचणी आहेत. शेतक-यांनी ताबा दिला आहे. जागेवर जाऊन पाहून गेले, सगळे झाले, ॲग्रीमेंट केले तरी ज्या अटी आहेत त्या आहेत. त्यात सुद्धा आपल्याला काही दुरुस्ती करणे गरजेचे आहे. अजूनही अटींत शिथिलता केलीतर, शेतक-याला जागा द्यायची आहे यात शासनाच्या नियमानुसार किंवा आपल्या डि.सी. रुलप्रमाणे त्यात काही दुरुस्ती करता आलीतर पहावे. एक शेतकरी असल्यामुळे मी याबद्दल बोलतोय. मी हा विषय अनेक वेळा सभागृहात मांडला आहे. सभागृहात अनेक वेळा बोलताना ग्रामिण भागातील डि.पी. रोड असतील, उद्याने असतील मी अनेक वेळा मार्किंग करायला सांगत होतो. गेले पाच सात वर्षे आम्ही या विषयावर चर्चा करतोय पण हा विषय आजही पेंडींग आहे. उद्या जर एखाद्या माणसाने, गि-हाईकाने किंवा कामगाराने आरक्षित प्लॉटमधील प्लॉट घेतला किंवा त्याचा प्लॉट आरक्षणात गेला तर त्याला परत तोच त्रास होण्याऐवजी माझी आपल्याला विनंती आहे की, मी याआधी बोललो आहे. आणि पुन्हा एकदा बोलतोय. आत्ता तुम्ही जुन्या गावांचा डिपी. फ्लो रेटने करणार आहात. त्याच पद्धतीने ग्रामीण भागात जे डि.पी.चे रस्ते आहेत ते आम्हाला महत्वाचे आहेत डि.पी. च्या माध्यमातून जे आरक्षित प्लॉट टाकले आहेत, त्याला निदान नंबरींग करावे. ३० मी. असेल, २४ मी. असेल तर २४ मी. चे नंबरींग करा. सर्वसामान्य नागरीक फसू नये म्हणून मी विनंती करतो. यात आपण थोडेस लक्ष घालावे अशी विनंती करतो व थांबतो.

**मा.सुरेश म्हेत्रे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, सदर विषयाबद्दल बोलायचे झालेतर भूसंपादन प्रक्रियेत माझ्या प्रभागातील डिपी. रस्ता याकरिता बजेट ठेवले आहे. टेंडरींग झाले आहे. वर्कऑर्डर मिळायची आहे. याचे फक्त सिमांकन केले आहे. अ, ब पत्र आहे, ती प्रोसेस काहीच झालेली नाही. तरतूद लॅप्स होईल. हे काम होणार नाही. शंभर टक्के मोबदला मिळत असेलतर शेतकरी त्यांची जागा द्यायला तयार होतील. पूर्वी काही ठिकाणी मार्किंग केले आहे त्यात तफावत आहे तसे पत्र मी दिले आहे. बजेट मंजूरीसाठी ५ पत्रे दिली की हे डिमार्केशन करावे. म्हणजे बाधित आहेत अशा शेतक-यांशी बोलून बैठक घेता येईल व त्यांना भरपाई मिळणार आहे त्याबद्दल माहिती दिलीतर ते शेतकरी शेतजमिन द्यायला तयार आहेत. आत्ता विषय चांगला आहे. रक्कम डबल मिळणार आहे. म्हणून आपण डिमार्केशन

करा. आपण डिमार्केशन करायला कधी येणार आहात. बाधित शेतक-यांना बोलवून बैठक घेऊन त्यांना जे काही मिळाले आहे त्याची विस्तारीत माहिती आपल्या अधिका-याकडून घेऊ. परंतू आपण हा विषय तातडीने हाताळावा अशी माझी टाऊन प्लॅनिंग विभागाला विशेष विनंती आहे.

**मा.रामदास बोकड**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, मी आपल्या सहकारी मित्रांचे याठिकाणी अभिनंदन करतो की, आपल्या पक्षनेत्यांनी चांगला पायंडा पाडलेला आहे. सिनिऍरीटीप्रमाणे महापौर, उपमहापौर नसताना ज्येष्ठ मंडळींना महापौर पदी बसण्याची संधी देण्याचा प्रयत्न आपण राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या माध्यमातून केला आहे. त्याबद्दल मी मा.पक्षनेत्यांचे अभिनंदन करतो आणि महापौरांचे देखील अभिनंदन करतो. याठिकाणी सन्मा.महापौर,सन्मा.आयुक्त, सर्व सहकारी नगरसेवक-नगरसेविका, पत्रकारबंधू यांना या विषयाच्या अनुषंगाने मला सूचवावयाचे आहे की, माझ्या प्रभागात आरक्षण क्र.३५५ व ३५६ आहे. आत्ताच माझ्याकडे सन २०१२,२०१३,२०१४ मध्ये भोसरी ते वाकड हा बीआरटीएस झाला, यात अनेक लोकांची घरे गेली, जागा गेल्या. अनेक लोकांनी स्वतःहून त्यांची घरे पाडून त्या जागेचा ताबा दिला. आत्तापर्यंत महापालिकेने खाजगी वाटाघाटीने ५० लोकांना मोबदला दिला. घरकूलमध्ये काही प्रमाणात लोकांना घर दिले. परंतू आरक्षण क्र.३५५, ३५६ हा विषय पेंडींग आहे. मला हे निदर्शनास आणायचे आहे की, टाऊन प्लॅनिंगकडून शेतक-याला हे डायरेक्ट सांगितले जाते की तू सरकारी मोजणी करुन घे. त्याशिवाय तुझा मोबदला मंजूर होणार नाही. जर एखाद्या शेतक-याला २ लाख मिळणार असतील आणि मोजणीला ३ लाख जाणार असतील तर तो शेतकरी आपल्याला ताबा कसा देणार. म्हणून याठिकाणी मला मा.महापौर व मा.आयुक्त साहेब यांना सूचवावयाचे आहे की, आपण बीआरटीएससाठी शहरात पॉलिसी ठेवावी की, ज्यांना खाजगी वाटाघाटीने मोबदला द्यायचा आहे, त्यांना सरकारी मोजणीची अट न ठेवता आपला टाऊन प्लॅनिंगचा सर्वेअर आहे, याची मोजणी गृहित धरुन तो मोबदला देण्यात यावा. त्याप्रमाणात त्या शेतक-याला शंभर टक्के पैसे खाजगी वाटाघाटीने दिलेतर आपल्याला लवकरात लवकर आरक्षण मिळेल. तरी माझ्या या सूचनांचा मा.महापौर यांनी आदर करावा. याची दखल घ्यावी. आयुक्त साहेबांनी त्या अधिका-यांना सूचना देऊन याची अंमलबजावणी व्हावी अशी नम्र विनंती आहे.

**मा.राजेंद्र जगताप**- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसुचना मांडतो- महानगरपालिकेला आवश्यक असणारे रस्ते जागा मालकांकडून वाटाघाटीने ताब्यात घेवून त्याठिकाणी रस्ते विकसीत करण्यात आले. परंतु जागा मालकांना कोणताही मोबदला देण्यात आलेला नाही हा ख-या अर्थाने जागा मालकांवर अन्याय आहे. तरी त्यांना पुर्वी जरी ते रस्ते विकसीत करण्यात आले असतील तरीही सदर जागा मालकांना त्यांचा मोबदला देण्यात यावा. सबब मनपा स्थापनेपासून ते आजपर्यंत मनपामध्ये अस्तित्वात असणा-या रस्त्यांबाबत मोबदला देण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.राजेंद्र काटे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, तसे बघायला गेलोतर मुळातच या विषयाला उशीर झाला असे म्हटलेतर वावगे ठरणार नाही. कारण आपल्या शहराची भौगोलिक परिस्थिती पाहिलीतर आज आपल्या शहराकडे देशातील अग्रगण्य विकसित शहर म्हणून पाहिले जाते. ब-याचशा जमिनी ताब्यात आल्या आहेत तरी हजारो शेतकरी असे आहेत ज्यांना अर्धवट मोबदला मिळाला आहे, काहींना मिळालेलाच नाही. किंवा ज्यांना मिळाला आहे त्यात ते सुखीसमाधानी नाहीत. गेल्या ७/८ वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या रस्त्याबाबतीत निर्णय प्रलंबित आहे. आपण आजपर्यंत कोणताही निर्णय घेतलेला नाही. मागच्या कमिशनरप्रमाणे निर्णय घेतलेला नाही. परंतू काही ठिकाणी खरोखर मोबदला देण्यासारखी परिस्थिती आहे तरीसुद्धा मोबदला का दिला जात नाही हे कळत नाही. जेव्हा प्रशासक म्हणून तुमच्यासारखा आयुक्त इथे बसतो, त्यावेळी तुम्ही न्याय द्यायचे काम केले पाहिजे. तुम्ही न्याय दिला पाहीजे किंवा निर्णय प्रलंबित न ठेवता शंभर टक्के ऐवजी फक्त ३० टक्के मोबदला दिला पाहीजे. शंभर टक्के पर्यंत दिलासा रक्कम देण्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी आहे. आम्ही म्हणतो उद्याच्या काळात शंभर टक्के मोबदला दिला जाणार आहे. पण मागील काळातील काय. सांगवी, पिंपळे गुरव परिसर या आमच्या परिसरात जी ग्रोथ होती. मागील काही वर्षांपूर्वी आमच्या भागाचा ग्रोथ स्पीड हा कोथरूडपेक्षा जास्त होता. कारण रस्ते विना किटकिट ताब्यात येत होते. परंतू आजरोजी काय परिस्थिती आहे. त्या शेतक-यांना मोबदला दिलेला नाही. आत्ता आपण टाळाटाळ करतोय की, डांबर पडलेले आहे. डब्ल्यूबीएम झालेतरी अर्धवट. या गोष्टींमुळे त्यानंतरच्या काळात या भागाची ग्रोथ थोडी फार कमी झाली असे म्हटलेतर वावगे होणार नाही. कारण काय तर काहीतरी चूका शोधून काढतात. रस्ता इथून करा. जायला-यायला करा. असे रस्ते पूर्वी केले आहेत. लोकांनी दहा पंधरा फुटांचे रस्ते करुन दिले होते. पण उर्वरीत रस्त्यांचे जागांचे काय. त्याचा मोबदला सुद्धा प्रत्यक्ष शेतक-याला जागा मालकाला देऊ केलेला नाही. काही ठिकाणी मोबदला दिलाही असेल. कारण शहराचा विकास जागा ताब्यात आल्यामुळे होतो. प्रत्येक ठिकाणी परिस्थिती लपणारच नाही व त्यामुळे मला आपल्या शहरातील अस्तित्वातील रस्त्यांचा मोबदला मिळाला पाहिजे. जेवढ्या केस असतील त्याबाबत आपण टीडीआर इश्यू करा किंवा रोख स्वरुपात द्या याचा निर्णय तुम्हाला घ्यावा लागेल. आजचा हा जो १०० टक्के रेट आहे तो अस्तित्वातील रस्ते आहेत त्यांना लागू करणार का. १०० टक्के दिलासा रक्कम देण्यास मान्यता देऊ असे म्हणतो. ती अस्तित्वातील रस्त्यांना लागू करणार का. याबाबतीत तुम्ही कोणतेही स्पष्टीकरण किंवा मान्यता मागितलेली नाही. मग त्याबाबतीत काय करणार. आज तुमच्याकडे कितीतरी प्रस्ताव असे आहेत. चांगले-चांगले प्रस्ताव कायदेशीर सल्ला आल्याशिवाय तुम्ही कोणताही टिडीआरचा विषय मंजूर करत नाही. कारण का तर आपल्याकडून कोणतेही चुकीचे काम व्हायला नको. कोणत्याही पद्धतीने लोकांना

अतिरिक्त मोबदला दिला गेला नाही पाहिजे. पण जे मुळातच विकसित झाले त्यांचे काय करणार. तुमची द्यायची इच्छा आहे. हा दर कोणाला लागू करणार याचे पूर्ण स्पष्टीकरण या प्रस्तावात होत नाही. मला आपल्याला असे सांगावेसे वाटते की, या विषयात अस्तित्वातील रस्त्यांबाबतीत तुमच्याकडून कुठेतरी ठोस निर्णय झाला पाहीजे. आपण याबाबतीत दोन/तीन वेळा बोललो होतो. ठराविक प्रकरणांत न्यायालयाचे काही निर्देश असतील तर , न्यायालयाच्या गाईडलाईन्स वापरुन शेतक-यांचा फायदा करता येत असेलतर १०० टक्के करुन द्यावा. त्यानुसार अस्तित्वातील रस्त्यांबाबतीत १०० टक्के दिलासा रक्कम प्रस्तावित केली आहे. त्यात अस्तित्वातील रस्त्यांचा याबाबतीत समावेश व्हावा आणि आत्ता त्याबाबतीत मा.राजेंद्र जगताप यांनी जी मागणी केली आहे त्याला अनुमोदन देतो.

**मा.विमल काळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, माझ्या वॉर्डात भरपूर लोकांची, शेतकरी लोकांची घरे गेली आहेत, त्यांना जास्तीत जास्त डबल मोबदला मिळावा अशी अपेक्षा करते. हा विषय लवकरात लवकर पास करावा.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, हा विषय अतिशय चांगला आहे. परंतू याचा चांगुलपणा आपल्याला भविष्यात भावणार तर नाही ना. हा बघण्याचा एक दृष्टिकोण आहे. कारण आपण अशा पद्धतीने आपण दुप्पट रक्कम द्यायला लागलोतर काही लोक मुद्दाम अडवणूक करुन, आत्ता जसे शासनाने डिक्लेअर केले आहे की, डबल एफएसआय देणार किंवा डबल टीडीआर देणार, तो रेडीरेकनरला लिंक केला आहे. आत्ता इतर विषयाच्या अनुषंगाने मा.मंगलाताईंनी उल्लेख केला, बाकीच्यांनी उल्लेख केला की, एलबीटी बंद झालीतर आपण ५०० कोटींपेक्षा कमी डिबेटमध्ये आहोत. अशा परिस्थितीत आपला हा निर्णय किती जाचक आहे याचा आपण विचार करणे गरजेचे आहे. एका बाजूला आपण पाहिले असेल तर मोशी असेल, च-होली असेल तिथला रेडी रेकनर रेट आत्ता खूप कमी आहे. परंतू किवळे, रावेत, पिंपळे गुरव, पिंपरी कॅम्प इथला दर ८,०००, १०,०००, १५,००० असे दर आहेत. अशा स्थितीत दर वर्षाला स्क्वे. मिटरचा दर होत असताना हे दर डिसेंबर, जानेवारीमध्ये १० ते १५ टक्के इतके वाढत जातात. अशा परिस्थितीत आपण असे पैसे द्यायला लागलोतर कोट्यावधी रुपये घालवूनसुद्धा रस्ते व्हायचे नाहीत. आपल्याला शहराची डेव्हलपमेंट करता येणार नाही. असे माझे प्रामाणिक मत आहे. सभागृहाने आपली ही स्थिती समजून घ्यायची आहे कारण आपल्याला शहराचा विकास करायचा आहे. कोणत्याही परिस्थितीत कोणावरही अन्याय करायचा नाही. दुस-या बाजूला लोकांनी टीडीआरसाठी पुढे यावे. काही लोकांना वाटते, काय गौडबंगाल आहे. आत्ता शासनाने नियम अत्यंत सुटसुटीत, स्पष्ट केले आहे. जे लोक आम्हाला जमिन देतील, त्या जागेचा रेडीरेकनरचा रेट लक्षात घेता, जागेचा भाव लक्षात घेता शासनाने दिलासा रक्कम दुप्पट द्यायचे ठरविले आहे. शासनाचे धोरण अंतिम टप्प्यात आहे. ते सजेशन/ऑबजेक्शन बघणार आहेत. डिसेंबर, जानेवारीत कधीही निर्णय येऊ शकतो. असे काही

चांगले निर्णय घ्यायचे शासनाने ठरविले आहे. अशा परिस्थितीत हा निर्णय याठिकाणी आपण घेतलातर आपल्याला पुन्हा शासनाची मंजूरी घ्यावीच लागणार आहे. माझे म्हणणे असे होते की, इतर पक्षनेते मंडळी उपस्थित आहेत. एक दीड गुंठ्यांचे छोटे-छोटे जमिनीचे तुकडे आहेत, त्यामुळे आपल्याला अडचण येते. साधारणतः अडीच ते तीन गुंठ्यांपर्यंत हा निर्णय मंजूर करावा. जेणेकरुन त्यांना झटकन पैसे देता येतील. त्यांना त्या बदल्यात जागा द्यावी अन्यथा तो अशी मागणी करु शकतो. ज्याला एफएसआय घ्यायचा आहे तो एफएसआय घेईल. ज्याला टिडीआर घ्यायचा आहे तो टिडीआर घेईल. ज्याला रेडीरेकनरप्रमाणे पैसे घ्यायचे आहेत तो त्याची मागणी करेल. परंतू अशा पद्धतीने आपण ढोबळ मान्यता दिलीतर भविष्यात आपल्या तिजोरीवर पडणार भार लक्षात घेता आपल्याला या शहराचा विकास करता येणार नाही. उलट हा विकास खुंटेल असे माझे प्रामाणिक मत आहे. आयुक्त साहेब किंवा ठाकूर साहेब यामध्ये आपले काही मत असेलतर स्पष्ट मत व्यक्त करावे. यात कोणावरही अन्याय करायचा नाही. कोणाला अडचणीत आणायचे नाही. परंतू हे करताना हा निर्णय दोघांच्या दृष्टिकोणातून सुलभ व्हावा. जमिन घेणा-याला व देणा-याला दोघांनाही भविष्यात अडचणीचे होऊ नये म्हणून आपला याकडे बघण्याचा जो दृष्टिकोण आहे यात आपल्याकडून स्पष्टता झालीतर निर्णय घेणे योग्य होईल.

**मा.राहूल जाधव** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आज हा जो नगररचना विभागाचा विषय आला आहे. आज आपल्या ग्रामिण भागात देखील प्रथमतः जे ग्रामपंचायतीचे रस्ते आहेत, हेच रस्ते बरेच ठिकाणी आजही वहीवाटीप्रमाणे हेच आहेत. परंतू आमच्या मागणीनुसार आम्ही पहिल्यापासून जे डिपी रस्ते आहेत, जो आपला मंजूर आराखडा आहे, त्याची मागणी सातत्याने पहिल्यापासून ग्रामिण भागातील नगरसेवक करत होते. टीडीआरमधले शेतक-यांना काही कळत नव्हते. परंतू ते आत्ता टीडीआर घ्यायला तयार आहेत. परंतू नगररचना विभाग असेल, स्थापत्य विभाग असेल यांची किचकट प्रक्रिया आहे. त्यामुळे बरेच वेळा शेतकरी कंटाळून तो विषय तिथेच सोडून देतात. मा.महापौर साहेब, मला आपल्याला विनंती करायची आहे की, हे जे आपले टीडीआरचे विषय आहेत. ज्यावेळी शेतक-यांची जमिन द्यायची तयारी असते, त्यावेळी त्यांना ४/४ विभाग फिरावे लागतात. नगररचना विभागात गेले की ते सांगतात, स्थापत्य विभागात पत्र द्या. स्थापत्य विभागात गेलो की ते सांगणार नगररचना विभागात पत्र द्या. ही सर्व प्रक्रिया किचकट असल्यामुळे एकाच विभागाला सांगावे. नगररचना विभागाला सांगावे, हा प्रश्न तुम्ही मार्गी लावा तरी ते योग्य होईल. नगररचना विभाग कंटाळा करतो. स्थापत्य विभाग कंटाळा करतो. त्यामुळे तो विषय आहे तिथेच राहून जातो मग ग्रामिण भागातले लोक देखील हे विषय मनावर घेत नाहीत. त्यामुळे हे मंजूर आराखड्यातले रस्ते आहेत ते तसेच राहून जातात त्यामुळे ग्रामिण भागातील विकास पूर्णपणे खुंटला जातो. आज ग्रामिण भागासाठी सर्वांनी खूप मोठी तरतूद

दिली आहे. परंतू ही तरतूद देखील खर्ची झाली पाहिजे असे आमचे प्रामाणिक मत आहे. तरतूद खर्च होण्यासाठी मंजूर आराखड्यातील रस्ते ताब्यात येणे गरजेचे आहे त्यामुळे तुम्ही दिलेला निधी खर्च होऊ शकत नाही. समजा आमच्या जाधववाडीतील एक रस्ता आहे सर्वे नं.७०६ त्याची टीडीआरची फाईल घेऊन मी आत्ता नगररचना विभागात आलो होतो. जर त्यांच्याकडे टीडीआर होण्याआधी मागणी केली की,तुम्ही दिलेला निधी तिथे खर्च होऊन तो रोड करु शकतो. अशा पद्धतीने तुम्ही काहीतरी करुन तो रोड मार्गी लावावा. बीआरटी रोड, पवार वस्ती ते देहू-आळंदी रोड इथे ब-याच लोकांची घरे गेली आहेत. ब-याच जागा गेल्या आहेत. ब-याच लोकांना मोबदला मिळालेला नाही. देहू-आळंदी या रस्त्याचा अभ्यास केलातर ब-याच ठिकाणी छोट्या-छोट्या पॅचेस राहिलेल्या आहेत. अजूनही लोकांनी जागा ताब्यात दिलेल्या नाहीत. त्यांची सुद्धा जागा देण्याची मानसिकता आहे. परंतू आपल्या अधिका-यांनी पाठपुरावा करुन त्या जागा ताब्यात घेतल्या पाहिजेत. अधिका-यांना देखील माहित आहे. त्यांची जरी मानसिकता असलीतरी आपले अधिकारी देखील तिथे पोहोचले पाहिजेत. बरेच जणांनी केस टाकली की, यांनी आमची जागा बळजबरीने घेतली. कितीतरी ठिकाणी आपण त्यांच्याशी सल्लामसलत केलीतर आपल्याला ही जागा मिळून जे-जे अपूर्ण रस्ते आहेत ते ताब्यात मिळतील. आरक्षणाचा विषय असलातरी आपण निधी दिला होता. ते आरक्षण देखील ताब्यात आले पाहीजेत. आरक्षण देखील नगररचना विभागाने लवकरात लवकर ताब्यात घेऊन ग्रामिण भागातील नागरीकांना हव्या असलेल्या, ज्या सुखसुविधा गरजेच्या आहेत त्या पूर्ण कराव्यात अशी मी विनंती करतो. धन्यवाद!

**मा.भाऊसाहेब भोईर** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,खरेतर जेव्हापासून डि.पी. मंजूर झाला आहे, तेव्हापासून हा प्रश्न राहून राहून वर येतो आहे शहरात डि.पी.नुसार नियोजित आराखड्यानुसार संपूर्ण अंमलबजावणी करावी या दृष्टिकोणातून कधीही न संपणारी ही समस्या आहे. मा.योगेश बहल यांनी आपले स्पष्ट मत मांडले. मी देखील त्यांच्या मताशी सहमत आहे. चेहरा बघून, राजकीय क्षमता बघून किंबहूना कोणता रोड कोणत्या एरियात आहे ते पाहून हे धोरण नसावे नगररचना ते आयुक्त हा प्रवास इतका खडतर आहे. ही मोठी साखळी आहे. मग कोणाचे करायचे, कोणाला पहिला निरोप द्यायचा, कोणाचा रोड पहिला करायचा. मी या साखळीत फार वर्षात लक्ष टाकलेले नाही. माझ्या पद्धतीने मी लक्ष टाकणार आहे. परंतू चेहरे बघून, राजकीय क्षमता पाहून कामाची वर्गवारी नसावी. आमच्या भगिनी विमलताई काळे यांनी जो प्रश्न मांडलेला आहे. त्यांनी सौम्य भाषेत आपला प्रश्न मांडला आहे याचा अर्थ त्याची फार गरज नाही असे समजायचे कारण नाही. या सर्व गोष्टींवर माझा आक्षेप आहे. आयुक्त साहेब गांभिर्याने घ्या. मी नम्र विनंती करतो की, काळेवाडीचा प्रश्न सातत्याने मांडत असताना तुम्ही फार लाईटली घेताय. त्यामुळे नगररचना विभाग देखील लाईटली घेतोय. नंतर आमचा किती व्होल्टेजचा बल्ब लागेल ते त्यांना कळणार

पण नाही. विमलताईंनी जो प्रश्न मांडलेला आहे तो तातडीने, सामंजस्याने आणि गृहीत धरुन कारण मला असे वाटते की, यासंदर्भात बोलावे तेवढे कमी आहे. इथे कोणाची दुकानदारी, कोण धंदे करतो, कोणाचा अधिकारी कोण या खोलात मला जायचे नाही. माझ्या कामापुरते, मला ज्या कामाची आवश्यकता आहे त्याबद्दल मी बोलतो आहे. मा.आयुक्त साहेब, आपण त्यात गांभिर्याने लक्ष द्यावे अशी विनंती करतो.

**मा.विनोद नढे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, नगररचना विभागाने दिलेला विषय शंभर टक्के निश्चितपणे अतिशय चांगला विषय आहे. आत्ताच काळेवाडीतील नगरसेविका मा.विमल काळे यांनी हा विषय मांडला होता. निश्चितपणे काळेवाडीत ४५ मी. रस्ता होत असताना तिथे २०० कुटूंबे बाधित झाली आहेत. त्यातील ६० लोकांना घरकुल योजनेमध्ये घर मिळालेले आहे. त्यातील उर्वरित कुटूंबांवर अन्याय झाला आहे. आत्ता ज्येष्ठ नगरसेवक मा.योगेश बहल यांनी सांगितले की, किमान २५० ते ३०० स्क्वे. फूटांपर्यंत हे लोक बाधित असतील तर त्यांना त्याठिकाणी मोबदला मिळावा. माझी आदरणीय मा.योगेश बहल यांना विनंती आहे की, ज्यांची २/३ गुंठ्यांपर्यंत घरे जातात. त्यांना पहिला मोबदला द्यावा. त्यापुढे ज्यांची जागा जात असेलतर त्यांचा टिडीआरसंदर्भात विचार करावा. जगताप डेअरी येथील डिपी रस्त्यातील बाधित लोक कोर्टात गेल्यानंतर त्यांना शंभर टक्के बोनस देण्यात आला आहे. अशा प्रकारे कोर्टात जाऊन निर्णय आणणे यात वेळ जातो. त्यापेक्षा शंभर टक्के मोबदला दिलातर डिपी रोड ची जागा लवकरात लवकर ताब्यात देण्यासाठी, शहराचा विकास होण्यासाठी निश्चितच मदत होईल.

**मा.कैलासभाऊ थोपटे**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आज याठिकाणी विषय आला आहे. रोडसंदर्भात पूर्वी आपण रेडीरेकनरच्या ३० टक्के रक्कम देत होतो. आता १०० टक्के देणार असा विषय आला आहे. आपल्या शहराचा विकास करायचा म्हटलेतर सर्वप्रथम जागा ताब्यात आली पाहीजे. आरक्षणांच्या जागा ताब्यात आल्या पाहीजेत. डिपी रोडच्या जागा ताब्यात आल्या पाहीजेत. रोडच्या जागा ताब्यात आल्यातरच आपण विकास करु शकतो. आपल्या डीपी प्लॅनला १८-१९ वर्षांपूर्वी मंजूरी मिळाली होती डिपी प्लॅन पद्धतीने रस्ता करायचा म्हटलेतर आपल्याला एफएसआयच्या माध्यमातून, टिडीआरच्या माध्यमातून जागा ताब्यात आल्या होत्या. त्या जागा ताब्यात घेऊनच आपण शहराची डेव्हलपमेंट केली होती. याचा विचार केलातर जास्तीत जास्त २५ ते ३० टक्के जागा ताब्यात आल्या होत्या. माझ्या प्रभागात बघितले तर १५ ते २० टक्के फक्त जागा ताब्यात आल्या होत्या. त्यानंतर काही शेतक-यांनी पूर्वीच्या जागेवर रोड व्हावा या दृष्टीने काही मोबदला न घेता आपल्याला रस्ते करुन दिलेले आहेत. काही शेतक-यांनी अजूनही रस्ते अडवलेले आहेत. त्यामुळे आपल्या शहराचे रस्ते तसेच थांबलेले आहेत. याठिकाणी खूप चांगला विषय आहे. काहीतरी जागा आहेत, त्या लोकांना काहीतरी मोबदला मिळतो आहे. आत्ताच मा.योगेश बहल यांनी सांगितले,

३ गुंठ्यांपर्यंत लोकांना मोबदला मिळावा. अर्धा, एक गुंठ्यांचे जे रस्ते अहेत त्यात रस्त्यात घरे बांधली आहेत. लोकांनी घरे बांधल्यानंतर त्यांची घरे पाडलीत. त्यांना रहायला जागा नाही. हे लोक भाड्याने रहात आहेत. परंतू आज विषय मंजूर झालातर त्यांना चांगला मोबदला मिळेल. मोबदला मिळाल्यानंतर ते कुठेतरी थोडीशी जागा घेऊन त्याठिकाणी वास्तू उभी करतील. आज याठिकाणी अनेक शेतक-यांच्या जागा आरक्षणात गेलेल्या आहेत. असेच रेडीरेकनरचे दुप्पट पैसे मिळाल्यानंतर त्यांचा खूप फायदा होईल. भूमिपुत्रांना काहीतरी न्याय मिळाला पाहीजे. मा.आयुक्त साहेब, मी आपले मनापासून अभिनंदन करतो. हा विषय खूप चांगल्या पद्धतीने उपस्थित केला आहे. लोकांना याचा चांगल्या पद्धतीने फायदा होणार आहे. सर्वप्रथम आयुक्त साहेब मी आपले अभिनंदन करतो. हा विषय खूप चांगला आहे. हा विषय मंजूर करावा अशी मी सर्वांना विनंती करतो. सभागृहात या विषयावर अनेक सदस्यांनी चर्चा केलेली आहे. मी सदस्यांचेही मनापासून अभिनंदन करतो. चर्चा करुन या विषयाला मान्यता दिलेली आहे त्याबद्दल सर्वांचे अभिनंदन करुन आयुक्तांचेही अभिनंदन करुन याठिकाणी थांबतो.

**मा.महेशदादा लांडगे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आपल्या महापालिकेत सगळ्यांच्या हिताचा, जनतेच्या हिताचा निर्णय झाल्यानंतर यात नक्की कोणाला फायदा होतो हेच कळत नाही. आपल्या महापालिकेत खरेतर चांगले विषय अजेंडावर असतात. आत्ताच मा.कैलासभाऊ थोपटे यांनी सांगितले, ज्या उद्देश्याने नगरसेवक असे विषय मंजूर करतात, त्यांचा उद्देश्य साध्य सुद्धा होताना आजपर्यंत दिसले नाही. टिडीआर आला की, इथल्या स्थानिक शेतक-याचे नाव पहिले घेतले जाते. स्थानिक लोकांना याचा फायदा होतो. स्थानिक लोकांना याचा फायदा आहे. मला आरोप करायचा नाही. कारण कधीतरी आम्हीच या विषयाला मंजूरी दिलेली असते. कुठेतरी नागरीक या गोष्टींसाठी महापालिकेत सारखे फे-ऱ्या करतात आणि ज्या अपेक्षेने आपण तो विषय केला आहे. त्या अपेक्षेने त्यांना त्याचे उत्तर मिळत नाही. तेव्हा हे लोक आमच्यावर ओरडतात. टाऊन प्लॅनिंग हा जो विभाग आहे. ३० टक्के देणार होतो ते आत्ता १०० टक्के देणार आहोत. हा विभाग खरेतर काही दलालांचा अड्डा आहे. इथले अधिकारी दलाल आहेत. मी आरोप करताना माझ्याकडे काही मुद्दे समोर मांडले तर यांच्या नोक-या जातील. मला ते मांडायचे नाही. मला कोणाच्या पोटावर लाथ मारायची नाही. यांनी काही लोकांना नाहक त्रास दिलेला आहे. आणि अशा लोकांची कामे केली आहेत की, ज्यांच्याकडे फिजिकल पझेशन नाही, ऑन पेपर पझेशन नाही, त्यांच्याकडे व्यवस्थित पेपर नाही अशांची कामे केलेली आहेत. अशा लोकांना टीडीआर दिलेले आहेत. आम्ही पिंपरी चिंचवड शहरातील स्थानिक लोकांचा विचार करायचा, नागरीकांचा विचार करायचा म्हणून आम्ही कायदे करायचे आणि यांनी दुस-याचा कायदा करुन द्यायचा असा प्रकार टाऊन प्लॅनिंगचा चालला आहे. आम्ही विषय मंजूर करुन देतो. आम्हाला टिडीआर या संकल्पनेबद्दल काहीच माहिती नाही. फक्त आमच्या लोकांचा फायदा होतो आहे. आमच्या लोकांचा जास्तीचा फायदा आहे ही

भावना आहे म्हणून आम्ही विषय मंजूर करतो. पण खरा कायदा हे टाऊन प्लॅनिंगवाले करतात. चुकीच्या पद्धतीने करतात. मी टाऊन प्लॅनिंगमध्ये बरेच वेळा गेलो आहे. भदाणे मॅडम यांनी काय काय केले मला माहित आहे. माझ्या वॉर्डात जे आरक्षण आहे, त्याचे फिजिकल नाही आणि ऑन पेपर सुद्धा पझेशन नाही. तरीसुद्धा तुम्ही टीडीआर दिलेला आहे. जिथे चार पैसे मिळतात तिथे करणार. जिथे गरीब माणसाचा फायदा आहे, त्याला खेटे मारायला लावणार. कोणताही निर्णय करताना आम्ही एका व्यक्तीसाठी करत नाही. कोणताही निर्णय करताना शहरातील सगळ्या नागरीकांचा विचार करतो. परंतू याचा उपयोग काही ठराविक लोकच करतात. त्यांचे अधिकार त्यांची पॉवर वापरून यांची कामे होणार. परंतू लोक बाहेर जातात तेव्हा गरीब लोक आम्हाला निश्चितपणे शाप देत असतील. आम्ही त्यांच्या चांगल्यासाठी केले. या गोष्टीकडे लक्ष द्या. विषय मंजूर झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी करताना अधिकारी कामचुकारपणा करतात. ठराविक लोकांचे काम करतात. एजंट म्हणून लोकांचे काम करतात. २००४ला आपल्या पिंपरी चिंचवडला भूसंपादनासाठी पैसे भरले होते २०१४ मध्ये मी भूसंपादनाचे पैसे देण्यासाठी जेव्हा मी मागे लागलो. तेव्हा यांनी त्या लोकांना टीडीआर देऊन टाकला. त्या अधिका-याकडून दहा वर्षांचे व्याज घेतले पाहीजे. भूसंपादनासाठी १०/१० वर्षे लागतात. २०५ कलमानुसार या लोकांना टिडीआर देणार का. च-होली इथला एक रस्ता शिफ्ट झाला असताना आता कोर्टाने स्टे दिलेला आहे. तुम्ही त्या माणसाला टिडीआर देऊन टाकला आहे. एका आरक्षणात भूसंपादन नोटीस दिली. आणि त्याच जागेचा टिडीआर सुद्धा देऊन टाकला आहे. इतकी चुकीची कामे होतात. रस्त्यात आले म्हणून पाडा. पोलिस लावून पाडा. त्यासाठी लोकप्रतिनिधी आहोत का. त्यासाठी आम्ही कायदा करतो का. या सगळया गोष्टी बघा. नाहीतर जनता कधीच माफ करणार नाही. मी मोकळेपणे आरोप केला आहे. या गोष्टींमुळे लोकांना नाहक त्रास होतो. या गोष्टी टाळाव्यात म्हणून मी इथे माझी भूमिका मांडली आहे.

**मा.अनिता तापकीर** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आज जो विषय चालला आहे याबद्दल मी सर्वांचे आभार मानते. अमरदिप कॉलनी इथे आयुक्त येऊन पाहून गेले. २५ वर्षे झाली तिथे कोणी आजारी पडले तर तिथे फायरब्रिगेडची गाडी जाऊ शकत नाही. कोणाची मैत झालीतर तिथे ॲम्ब्युलन्स जाऊ शकत नाही. इतकी वाईट परिस्थिती आहे. हे रस्ते होऊच देत नाही. माजी नगरसेवकाने तिथे रस्ता अडवलेला आहे. आपल्या कर्मचा-यांनी तिथे पूल बांधून दिला आहे. नागरीकांना जाण्या-येण्यासाठी तिथे रस्ता नाही हा अन्याय का? आयुक्त साहेब, आपण पाहणी करुन गेलात तरी अजूनही गांभिर्याने काहीच घेतलेले नाही. आयुक्त साहेब, आपण हा विषय गांभिर्याने घ्यावा. आमच्या नागरीकांना रस्ता करुन द्यावा. लोकांची जाण्यायेण्याची इतकी अडचण आहे. इतकी परिस्थिती आहे. तिथे रस्ता करुन द्यावा.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, प्रथमतः मा.तानाजी खाडे महापौर पदावर विराजमान झाले त्याबद्दल तुमचे याठिकाणी मनापासून अभिनंदन करते. पुढील आरक्षण कदाचित मागासवर्गीयांसाठी असेल तर तुम्हाला त्या खुर्चीवर बसलेले बघून खरोखर आनंदच वाटेल. मला अशी भिती वाटते आहे की, आपण ३० वरुन १०० टक्यांवर जातोय. एखादे आरक्षण ताब्यात घेताना २०५ चा रस्ता असेल आणि ५ गुंठ्यांच्या आतले असतील तर करायला हरकत नाही. परंतू सरसकट सगळ्या आरक्षणांना १०० टक्के मोबदला देणार असू तर मघाशी मा.भाऊसाहेब भोईर बोलले की नगररचना पासून आयुक्तांपर्यंत सगळी साखळी आहे ती मोठ्या-मोठ्या साखळदंडाच्या कड्या आहेत. कोणताही जमिनधारक, शेतकरी तुमच्याकडे टिडीआर मागायला येणार नाही. कारण त्याला शंभर टक्के मोबदला परवडणार आहे. परिणामी होणारा विकास थांबणार आहे. ज्यांनी बांधकाम केले आहे, एफएसआय लोड केला आहे, टिडीआर घेऊन ते नियमित करणार आहेत ते थांबणार आहेत. म्हणून याठिकाणी आयुक्त साहेब, मोबदला द्यायला अजिबात मनाई नाही. खरोखर १०० टक्के मोबदला दिला पाहिजे. २०५ च्या रस्त्यांबद्दल मा.प्रशांत शितोळे यांनी जसे सांगितले, पूर्वी काही मोबदला न देता रस्ते ताब्यात घेतले त्यांचे काय करणार आहोत. साडेतीन ते चार वर्षे झाली. या रस्त्यांसंदर्भात काही निर्णय झालेला नाही. आपण पाठपुरावा करत नाही. रस्ते जबरदस्तीने ताब्यात घेतले. वहिवाटीचा रस्ता म्हणून तिथे डांबरीकरण केलेले आहे. त्यांनी शेतक-यांना विचारले तरी तुम्हाला काय अपेक्षित आहे. टिडीआर किंवा शंभर टक्के मोबदला. जे आपल्याला परवडते ते आपल्याला द्यायला हरकत नाही. म्हणून आयुक्त साहेब जरी शासनाने कायदा पास केला असेलतरी आपली आर्थिक परिस्थिती विचारात घेता आपल्याला हे परवडणारे आहे का. आपण दरवर्षी बजेटमध्ये भूसंपादनाकरिता १०० कोटी इतकी तरतूद ठेवतो. भूसंपादनावर तेवढी रक्कम देखील खर्ची होत नाही. तरतूद वर्गीकरण केले जाते. कारण ३० टक्क्यांवर मोबदला द्यायला कोणी तयार होत नव्हते. १०० टक्के केल्यावर घेतीलही. तुमच्याकडे टिडीआर आला की तुमची मोजणी, तुमची फाळणी आणि तुमचे अधिकारी सांभाळता सांभाळता नाकी नऊ येतात. काल टिडीआरची मिटींग झाली. ऑबजेक्शन घेतले. जे वाचले तेवढेच घेतले. विषयपत्रिकेवर ८०/८५ विषय होते. परंतू ज्यावर ऑबजेक्शन घेतले ते विषय तुम्ही १०० टक्के करणारच नाही असे तर नाही ना. सुनावणी घेणार का सुनावणी करायला बंदी करणार आहात. ज्यावेळी १०० टक्के मोबदला देऊ, त्यावेळी सुद्धा तुमच्याकडे अशीच मिटींग होणार आहे. तुमच्याकडे मागणी आली की, तुम्ही लगेच मंजूर केले असे काही होणार आहे का या सगळ्या गोष्टींचा विचार केला पाहिजे. आणि कुठे ना कुठेतरी याला बंधन असले पाहिजे. ३ गुंठ्यांपासून ५ गुंठ्यांपर्यंत असे तुम्ही बंधन ठेवा. महापालिकेकडे पैसे नाहीत ही वस्तुस्थिती आहे. दिवसेंदिवस आपली परिस्थिती वाईट होणार आहे. तुम्ही त्यांना देऊ शकणार नाही. नगरसेवक म्हणून शिव्या खायला आम्ही असणार आहोत. म्हणून मा.आयुक्त साहेब,मा.महापौर साहेब,

तुम्हाला विनंती आहे की, याठिकाणी या विषयाचा आपण गांभिर्याने विचार करावा आणि याठिकाणी आपल्याला विषय मंजूर करता येत असेल, आपल्याला विषय मंजूर करावा असे वाटत असेल,  महापालिका मोबदला देऊ शकणार नाही असे वाटत असेलतर याठिकाणी आपण अटी घालाव्यात व त्यावर हरकती/सूचना घ्याव्यात.

**मा.आयुक्त -** मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मी या विषयाचा खुलासा करणार नाही. तरीसुद्धा आत्ता जे सदस्य बोलले. मा.भाऊसाहेब भोईर, आमदार मा.महेशदादा लांडगे, मा.विनोद नढे, मा.विमल काळे, मा.राहूल जाधव सर्वांच्या मुद्यांच्या मी नोंदी घेतल्या आहेत. त्यात लक्ष घातले आहे. आमदार यांच्या मुद्यांची नोंद घेतली आहे. त्याबाबतीत मी सध्याची प्राप्त परिस्थिती सभागृहाला सांगू इच्छितो की, राज्य शासनाला याआधीच प्रस्ताव दिला आहे. राज्य शासन यावर लवकरात लवकर निर्णय घेईल अशी अपेक्षा आहे. त्यामुळे आपल्याला थोडी वाट पहावी लागेल असे मला म्हणायचे आहे. धोरणात्मक निर्णय झालातर आपला कोणताही निर्णय त्या धोरणात्मक निर्णयाला आपोआप लागू होईल. महत्वाचा मुद्दा मा.योगेश बहल यांनी उपस्थित केला. त्याला मा.सिमा सावळे ताईंनी, मा.भाऊसाहेब भोईर यांनी पाठिंबा दिला. मी आयुक्त म्हणून जबाबदारीने मत मांडू इच्छितो की, भविष्यात शासन आपल्याकडे डबल टिडीआर आणण्याची शक्यता आहे. डबल रेडी रेकनर करणार आहे. डॉकेट प्रसिद्ध झाले आहे. ते अंतिम होण्याची आपण वाट पाहत आहोत. याचा अर्थ भविष्यात ज्या-ज्या जमिनी टिडीआरमार्फत सुद्धा येतील त्यांची रेडी रेकनरप्रमाणे किंमत राहील. तो दुप्पट झाल्यामुळे त्याची किंमत दुप्पट राहणार आहे. राज्य शासनाच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राज्य शासनाने पूर्वी फार विचारपूर्वक टिडीआर व एफएसआयचे धोरण आखले होते कारण महापालिकेकडे पैसे नसतात. दर वर्षी भूसंपादनावर पैसे घालवण्यापेक्षा सभागृह कधीही याच गोष्टीला प्राधान्य देईल की, तो पैसा विकासावर खर्ची व्हावा. तुमचाही तोच आग्रह असतो. त्यामुळे एक एक पैसा शक्यतो विकासावर जावा. भूसंपादन शक्यतो पैसे खर्च न करता व्हावे अशीच सर्वांची अपेक्षा असते. ती रास्त आहे. परंतू आत्ता आम्ही डबल पैसे देऊ करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. कारण राज्य शासनाचा तसा निर्णय आहे आणि आम्ही तो मांडणार आहोत. त्यावेळी टिडीआर व या पैशांची बरोबरी होईल. मग काही लोक या मार्गाकडे येण्याची शक्यता नाकारता येत नाही. आणि मग बजेटवर पैसे गेले अशी मागणी जास्त होण्याची शक्यता आहे. म्हणून शहरातील मंजूर जमिनी संपादन करण्यासाठी पैसे कमी लागावेत व हा पैसा शहरातील विकासाच्या इतर चांगल्या कामांसाठी वापरला जावा म्हणून आज सभागृहाने विचारपूर्वक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे असे माझे मत आहे. जाहिर प्रवेशिका आहे. टिडीआर घेण्यासाठी सगळी कागदपत्रे गोळा करण्यासाठी त्रास होईल म्हणून हा मार्ग मोकळा ठेवावा. हजारो हेक्टरवर जमिनी आहेत. त्या पैसे देऊन घ्याव्यात हे शक्य होणार नाही. तेवढे पैसे आपल्याकडे द्यायला नाहीत. आणि आपणच आपल्या टिडीआरचा अवमान केला असे

होईल. त्यामुळे प्रशासनाने जरी प्रस्ताव मांडला असलातरी सभागृह त्यावर विचारपूर्वक निर्णय घेईल. याला दोन पर्याय आहेत. एकतर यावर काही रिस्ट्रीक्शन्स घालावेत किंवा १०० टक्के म्हटले असलेतरी तेवढे द्यायचे किंवा मार्जिनली ५ ते १० टक्के पैसे कमी द्यायचे. तेही आपण तपासून घ्यावे.

**मा.योगेश बहल-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,हा विषय वाचल्यानंतर त्या मताच्या अनुषंगाने बाकी विविध पक्षांच्या नेत्यांनी सुद्धा या गोष्टीला दुजोरा दिलेला आहे. आत्ता टिडिआरवर आमदार साहेब व बाकी लोक बोलले. आणि मागे सुद्धा या विषयावर अनेक वेळा चर्चा केलेली आहे. पुण्यामध्ये टिडीआर कमिटी नाही. ही भानगड सुद्धा नाही. मी मागे आपल्याला असे सांगितले आहे की,आपल्याकडे पूर्वी पॅनल पद्धत नव्हती. डॉ.परदेशी यांनी ही पॅनल पद्धत इन्ट्रॉड्युस केली. काही हरकत नाही. चांगली पद्धत आहे. पुण्यामध्ये आपल्यापेक्षा एक स्टेज जास्त आहे. आपल्याकडे व्हिजिलन्स आहे. डॉ.परदेशी यांनी याला सुरुवात केली होती. ते यात ॲड करावे. आठ/दहा महिन्यांनंतर टिडीआरची मिटींग झाली. ८/१० महिन्यांत अनेक बिल्डर यांचे यात हाल झाले आहेत. लोकांना २००/४०० स्क्वे. मी.चे सुद्धा बांधकाम करता आले नाही. टिडीआर लोड करता आलेला नाही. जी लोकं तुमची मंजूरी न घेता, टिडीआर लोड न करता काम करतात. त्यांना बिल्डींग परमिशनकडून भरमसाठ तगडा दंड लावतात. एका बाजूला संबंध देशात असलेली मंदी, पिंपरी चिंचवड पुणे जिल्ह्यात बांधकाम व्यवसायात एक नंबरला होते. ते आता मागे पडले आहे. जमिनींचे भाव वाढले आहेत. बाकी गोष्टींचे भाव वाढले आहेत. फ्लॅटला गि-हाईक नाहीत. अशा वेळेला टिडीआर उपलब्ध होत नाही. तेव्हा काय परिस्थिती होते याची जाण आपल्यालाही लागली आहे. त्यामुळे गेले दहा महिने मिटींग झालेली नाही. तुम्ही चुकीचे काम करा असे आम्ही कधीही म्हणणार नाही. चुकीचे काम होत असेलतर ते आपण थांबवले पाहीजे याबद्दल काही दुमत नाही. तुम्ही काम पारदर्शकपणे करा. नीट करा. चांगले करा. तुमच्या पॅनलवर सिटी इंजिनिअर,टिटीडीपी व नगररचनाचे लोकं एवढे सगळे लोक असताना तुम्ही पाच लोकच बसतात. कोट्यावधी रुपयांच्या फाईली त्यात शहरातील शाळेच्या फाईली आहेत, बांधकामांच्या फाईली आहेत. त्याला कमिटी बसते का. कमिटी बसत नाही. अजून एखादा माणूस वाढवा, टेबल वाढवा. विलंब कमी करा, पारदर्शकता आणा. परंतू चुकीचे काम होणार नाही याची दक्षता घ्या. जसा डाळीचा साठा झाला, काळाबाजार झाला व भाव वाढले तसा हा टिडीआरचे सुद्धा भाव वाढले. ९५० चा टिडीआर १५०० इतका रेट झाला. दहा महिने झाले मिटींग झाली नाही. याला जबाबदार आपणच आहात. हा टिडीआरचा काळाबाजार आपणच करतोय. वरिष्ठ पुढा-याच्या माणसाने सांगितले होते का, माझा माल खपत नाही तोपर्यंत पुढील मिटींग घ्यायची नाही. याचा अर्थ आम्ही असा घ्यायचा का. तुम्ही फाईल स्क्रुटीनी करा, स्क्रुटनायझिंग करा. ही फाईल रितीने येऊ द्या. झोनिंग असेल, नगररचना त्यांचे काम करतील. लिगल त्यांचे काम करतील. आपल्या पॅनलकडे जाऊ

द्या. पॅनलला आपले काम करु द्या. व्हिजिलन्सकडे जाऊ द्या. व्हिजिलन्सकडून तुमच्याकडे येऊ द्या. जे विषय वाचले ते यांचेकडून तुमच्याकडे येऊ द्या कशाला साठा व्हायला पाहिजे. कशाला काळाबाजार व्हायला पाहिजे. याची काय गरज आहे. पुणे, ठाणे, मुंबई इथे असे नाही. मग आपल्याकडेच कमिटी का आहे. या पद्धतीने विचार करा. लोकांना होणारा त्रास कमी व्हायला पाहिजे. आयुक्त साहेब, आपण व ठाकूर साहेबांनी यात लक्ष घाला. लोकांना सहज दाखले उपलब्ध व्हायला पाहिजेत. ज्यांच्या मागे वाली नसतो, ज्यांच्यामागे कोणी पुढारी नसतो अशांवर अन्याय होणार नाही. जो कोणी मोठा माणूस आहे तो डायरेक्ट ठाकूर साहेबांना संपर्क करेल. तिथे दुसरा ऑफिसर नेमावा. अशी फिरवाफिरवीची, टोलवाटोलवीची कामे बंद झाली पाहिजेत. बाकी सिस्टीम आहे त्या सिस्टीममध्ये सुद्धा सुधारणा व्हायला पाहीजे

मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- "भूसंपादन अधिनियमाअंतर्गत मंजूर विकास योजनेतील रस्त्याखालील क्षेत्र ताब्यात घेताना संबंधित मिळकतधारकांस त्यांचे जागेचा मोबदला देणेकामी बाधित क्षेत्राच्या क्षेत्रफळाची आवश्यकता लागते व त्यासाठी संबंधित मिळकतधारकांस त्यांचे जागेची सरकारी मोजणी करुन त्याजागेबाबत विकास योजना अभिप्राय घेतलेनंतर त्यांचे बाधित होणा-या क्षेत्राची निश्चिती होत असते. सदर रस्त्याने बाधित होणारे मिळकतधारकाच्या मिळकतीचे क्षेत्र हे छोटे छोटे भूखंडधारक असल्याने व त्याबाबत संबंधित जागामालक नविन भूसंपादन नियमानुसार १०० % दिलासा रकमेची मागणी करीत आहेत. पर्यायाने रस्त्याखालील क्षेत्र म.न.पा. च्या ताब्यात येण्यास विलंब होतो व रस्त्याचा विकास होणेस विलंब होत असल्याचे दिसून येत आहे. वरील बाबींचा विचार करता ज्या मिळकतधारकांचे मिळकतीचे हे क्षेत्र ० ते ३०० चौ.मी. पर्यंत अशा बाधित छोटया छोटया मिळकतधारकांना १०० % दिलासा रक्कम व त्यानुसार मोबदला Or by way of TDR/FSI Or by 30 % Solisum as per previous norms. देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.शत्रुघ्न काटे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, दोन्ही उपसूचना स्विकारल्या आहेत.

**मा.नितीन काळजे -** मा.महापौर साहेब,टिडीआर संदर्भात हा विषय आहे. पालिकेने पॅनलवर वकील ठेवला आहे. फाईल पहिल्यांदा आपल्या वकिलांकडून पॅनलवर जाते. फाईल ज्यावेळी आपल्या पॅनलच्या वकीलांकडे येते, त्यावेळी असे होते की, आपण ज्यावेळी फाईल देतो, त्यावेळी आपल्या वकीलांनी फाईल पाहिली नाहीतर दुसरा वकील तरी काय पाहणार आहे. त्यांच्याकडे फाईल आल्यानंतर फाईनल होते. दुस-या वकीलाकडे फाईल गेल्यावर त्यात करेक्शन निघते. मग आपल्याकडे फाईल पाठवण्याचा काय उपयोग आहे. मग पॅनलचे वकील काय फाईल पाहतात. माझ्या फाईलवरुन सांगतोय. थोडीशी जी काही चूक होती. फाईल आपल्या वकीलांकडे गेली. पॅनलच्या वकिलांकडे गेलीतर त्यांनी ऑबजेक्शन काढले नाही. आमच्या वकीलांनी ऑबजेक्शन काढले. जी चूक होती त्याची मी पूर्तता केली. पॅनलवर वकील

ठेवण्याची ही पद्धत आपण बंद करावी. मला पॅनलच्या वकीलांचा हा निव्वळ फार्स वाटतो. जेव्हा जाहिर नोटीस करतो. त्याचा पैसा दिला जातो. हरकती ग्राह्य करतो. ज्यावेळी फाईल मंजूर होते, त्यावेळी वकील ऑबजेक्शन घेतात. तेव्हा आपण म्हणतो कोणाचे तरी ऑबजेक्शन आले आहे. मग जाहिर नोटीस कशासाठी ठेवतात. नंतरचे ऑबजेक्शन्स स्विकारू नयेत असा माझा मुद्दा आहे. हा फक्त पैसे घ्यायचा धंदा झाला आहे. वकील नो ऑबजेक्शन घेतो, काहीतरी पैसे घेतो नंतर फाईल पास होते. ऑबजेक्शन घ्यायचे असेलतर ते जाहिरपणे घ्यावे एवढीच माझी विनंती आहे.

**मा.राजेंद्र काटे -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, आत्ता टिडीआर संदर्भात जो कायदा आहे. त्यात २०१३ ला नवीन अमेंडमेंट आली होती. शहरी भागात रेडीरेकनरच्या दुप्पट पैसा, ग्रामिण भागात रेडी रेकनरच्या चार पट हा केंद्र सरकारने चांगला कायदा आणला आहे. आपण एवढा पैसा देत असताना विकास कामांवर परिणाम होईल हा आपल्यासमोर असलेला प्रश्न आहे. मा.योगेश बहल यांनी चांगले विवेचन केले. १३ महिन्यांनंतर मिटींग झाली. १३/१३ महिन्यांनी मिटींग होत असेलतर भूसंपादनासाठी कोण पुढे येणार आहे. एवढ्यांना टिडीआरचे पैसे द्यावेत व इतरांनी टिडीआरला जावे असे बंधन घालणे योग्य नाही. हा शेतक-यांचा अधिकार आहे. आपण बंधन घालू शकत नाही. त्यांनी टिडीआर घेण्यासाठी यावे, आकर्षित व्हावे म्हणून आपण सर्वीस चांगली दिली पाहिजे. कामे वेळेत झाली पाहिजेत. प्रशासनाने सुधार केला पाहिजे. त्यासाठी शेतक-याला का दाबता. अशा चुकीच्या धोरणाला माझा विरोध आहे. आपण सर्वीस सुधारा. आपल्या अटी मोकळ्या करा. तुमच्या दिरंगाईमुळे टिडीआरला कोणी येत नाही. याचा उपयुक्त अभ्यास आपण केला पाहिजे. पैसे घ्यायला न जाता आपण आपल्या कार्यपद्धतीमध्ये बदल केला पाहिजे. हा शेतक-यांचा अधिकार आहे. शेतक-यांनी टिडीआरला जायचे का पैसे घ्यायला जायचे हा अधिकार त्यांना द्यावा एवढीच आपल्याला विनंती करतो.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला अस्ता-

ठराव क्रमांक - ७७४ विषय क्रमांक - १९
दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र नरवि /कावि/रहाटणी/ड-८/६८०१/१५ दि.२३/०९/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिका परीसरात मंजूर विकास योजनेतील आरक्षण, रस्ता तसेच मंजुर विकास योजनेव्यतिरीक्त महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अंतर्गत घोषीत रस्ता या प्रयोजनाने बाधीत होणारे क्षेत्र खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेणेकामी रेडीरेकनर नुसार होणारे मुल्यांकन अधिक ३० % दिलासा रक्कम अशी मिळुन

एकत्रित होणारी रक्कम अदा करणेची पध्दत प्रचलित आहे. जे.एन.एन. यु.आर.एम. प्रकल्पांतर्गत विकसीत होणारे रस्ते व इतर आवश्यक रस्त्याकरीता खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करण्यासाठी सुध्दा मा.महापालिका सभा ठराव क्र. ३९९ दिनांक २१/११/२०१३ अन्वये ३० % दिलासा रक्कम विचारात घेऊन मोबदला देण्याचे धोरण ठरविण्यात आलेले आहे. भूसंपादन अधिनियम १८९४ मधिल तरतूदीनुसार ३० % दिलासा रक्कम विचारात घेवून सदरचे धोरण पूर्वी निश्चित करण्यात आले होते. सदर धोरणानुसार सद्यस्थितीत बाधीत मिळकतधारकांना नुकसान भरपाई अदा करणेत येत आहे.

तथापी केंद्र शासनाने भूसंपादन अधिनियम १८९४ ऐवजी "The Right to fair compensation and Transparency in land acquisition, Rehabilitation Resettlement Act 2013"(भूसंपादन कायदा २०१३) हा नवीन भूसंपादन कायदा मंजूर केला असून दि. १ जानेवारी २०१४ पासून सदरचा कायदा अंमलात आला आहे. सदर कायदयातील कलम ३०मधील तरतूदीनुसार दिलासा रक्कम देय नुकसान भरपाईच्या१००% इतकी निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनानेही महसूल व वन विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण-०३।२०१५।प्र. क्रं. ३४।अ-२ दि.१२।०५।२०१५ नुसार खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी करतांना भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेड्युल -१ च्या तरतूदीनुसार सर्व बाबी विचारात घेऊन मोबदला रक्कम निश्चित करावी असे धोरण निश्चित केलेले आहे.

उपरोक्त वस्तूस्थिती विचारात घेता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करतांना संबंधित जमिन मालकास मोबदला अदा करतांना मा. महापालिका सभा ठराव क्रं. ३९९ दि.२१।११।२०१३ नुसार मंजूर कार्यपध्दती व धोरणानुसार कार्यवाही करावयाच्या प्रकरणी तसेच इतर सर्व प्रकरणात नुकसान भरपाई अदा करतांना ३०% दिलासा रक्कमे ऐवजी १००% दिलासा रक्कम विचारात घेऊन मोबदला रक्कम निश्चित करण्यात यावी, या प्रमाणे धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असल्याने सदर धोरणास मान्यता देणेत येत आहे. तसेच महानगरपालिकेला आवश्यक असणारे रस्ते जागा मालकांकडून वाटाघाटीने ताब्यात घेवून त्याठिकाणी रस्ते विकसीत करण्यात आले. परंतु जागा मालकांना कोणताही मोबदला देण्यात आलेला नाही हा ख-या अर्थाने जागा मालकांवर अन्याय आहे. तरी त्यांना पुर्वी जरी ते रस्ते विकसीत करण्यात आले असतील तरीही सदर जागा मालकांना त्यांचा मोबदला देण्यात यावा. सबब मनपा स्थापनेपासून ते आजपर्यंत मनपामध्ये अस्तित्वात असणा-या रस्त्यांबाबत मोबदला देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच "भूसंपादन अधिनियमाअंतर्गत मंजूर विकास योजनेतील रस्त्याखालील क्षेत्र ताब्यात घेताना संबंधित मिळकतधारकांस त्यांचे जागेचा मोबदला देणेकामी बाधित क्षेत्राच्या क्षेत्रफळाची आवश्यकता लागते व त्यासाठी संबंधित मिळकतधारकांस त्यांचे जागेची सरकारी मोजणी करुन

त्याजागेबाबत विकास योजना अभिप्राय घेतलेनंतर त्यांचे बाधित होणा-या क्षेत्राची निश्चिती होत असते. सदर रस्त्याने बाधित होणारे मिळकतधारकाच्या मिळकतीचे क्षेत्र हे छोटे छोटे भूखंडधारक असल्याने व त्याबाबत संबंधित जागामालक नविन भूसंपादन नियमानुसार १०० % दिलासा रकमेची मागणी करीत आहेत. पर्यायाने रस्त्याखालील क्षेत्र म.न.पा. च्या ताब्यात येण्यास विलंब होतो व रस्त्याचा विकास होणेस विलंब होत असल्याचे दिसून येत आहे. वरील बाबींचा विचार करता ज्या मिळकतधारकांचे मिळकतीचे हे क्षेत्र ० ते ३०० चौ.मी. पर्यंत अशा बाधित छोटया छोटया मिळकतधारकांना १०० % दिलासा रक्कम व त्यानुसार मोबदला Or by way of TDR/FSI Or by 30 % Solisum as per previous norms. देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मापिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७७५ विषय क्रमांक - २०
दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र नरवि /कावि/रहाटणी/ड-८/०१/१५ दि.०६/१०/२०१५

अर्जदार श्री. संदीप रघुनाथ गोडांबे यांनी मौजे रहाटणी येथील स.नं. २९ पैकी, जागेत विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्रं. ११.५ नुसार आरक्षणाचे आकारात स्थळबदल करणेबाबतची मागणी केलेली होती. सदर आरक्षणाचे एकुण क्षेत्र सुमारे १२५००.०० चौ.मी. असुन त्यापैकी जागेवर सुमारे १०८००.०० चौ.मी. उदयान विकसित झालेले आहे व उर्वरीत सुमारे १७००.०० चौ.मी. क्षेत्र ताब्यात आलेले नसुन श्री. गोडांबे यांनी सदरचे क्षेत्र ताब्यात दिल्यास आरक्षण पूर्णपणे विकसित होईल.

सदर प्रकरणी अर्जदार यांचे मालकीचे प्रत्यक्ष जागेवर सुमारे २७००.०० चौ.मी. खुले क्षेत्र आहे. मंजूर विकास योजनेनुसार सुमारे १०००.०० चौ.मी. क्षेत्र निवासी विभागात असुन उर्वरीत सुमारे १७००.०० चौ.मी. क्षेत्र आरक्षण क्रं. ६५३ उदयानाने बाधीत आहे. अर्जदार यांचे निवासी क्षेत्रास जाणे येणे करीता पोहोच रस्ता उपलब्ध नाही. त्यामुळे १२.०० मी. रस्त्याचे कडेला निवासी क्षेत्राइतके क्षेत्र स्थलांतरीत करून आरक्षणाचे क्षेत्र निवासी क्षेत्रानंतर स्थलांतरीत करावे व त्यानुसारच आरक्षणाने बाधीत क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात देण्याची तयारी अर्जदार यांनी दर्शविलेली आहे.

तथापि अर्जदार यांचे मागणीनुसार आरक्षणाचे आकारात विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्रं. ११.५ नुसार स्थळबदल करावयाचा असल्यास १२.०० मी. रूंद रस्त्याचे लगत त्रिकोनी आकारात टि.डी.आर. चे बदल्यात मनपाच्या ताब्यात आलेले सुमारे ५०.०० चौ.मी. क्षेत्र आहे. सदरचे क्षेत्र मनपाचे ताब्यात असलेने अर्जदारास पोहोच रस्ता देणेस अडचणीचे होत आहे. तरी सदरचे क्षेत्राबाबत टि.डी.आर. च्या बदल्यात मनपाचे ताब्यात असलेले अर्जदार यांचे जागेसमोरील १२.०० मी. रूंद रस्त्यालगतचे त्रिकोणी आकाराचे ५०.०० चौ.मी. आरक्षणाचे क्षेत्र संबधित अर्जदार यांना मनपाकडुन ताब्यात देऊन त्याऐवजी त्यांचेकडुन त्यांचे मालकीचे निवासी क्षेत्रातील तेवढेच क्षेत्र घेऊन ते महानगरपालिकेच्या आरक्षणासाठी घ्यावे म्हणजे उदयानाचे आरक्षणाचे उर्वरीत सर्व क्षेत्र मनपाच्या ताब्यात येईल व अर्जदारास प्रवेश रस्ता उपलब्ध होईल.

तरी अर्जदार श्री. संदीप रघुनाथ गोडांबे यांचे स.नं. २९ पैकी निवासी विभागातील बंदीस्त झालेले क्षेत्र व त्यांचे आरक्षण क्रं. ६५३ उदयान याचे क्षेत्र याची अदलाबदल करून उदयानाने बाधीत क्षेत्र मागील बाजुस दर्शवुन अर्जदार यांचे निवासी क्षेत्र रस्त्याचे लगत विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्रं. ११.५ नुसार स्थळबदल करणेस व अर्जदाराचे जागेसमोरील १२.०० मी. रूंद रस्त्यालगतचे आरक्षणाचे मनपाच्या ताब्यातील सुमारे ५०.०० चौ.मी. क्षेत्र मनपाकडुन अर्जदारास देऊन त्या बदल्यात त्यांचे मालकीचे निवासी क्षेत्रामधील तेवढेच क्षेत्र महानगरपालिकेकडे आरक्षणासाठी घेणेकामी धोरणात्मक निर्णय घेणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

--------

**मा.आशा सुर्यवंशी** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २१ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७७६ विषय क्रमांक - २१
दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.नगरसचिव

**विधी समिती**

अ) दि.२१/७/२०१५, ३०/७/२०१५ व ३१/७/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.३०/७/२०१५ व ३१/७/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दि.१४/९/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

--------

**मा.आशा सुर्यवंशी** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७७७ विषय क्रमांक - २२
दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिती**

अ) दि.८/७/२०१५ व दि.२२/७/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.२८/७/२०१५ व ३०/७/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दि.१४/९/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

--------

**मा.आशा सुर्यवंशी** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७७८ विषय क्रमांक - २३
दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.नगरसचिव

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतीक समिती**

अ) दि.१७/६/२०१५, १/७/२०१५ व १५/७/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दि.१५/७/२०१५ व १७/७/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
क) दि.१४/९/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-
अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २४
दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.क्षेत्रिय अधिकारी "ड" क्षेत्रिय कार्यालय यांचेकडील पत्र क्र.ड/सभा/कावि/८९/२०१५ दि.०२/०९/२०१५
२) मा.ड प्रभाग समितीकडील ठ.क्र.१२ दि.३/७/२०१५

पिंपळे निलख प्रभाग क्र. ५४ येथील कै.प्रभाकर नारायण साठे उद्यानामध्ये कै.प्रभाकर नारायण साठे मा.महापौर पिंपरी चिंचवड मन.पा. यांचा अर्धाकृती पुतळा उभारणेकामी मान्यता देणेत येत आहे.

**मा.प्रतिभा भालेराव** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते - पिंपळे निलख प्रभाग क्र. ५४ येथील कै.प्रभाकर नारायण साठे उद्यानामध्ये कै.प्रभाकर नारायण साठे मा.महापौर पिंपरी चिंचवड मन.पा. यांचा अर्धाकृती पुतळया ऐवजी पुर्णाकृती पुतळा व मेघडंबरी उभारणेस मान्यता देणेत यावी.

**मा.नंदा ताकवणे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ७७९ विषय क्रमांक - २४
दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.क्षेत्रिय अधिकारी "ड" क्षेत्रिय कार्यालय यांचेकडील पत्र
क्र.ड/सभा/कावि/८९/२०१५ दि.०२/०९/२०१५
२) मा.ड प्रभाग समितीकडील ठ.क्र.१२ दि.३/७/२०१५

पिंपळे निलख प्रभाग क्र. ५४ येथील कै.प्रभाकर नारायण साठे उद्यानामध्ये कै.प्रभाकर नारायण साठे मा.महापौर पिंपरी चिंचवड मन.पा. यांचा अर्धाकृती पुतळया ऐवजी पुर्णाकृती पुतळा व मेघडंबरी उभारणेकामी मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मापिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७८० विषय क्रमांक - २५
दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.
क्र.निवडणूक/१/कावि/४९२/२०१५ दि. १७/१०/२०१५

मा.भारत निवडणुक आयोग,नवी दिल्ली यांचेकडील दिनांक-२७/८/२०१५ व मा.मुख्य निवडणूक अधिकारी,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील दिनांक-३१/८/२०१५ चे पत्राने दिनांक- ८ ऑक्टोबर २०१५ ते ७ नोव्हेंबर २०१५ पर्यंत मतदार नोंदणी अभियान राबविण्यात येणार आहे. सन २०१६-१७ मध्ये होणा-या स्थानिक संस्थाच्या (महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद पंचायत समिती व ग्रामपंचायत) सार्वत्रिक निवडणुकामध्ये जानेवारी २०१६ मध्ये अंतिम प्रसिध्द होणारी मतदार यादी वापरण्यात येणार आहे.

पुणे जिल्हयातील २१ विधानसभा मतदार संघ असून त्यापैकी शहरी -११ व ग्रामीण १० असे आहेत. पुणे जिल्हयाची एकुण मतदार संख्या ६९,६८,९०३ असुन स्त्री मतदार ३३,०२,४५१

पुरुष मतदार संख्या ३६,६६,४१० व इतर ४२ अशी आहे. सदर मतदार संघातील दुबार, मयत व स्थानांतरीत मतदार यांची वगळणी करण्यात आलेल्या मतदारांची मतदार संघनिहाय व मतदान केंद्रनिहाय नावांची यादी (सी.डी.) सर्वसाधारण सभेमध्ये सर्व सदस्यांच्या निदर्शनास आणावी तसेच सदरची मतदार यादी त्यांचे निदर्शनास आणलेबाबतचा ठराव करुन सदर सभेचे इतिवृत्त व ठरावाची प्रत कार्यालयास पाठविणेबाबत मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी, पुणे यांचेकडील पत्र क्र.पी.ई-३/७३७/२०१५ दि.३०/०९/२०१५ अन्वये कळविले आहे.

त्याप्रमाणे पुणे जिल्हयातील २१ विधानसभा मतदार संघातील दुबार, मयत व स्थानांतरीत मतदार यांची वगळणीकरणेत आलेल्या नांवाची यादीची सी.डी मा.महापालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये सर्व मा.नगरसदस्यांच्या निदर्शनास आणून दिलेबाबत सर्वसाधारण सभेची मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७८१ विषय क्रमांक - २६

दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा. क्र.
बक्षे/स्था/कावि/--/१५/२०१५ दि. २०/१०/२०१५

“प्रभाग क्र.४९ थेरगाव बापुजीबुवानगर येथील सर्व्हे नं.९ मध्ये दवाखाना इमारत बांधणे.” या कामाचा सन २०१५-१६ चे अंदापत्रकामध्ये ‘प’ अंदाजपत्रक - रुग्णालये व प्रसुतीगृहे औषधालये या लेखाशिर्षावर पान क्र.५५६ अनु.क्र.१ वर समावेश आहे. सदर कामासाठी मा.महापालिका सभा ठराव क्र.६६३ दि.०६/०४/२०१५ अन्वये अंदाजपत्रकीय रक्कम रु.२००००००००/- (र.रु.वीस कोटी फक्त) रकमेस प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

सदर कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील सन २०१४-१५ ची मंजुर दर सुची व मंजुर दर पृथ्थक्करणानुसार सविस्तर अंदाजपत्रक (Detail Estimate) तयार केले. त्यानुसार सदर दवाखाना इमारतीची स्थापत्य विषयक कामे, विद्युत विषयक व अनुषंगिक कामे करणेसाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु.६३,३८,३१,०००/- इतकी येत आहे.

सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. ६३,३८,३१,०००/- (अक्षरी रक्कम रु.त्रेसष्ठ कोटी अडतीस लाख एकतीस हजार फक्त) ला प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

--------

**मा.पिठासिन प्राधिकारी -** सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपली असे जाहीर करणेत येत आहे.

**(तानाजी खाडे)**
**पिठासिन प्राधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/३९९/१५
दिनांक - २३/१२/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.